मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार

शं. पु. जोशी.

भा. इ. सं. मं. स्वीयग्रंथमाला क्र. ४८

मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार

एकहि पाँवसे सेंधियासाहब सागरलू धरिदाबिधऱ्यो है।
पूरब पश्चम दक्खन उत्तर लंकपति मनमाहि डऱ्यो है।
दूसरे पावको है बसुधाकित तूटत टेकत घबराह वराहै।
सूरत सातहु द्वीपनमे, जग जीतनहार तुहीं लंगरार।
तुहीं लंगरार!!

लेखक

शंकर पुरुषोत्तम जोशी

('भाऊंच्या वीरकथा' पुस्तकाचे कर्ते)

शक १८५९ किंमत ०१२ इ. १९३७


प्रकाशकः प्रो. द. वा. पोतदार,
श्री. सर. गं. ना. मुजुमदार,
चिटणीस, भा. इ. सं. मं., पुणें नं. २.

मुद्रकः रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए.,
आर्यभूषण प्रेस, ९१५।१ भांबुर्डा पेठ,
पुणें नं. ४.




महादजी शिंदे तरुण.

भा. इ. सं. मंडळ चित्रसंग्रह
संपादक–द. वा. पोतदार



मराठ्यांच्यासत्तेचा उत्तरेकडील विस्तार.



लासवारीचें रणक्षेत्र


जिज्ञासूंनीं कै. शि. म. परांजपेकृत, 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' हा ग्रंथ पहावा. पृ. २२५–२३७


PREFACE.

On behalf of the Bhārata Itihāsa Samshodhaka Mandala, I feel great pleasure, indeed, in offering to the public the present booklet by Mr. S. P. Joshi, the author of 'Bhaūchyā Veerakatha' or Heroic tales about the Bhaū Saheb, dealing with the extension of the Mahratha power to the west of Delhi. Mr. S. P. Joshi has visited on foot almost the whole Panipat tract, listening to the ballads of the bards—the Bhāts and the Chārans—singing the glories of great battles in our past history, meeting the pattedars possessing old Sanads of the Mahratha period, and seeing with his eyes the actual scenes of events recorded in our history. These tours have enabled him to collect much material useful to the students of our history. The material is of a varied nature and this adds to its interest. His tireless and fatiguing wanderings alone have made it possible for him to render this service to history and for this he deserves the thanks of all interested in the subject.

No doubt our main sources for historical studies are the documents. So far as the history of the Mahrattas, especially in the latter half of the eighteenth century is concerned, the efforts of such eminent researchers as Rajwade, Parasnis, Khare and Sane, to mention only some, have revealed to us a very large number of papers related to the history of the Mahrattas. Much, however, of this valuable material was gathered in the Deccan; and the torch is still being carried further on, so that more documents are being discovered from day to day.

Documentary study needs to be supplemented by actual observations. An accurate knowledge of topography is so essential for a historian. Maps, however detailed and correct, fail to give us the vividness and perspective supplied by personal observations and visits. The author Mr. Joshi gives us help of the latter kind.





जिज्ञासूंनीं कै. शि. म. परांजपेकृत, 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' हा ग्रंथ पहावा. पृ. २२५–२३७

PREFACE.

On behalf of the Bhārata Itihāsa Samshodhaka Mandala, I feel great pleasure, indeed, in offering to the public the present booklet by Mr. S. P. Joshi, the author of 'Bhaūchyā Veerakatha' or Heroic tales about the Bhaū Saheb, dealing with the extension of the Mahratha power to the west of Delhi. Mr. S. P. Joshi has visited on foot almost the whole Panipat tract, listening to the ballads of the bards—the Bhāts and the Chārans—singing the glories of great battles in our past history, meeting the pattedars possessing old Sanads of the Mahratha period, and seeing with his eyes the actual scenes of events recorded in our history. These tours have enabled him to collect much material useful to the students of our history. The material is of a varied nature and this adds to its interest. His tireless and fatiguing wanderings alone have made it possible for him to render this service to history and for this he deserves the thanks of all interested in the subject.

No doubt our main sources for historical studies are the documents. So far as the history of the Mahrattas, especially in the latter half of the eighteenth century is concerned, the efforts of such eminent researchers as Rajwade, Parasnis, Khare and Sane, to mention only some, have revealed to us a very large number of papers related to the history of the Mahrattas. Much, however, of this valuable material was gathered in the Deccan; and the torch is still being carried further on, so that more documents are being discovered from day to day.

Documentary study needs to be supplemented by actual observations. An accurate knowledge of topography is so essential for a historian. Maps, however detailed and correct, fail to give us the vividness and perspective supplied by personal observations and visits. The author Mr. Joshi gives us help of the latter kind.

The present booklet contains the results of the inspection tours of the author Mr. Joshi in the three districts of Hariyana, Rath and Mewat. This is perhaps for the first time that such a book was ever written by anybody in Marathi. The scene of the battle of Laswari described by Mr. Joshi is particularly important.

Two Maps, one of the Scene of the Laswari battle and the other outlining the three tracts would be found to be very helpful. A picture of Mahadji Scindia when young, has been also added. This picture was secured by me several years ago and presented to the Mandala. As the extension of the Mahratha power in these three districts was chiefly due to the inspiration and efforts of Mahadji Scindia, it is but appropriate that we should have this picture in this book.

Mr. Joshi has of late years devoted himself solely to this work. He is probably the first visitor and searcher of his kind from Maharashtra, in touring this area. He revels in these tours as he would in nothing else. He has no other purpose, no other pleasure, no other occupation. This has reduced his needs to the minimum and if the former are guaranteed he is prepared to go on.

The Mandala, therefore, decided to do what it could for him, within its limited means. The continuance of the experiment depends entirely upon the response that may be given to this book.

2nd December, 1937.
Bhārata Itihāsa
Samshodhaka Mandala,
Poona.

DATTO VAMAN POTDAR,
Hon. Secretary,
B. I. S. Mandala, Poona.

प्रस्तावना

रा. शंकर पुरुषोत्तम जोशी हे 'भाऊंच्या वीरकथा' या पुस्तकामुळें इतिहासाभ्यासी मंडळीच्या परिचयाचे आहेत. अलीकडे कित्येक वर्षें रा. जोशी यांनीं एकच व्यवसाय चालविला आहे आणि तो म्हणजे उत्तरेकडील मराठ्यांच्या सत्तेच्या ऐतिहासिक मुलुखांत परिभ्रमण! या परिभ्रमणांत त्यांनीं पानिपत रणक्षेत्र पायीं पालथें घातलें व तेथून पुढें हरियाणा, राठ व मेवात या विभागांकडे त्यांनीं आपला मोर्चा वळविला. या क्षेत्रांत त्यांनीं लासवाडीचें रणक्षेत्र पाहिलें. ही पाहणी करतांना रा. जोशी यांना रानावनांतून व उन्हातान्हांतून शेकडों मैल पायीं भटकावें लागलें आहे; आणि इतिहासप्रेमामुळें त्यांनीं हे कष्ट सोसले आहेत!

आपल्या परिभ्रमणांत रा. जोशी यांनीं जें पाहिलें, ऐकिलें व मिळविलें त्याचा परिपाक त्यांनीं प्रस्तुत ग्रंथाच्या रूपानें आपणांपुढें ठेविला आहे. रा. जोशी यांच्या परिभ्रमणी संशोधनानें आपणांस पुष्कळ नवीन व मनोरंजक माहिती मिळत आहे.

ऐतिहासिक कागदपत्रें मिळवून प्रसिद्ध करण्याचें कार्य आपल्या इकडे कैक वर्षें चालू आहे. परंतु पूर्वकालीन घटनांचें सम्यग् ज्ञान होण्यास तत्कालीन भौतिक व भौमिक स्थितीचें चित्र डोळ्यापुढें जितकें संपूर्ण असेल तितकें उत्तम. लासवाडी किंवा पानिपत अशासारखे युद्धप्रसंग नुसत्या कागदपत्रांच्या अभ्यासानें पूर्णपणें उलगडत नाहींत. तीं तीं स्थळें प्रत्यक्ष पाहिल्यावांचून नुसत्या नकाशांनीं तृप्ति होत नाहीं, इतकेंच नव्हे, तर पुष्कळ वेळां भलतेच व चुकीचे ग्रह होऊन बसतात. परंतु परिभ्रमण सर्वांसच शक्य होत नाहीं. अशा वेळीं जर दुसऱ्या कोणीं सूक्ष्म व बिनचूक पाहणी केली तर तीहि पुष्कळ साहाय्यकारी होते. कागदी अभ्यासाला पहाणीची जोड मिळेल तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल.

कागदी–अभ्यासोत्तर पहाणी व अभ्यासपूर्व पहाणी यांत अंतर फार असतें. पहिलीपेक्षां दुसरी कितीतरी दुर्बळ! रा. जोशी यांचें परिभ्रमण हेंच शील झालें आहे. कागदी अभ्यास–पांडित्याची प्रतिज्ञा ते करीत

नाहींत. ही मर्यादा लक्ष्यांत घेतली तरी देखील रा. जोशी यांच्या परिश्रमांची उपयुक्तता लक्ष्यांत आल्याखेरीज राहात नाहीं.

रा. जोशी यांचे पाय बळकट आहेत परंतु प्रतिमा, नकाशे वगैरे घेऊन परिभ्रमणाची सांगता करण्याची अनुकूलता त्यांस नाहीं. प्रस्तुत ग्रंथांतील भ्रमणक्षेत्राचे हातानें काढलेले आराखडे त्यांनीं पाठविले.. मग येथें आमचे संग्रहीं नकाशे होते त्यांचे साहाय्यानें या पुस्तकांतील दोन क्षेत्रप्रतिमा* तयार करवून येथें छापल्या आहेत. त्याचप्रमाणें प्रस्तुत लेखकानें पुण्याच्या जुन्या बाजारांत सुमारें वीस वर्षांपूर्वी मिळविलेलें महादजी शिंदे यांचें तरुणपणचें एक सुंदर जुनें चित्र मंडळसंग्रहांत होतें, त्याची प्रतिमाहि या पुस्तकास जोडली आहे. कारण, या ग्रंथांत जो मराठी सत्तेचा विस्तार वर्णिला आहे तो बहुतेक शिंद्यांच्याच पराक्रमाचा विस्तार आहे. रा. शं. ना. जोशी यांनीं मुद्रितें वाचतांना कांहीं टीपा जोडल्या आहेत; तारखाहि त्यांनींच तपासल्या आहेत.

मंडळानें रा. शं. पु. जोशी यांस यथाशक्ति आर्थिक साहाय्य पोंचविलें आहे. हा ग्रंथ यापूर्वींच प्रसिद्ध करण्याचा संकल्प होता. परंतु त्रैमासिकांतून खंडशः तो देणें प्राप्त झालें; त्यामुळें मनांत ठरविलेली वेळ साधली नाहीं. या संशोधनाचें महत्त्व व उपयुक्तता शिंदेशाहीच्या अभ्यासकांस विशेष वाटेल आणि या प्रयत्नास योग्य उत्तेजन मिळेल तर असे आणखी ग्रंथ प्रसिद्ध करतां येतील.

मार्गशीर्ष शु. १।५९,
३।१२।३७ पुणें.

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस भा. इ. सं. मंडळ.

ता. क. ग्रंथ उत्तरेकडे जावयाचा असल्यानें रा. जोशी यांच्या विनंतीवरून इंग्रजी प्रस्तावनाहि जोडली आहे.

* नकाशांपैकीं पहिल्या नकाशांत प्रमाण एका इंचास ४४ मैल आहे. या नकाशांतील बुधवाणा गांव नारनोळजवळ काढलें आहे; तें नाहाडजवळ दाखवावयास पाहिजे. तरी तसें समजावें.

प्रास्ताविक

मी संशोधनकार्याकरितां फिरतां फिरतां रोहोतक जिल्ह्यांत झज्झर येथें गेलों व तेथील सुप्रसिद्ध गृहस्थ पं. उमादत्त शर्मा, एम्. ए., एलएल. बी. ॲडव्होकेट, यांच्याकडे, त्यांची व माझी मुळींसुद्धां ओळख नव्हती तरी जाऊन मुक्काम ठोकला. प्रास्ताविक स्वरूपाचें भाषण झाल्यावर, तुम्ही कधीं महाराष्ट्रांत गेला होता काय ? असा मीं त्यांस सहज प्रश्न केला. त्यावर किंचित् हंसल्यासारखें करून ते म्हणाले, हें पहा. तुमच्या पूर्वजांनीं आमच्यावर राज्य केलें. सतलजपर्यंत मराठी राज्याचा विस्तार वाढविला आणि या गोष्टींचें संशोधन करण्याच्या निमित्तानें खांद्याला गाठोडें अडकवून तुम्ही आमच्या प्रांतांत आज आलेले आहांत. ठीकच आहे. पण आम्हीं तुमच्याकडे कोणत्या संशोधनाकरितां जावें ? आम्ही उत्तरेकडील हिंदु प्रजा म्हणजे कित्येक शतकें मुसलमानी अमलांत राहिल्यामुळें आमचा इतिहास तो काय आहे ! आणि आम्हीं तुमच्याकडे कशाला जावयाचें ! ज्यांना इतिहासच नाहीं त्यांनीं संशोधन काय करावयाचें !!! असो.

मी महाराष्ट्र सोडून पंधरा वर्षें राजपुतान्यांत शिक्षकाचें काम करीत आहें. इ. स. १९३३ सालीं पानीपतच्या आसपासचीं खेडींपाडीं हिंडून त्या प्रांतांतील जोगी लोक पानिपतच्या युद्धप्रसंगाविषयीं जी मराठ्यांचीं गाणीं गातात तीं व दुसऱ्याहि कित्येक लोककथा, मीं एकत्र केल्या आणि त्यांचें प्रकाशन धुळ्याच्या राजवाडे इतिहाससंशोधनमंडळानें केलें. ‘ भाऊंच्या वीरकथा ’ हें तें पुस्तक म्हणजे माझें इतिहासक्षेत्रांत पडलेलें पहिलें पाऊल आहे. त्यानंतर शिक्षकाच्या धंद्याकडे माझें मन लागेनासें झालें; व या क्षेत्रांत आणखी कांहीं पावलें टाकावीं ही इच्छा बलवत्तर होत चालली.

कै. इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची थोरवी मीं काय वर्णन करावी ? मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें एकत्र करून त्यांनीं जी कामगिरी केली आहे ती बहुमोल व चिरस्मरणीय आहे यांत शंकाच नाहीं. पण महाराष्ट्राच्या बाहेर जो परप्रांतांत मराठी राजसत्तेचा विस्तार झाला होता तिकडील साधनसामुग्री एकत्र करून तिचें संकलन करण्याचें कार्य

अद्याप तसेंच राहिलेलें आहे. हें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे. मराठ्यांची प्रस्थापित अशी राजसत्ता कोठपर्यंत होती; व तेथें या गोष्टींची स्मृति अथवा खाणाखुणा काय आहेत; या गोष्टींकडे अद्याप कोणाहि संशोधकाचें लक्ष गेलें नाहीं.

"भाऊंच्या वीरकथा" हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर इ. स. १९३४ सालीं मी महाराष्ट्रांत आलों होतों. व नंतर पुन्हां राजपुतान्यांत भरारी मारली. पण दुर्दैवानें १९३५ सालीं मी अजारी पडलों. व यामुळें माझ्या आवडीच्या गांवीं "दातारामगड' येथें पडून राहिलों. त्यावेळीं माझी प्रकृति इतकी बिघडली कीं, माझ्या राजपुतान्यांतील मित्रांनीं दक्षिणेंतील माझ्या घरादाराची व आप्तेष्टांची चौकशी सुरू केली. हेतु हा कीं मृत्यूचें वर्तमान दक्षिणेंतील मंडळींना योग्य वेळीं समजावें. सुदैवानें माझी प्रकृति सुधारली. व यापुढें संशोधनाकरितां आणखी एखादी भरारी मारावी यासाठीं मी तयारी करूं लागलों.

"मरेठा" अथवा "महाराष्ट्र" हे शब्द कानावर पडल्याबरोबर उत्तरेकडील सुशिक्षित मनुष्याचे डोळ्यांसमोर चार चित्रें एकदम उभीं राहतात. १ छत्रपति शिवाजी, २ पानिपताचा युद्धप्रसंग, ३ महादजी शिंदे यांचा राज्यविस्तार, ४ जसवंतराव होळकराच्या भराऱ्या.

पंजाब, दिल्ली, अलीगड येथील युनिव्हर्सिटया व अजमेर बोर्ड, यांनीं मान्य केलेल्या शाळा-कॉलेजांतून सांप्रत जीं इतिहासाचीं पाठ्य पुस्तकें चालू आहेत त्यांचें निरीक्षण केलें असतां असें दिसून येतें कीं, मराठ्यांच्या इतिहासाचें सर्व सार फक्त दोनच पानांत वर्णन केलेलें आहे! म्हणजे परप्रांतांतील इतिहासकार मराठ्यांच्या इतिहासाकरितां (Marathi Period) फक्त दोनच पानें खर्चीं टाकितात. या गोष्टीसंबंधानें मी तिकडील इतिहासकारांना वारंवार भेटतों व त्यांच्याशीं नेहमीं वादविवाद करितों. त्यावर हे लोक असें म्हणतात कीं, "तुमचें संशोधन आमच्यापर्यंत पोंचत नाहीं. त्यामुळें आम्हीं विस्तारपूर्वक विवेचन कसें करावें!!! इंग्रजी आणि फारसी पुस्तकें वाचून आम्हांला जें कळतें तेवढेंच आम्ही लिहितों! महाराष्ट्रांत मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधनात्मक शेंकडों खंड लिहिलेले असतील पण ते आमच्यापर्यंत पोंचत नाहींत त्याला आम्हीं काय करावें!! मराठ्यांचा इतिहास उज्ज्वल आहे व आम्हांस त्याविषयीं प्रेमही वाटतें, पण आमच्या

डोळ्यांसमोर संशोधन आल्याशिवाय आम्हीं हा भाग विस्तारपूर्वक कसा रंगवावा !!! मराठी भाषा शिकून तुमच्या संशोधनाचा अभ्यास करवा हें खरें, पण दुसरेंही निरनिराळे व्यवसाय आहेतच !!! असो. याचा परिणाम पुढें असा होणार आहे कीं, हळू हळू छाटा-छाट होत होत मराठ्यांच्या सर्व इतिहासाकरितां परप्रांतांतील पाठ्य पुस्तकांतून फक्त एक परिच्छेदच खर्चीं पडलेला दिसेल ! व सांप्रत जो एक मोठा इतिहास आपणांसमोर घडत आहे त्यानंतर क्रांति झाल्यावर मराठ्यांच्या इतिहासाचे परप्रांतांतील शाळा-कॉलेजांतून अजिबात उच्चाटन होणार नाहीं कशावरून !!!

उत्तरेकडील विषम हवेंत हिंडून मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन करणारा असा मी एकटाच. आणि या क्षेत्रांत हिंडतांना मला जेवढीं शाळा-कालेजें आढळतात तेथें जाऊन मी व्याख्यानें देत असतों !

महादजी शिंदे यांची गणना मराठ्यांच्या इतिहासांतील श्रेष्ठ आणि कर्तबगार व्यक्ति म्हणून केली जाते. इंग्रजी इतिहासकारांनीं सुद्धां महादजीबद्दल गौरवपरच लिहिलेलें आहे. त्यांनीं मराठी राज्यसत्तेचा विस्तार सतलजपर्यंत वाढविला. मराठ्यांची उत्तरेकडे प्रस्थापित अशी राजसत्ता कोठपर्यंत होती व तिचीं स्मृतिचिन्हें सांप्रत काय आहेत यासंबंधाचें संशोधन करण्याचें ठरवून या कार्यास ता. १ जानेवारी १९३६ रोजीं कंबर बांधिली, व ता. ३१ जुलै रोजीं बांधिलेली कंबर सोडली; म्हणजे हें काम सात महिने पुरलें. या भ्रमणांत मीं आपलें केंद्र ‘ कोटपूतळी ” हें ठेविलें होतें. हें ठिकाण मध्यवर्ति व सोईचें पडतें.

माझें संशोधनाचें क्षेत्र म्हणजे हरियाणा, राठ, मेवात, झिंद, नाभा, पटियाळा, अलवर या संस्थानांतील बराचसा भाग व इंग्रजींतील हिसार, गुडगांव आणि रोहोतक हे तीन जिल्हे. हें क्षेत्र बरेंच मोठें होतें. या प्रांतांत हिंडून तेथें उपलब्ध झालेल्या अस्सल कागदपत्रांच्या नकला, मराठ्यांच्या संबंधीं तत्प्रांतीय लोकांत प्रचलित असलेले वाक्प्रचार, भाटांचे दोहे व कवित्त्व, मराठी सत्तेच्या वेळीं जहागीर व इनाम दिलेल्या गांवांच्या अस्सल सनदांच्या नकला, निरनिराळ्या ऐतिहासिक स्थलांची पाहून लिहिलेलीं भौगोलिक वर्णनें, व लासवारीच्या युद्धासंबंधानें प्रत्यक्ष रणक्षेत्रांत हिंडून मिळविलेली माहिती, इ. इ. गोष्टींचा समावेश या पुस्तकांत केलेला आहे. तसेंच संशो-

धनक्षेत्राचा नकाशा जोडण्यांत आला असून निरनिराळया स्थलीं जाण्याचे मार्ग विवक्षित खुणांनीं दाखविण्यांत आलेले आहेत.

या संशोधनाकरितां मोटारीनें ३२५, रेलवेनें २००, उंटांवरून १७५, पायीं ३६०, मिळून एकंदर १०७० मैलांचा प्रवास झाला. संशोधनकार्य करितेवेळीं व केल्यानंतर ज्या निरनिराळया महाराष्ट्रीय सद्गृहस्थांनीं मला द्रव्यसहाय केलें त्यांचे या ठिकाणीं दिग्दर्शन करणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे.

१ रा. रा. भास्कर रामचंद्र भालेराव, तहसीलदार शोपूर, ग्वालियर स्टेट.

२ रा. रा. यादवराव नारायणराव खळे, बी. एजी. अग्रिकल्चर ऑफिसर कोटपूतली, खेतडीदरबार.

३ रा. रा. लक्ष्मण विनायक ऊर्फ बापूसाहेब कुमठेकर, टेलिग्राफ इन्स्पेक्टर, रेवाडी. B. B. & C. I. Ry.

४ डॉ. मिस्. मालतीबाई सप्रे, एम्. बी. बी. एस्. लेडी हॉस्पिटल भिवाणी, हिसार पंजाब.

हें संशोधनकार्य प्रकाशित करून महाराष्ट्रीय जनतेपुढें मांडण्याचें श्रेय पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस प्रो. दत्तो वामन पोतदार बी. ए. यांनाच आहे. कारण इतके कष्ट करून मिळविलेली माहिती जर कुजत पडली असती तर कष्ट करणें फुकट गेलें असतें.

माझ्या "भाऊंच्या वीरकथा" या पुस्तकाप्रमाणें हें दुसरें पुस्तकहि महाराष्ट्रीय इतिहासप्रेमी जनतेच्या आदरास पात्र होईल असा मला पूर्ण दृढ विश्वास आहे.

पुणें,
भारत इतिहास संशोधक
मंडळ, ता. १७ सप्टेंबर
१९३६.

वाचकांचा नम्र,
शंकर पुरुषोत्तम जोशी.

अनुक्रमणिका

दिल्लीपलीकडील मराठी सत्ता व आक्रमणें ह्यांविषयीं कांहीं गाणीं.

चाल–गजल केर्वा.

[1]सन हीजदा सदो एक पंजा। विक्रम साल जवाल था आ॥
*शहा आलिम था शाहे देहली। याने आलिम पनाह देहली॥
सन सत्रासो छासी इसवीमें। आखिर अठराहवी सदीमें॥
था माधोजी सेंधिया मरेठा। आजाद रहीस था मरेठा॥
अजराहे खलूस शाहे आलम्। देहलीमें राह किया जो हरदम॥
छोडी नी[2]गाह उसने देहली। तकादिरने शाहसे आँख बदली॥
था एक रुहिल्ला हाय् अफसोस। शहाका था वजीर वाहे अफसोस॥
मशहूर मीय्या गुलाम कादिर। निकला वो नमकहराम कादिर॥
आँखें डाली निकाल शाहकी। ले हाथमें खुद क[3]माँ सिपहकी॥
लाया कब्जेमें हिंदका तख्त। बस हिंदपे वख्त आगया सख्त॥
तब माधोजी सेंधियाने सुनकर। देहलीमें पहुंचे लेके लष्कर।
आ किले में उसका सर कलमकर। बिठला दिया शाह को तख्त शहपर॥
[4]नसरत जो मिली तो सेंधियानें। बजाया के खुशी के शा[5]दीयाँने।
चाहां 'पतियाळे' को दबाले। बिध जन्म के पत्रसे मिलाले॥
लछमन,[6] अम्बा[7] जो थे दो सरदार। भेजा उन्हे देके फौजे [8]जर्रार।
फर्माया कि लो मदद जो चाहो। पटियाळेपे जा के कब्जा करलो।
देहलीसे चलके जब वो लष्कर। वारिद[9] हुवा 'राजगड'में आकर।
'पटियाळा'भी होगया खबरदार। 'महाराज'को भी किया खबरदार।
थी कोम मरेठा गर्चे पुर[10]जोश। इल्ला[11] हुवी नींदमें वे होष।
मारा सिक्खोंने फिर तो शबखूँ[12]। पायी नसरत[13] बफजले बेचूँ।

---

१ विक्रमसंवत् (१८५१?). २ खालीं. ३ कमाँड. ४ मदत. ५ नगारा. ६ लछमनदादा. ७ अम्बोजी इंगळा. ८ करडी. ९ दाखल. १० उत्साहपूरित. ११ लेकिन. १२ छापा. १३ रूपा. * इ. १७५९–१८०६.

जार्ज थॉमसका उत्थान

ज्या बाद हुवी मुहिम जो दरपेश। कहता हूं उससे बिला कमऊबेस॥
जॉर्ज थॉमस था एक अंग्रेज। महशूर था मुल्खमें जो खूँरेज[1]॥
आया वो हिंदुस्थानमें जबसे। आँवारा फिरा किया वो तबसे॥
आपा[2] खांडा जो था मरेठा। रखता वो था सेंधियासे रिश्त॥
काबज था झज्झर और दाद्रीपर। करता वो था मुल्कगिरी अकसर॥
काबज[3] था नारनोळ पर भी। जॉर्ज की तलब हुई उधरभी।
जॉर्ज को बुला रक्खा मुलाजिम। महशूर हुवा वहां का नाझिम।
जब 'आपाखांडा' ने कजा[4] की। 'वामनजी[5]' को मिली वो गद्दी॥
जॉर्ज था जि बसके दिलचला [6]मर्द। 'वामनको' समझने लग
गया [7]गर्द॥
कर किले हांसी जेर कब्जा। बन बैठा आप वहांका राजा॥
हांसीको बनालिया रियासत। बिठलाई सिपाहसे सियासत॥
तोफों में पचास की थी तादाद। प्यादा थे पचास सोसे ईजाद॥
और फौज सवार जिस कदर थी। तादाद थी एक हजार उसकी॥
वालिये काबुल जो शाह जमा था। गारद्गरे हिंद बेगुमा था॥
लाहोर को उसने की अजीमत। हाथ आवे जो माल जर गनीमत॥
जॉर्ज को ये वक्त था गनीमत[8]। की झींद की सीम्त को अजीमत॥
जा किले झिंद को लिया घेर। बर्पा किया राजसीमें अंधेर॥
कैथल, पटियाला और नाभा। लष्कर ले आये यहाँ बहोतसा॥
खारज थी शुमार से मगर फौज। जार्ज पे चढी जो वो [9]जफ्फर मौज॥
जब सिक्खों से मुकाबला हुवा सख्त। खायी जो शिकस्त उसने
एकलख्त[10]॥
पसपा हुवा जब उसके लष्कर। हांसी को चला बेहाल मुजतर॥
और जब पीछा किया दूरतक जो उसका। जॉर्ज कजबे '[11]महीम'
को खसका॥
लेकिन सरशार थे सिक्ख शराबसे सख्त। जार्ज कहीं तक रहा था
कमबख्त॥
मारा शबखूँ फिर उसने कामिल। सिक्खोंमें पडी कमाल हलचल॥

---

१ हत्यारा. २ खंडेराव हरी. ३ अधिकारी. ४ मृत्यु. ५ खंडेराव हरी यांचा पुतण्या. ६ मर्दबहादुर. ७ तुच्छ. ८ इरादा. ९ विजय. १० एकदम. ११ हिसार जिल्ह्यांतील कजबा.

पटियाळेका झिंदका बहुतसा। नुकसाँ हुवा बचा था नाभा।
साधू जो था 'नर्मला करमसिंग'। थे उसके तमाम मोतकित सिंग॥
कहते हैं कि कुछ उसने लेके रिशवत। जॉर्ज से वो कर गया मुरव्वत॥
जॉर्जने फिर चली ये चाल और। राजी हुवा सुलह पे बेहेर तोर॥
लेकिन था फरेब बेहेरे [1]मोहोलत। दम लेके फरेब की बदौलत॥
हमसाए इलाखे झिंद ओ कैथल। उनपे लगा मारने वो चुंगल॥
सिक्खोंने फिर एक जंग और करदी। जॉर्ज को शिकस्त तेज तरदी॥
'ढूँढांन' वो गया शिकस्त खाके। लूटा उस्से खूब खाली पाके॥
ले राह फरार 'डरबे' पहुंचा। जॉर्ज का मुन्तजिर वहां था॥
सरदार 'बधौड' बिलमुकाबिल। दियी उसने फिर शिकस्त कामिल॥
इस खोफ से फिर '[2]सुनाम' आया। लूटा मारा जहां जो पाया॥
यहांसे चल कर 'घनौड' पहुंचा। लष्कर-ए-दीवाण सिंग वहां था॥
जब सख्त हुवी यहां लडाई। बिघडी हुवी बात यों बनायी॥
हो सुलह आपस में राजी। बेकार है मुफती और काजी॥
[3]अफवाल पे अपने मैं हूं [4]तायब। यह कहके हुवा यहांसे गायब॥
और फिर 'राजूवाणा' को जाके लूटा। लष्कर पटियाळा
उसपे टूटा॥
सिक्खोंसे मुकाबला बयक बार। आडे हाथों किया जो खूँखार॥
मारे गये पांचसो सिपाही। जॉर्ज पे फिर आ पडी तबाही॥
भागा वो यहांसे होके बेहोष। 'हांसी' उस्से हो गया फरामोस॥
'हांसी' को लिया जो उसने मरमर। लढने मरनेसे फिर कसमकर॥

जॉर्ज थॉमस का पतन

नामी था 'डी बोने, फ्रेंच जनरल। उस्ताद था वह जंगमें अकमल[5]॥
सन सत्रासो अस्सी इसवी था। नोकर उसे सेंधियाने रक्खा॥
तरतीब सिपाह कराके उस्से। अफवाज को नामवर बनाके॥
बारा बरस उस्से लेके खिदमत। बक्षी पेनशनपे उसको रुकसत॥
और 'पीरून' था एक फ्रेंच अफसर। दी सोप उसे कमान लश्कर।
पीरूनने फिर बढाके ताकद। दीयी मुल्क सेंधियाके वासद्॥
जन्नासे उधर भी सेंधियाका। दखल और अमल कुछ हो गया था॥
लेकिन वो बराए अकल दानिश। करता था अमन अमाँ कि कोशिस॥

---

१ अवकाश. २ पटियाळा संस्थानांतील तहशील. ३ कृत्य. ४ दिलगीर. ५ कमाल.

जॉर्जको [1] रकीब था समजता। रहता इसी फिकिरमें उलजता॥
सिक्ख भी थे उस्से कमाल बेचैन। सिक्ख और सेंधिया के माँ [2] भैन॥
पाया ये करार एहेदोपे माँ। जॉर्ज को शिकस्त करके ढंदाँ॥
मखलूके खुदाको अमन कीजे। फिर उस्से मुल्ख को बाँट लीजे॥
पस फौजे मरेठा होके तैय्यार। 'जॉर्जगड' पहुंची बेहेरे पैकार [3]॥
'बेरी' के मुकामपर हुवी जंग। लेकिन फौजे मरेठा हो गयी तंग॥
देखी जो और कुमककी जरूरत। लष्कर आ पहुंचा कुमकके सूरत॥
जी खोलके सख्त किया जो हमला। उतरा जॉर्ज के शरसे शमला॥
जी तोडके गर्चे सख्त की जंग। जॉर्ज का मगर बिघड गया ढंग।
औ खुँद था खंजरे शुजायत। आखर को कबूल की अताअत [4]॥
फिर ब्रटश के उरूज पे बअखबाल। भागा वो यहांसे सूबे बंगाल॥

जंग–ए–सेंधिया

अठरासो तीन ईसवी सन। था साल महरबे ब अनबन॥
बाहम ब्रटश ब सेंधियाके। सामान हुवे जंग के दगाके॥
काबज देहलीपर 'सेंधिया' था। था नाम बराए नाम शाहका॥
और था जनरल 'लीक' ब्रटश हपसर। आखर देहली उन्होंनें की सर॥
जब पायी मरेठोंने शिकस्ते। तब लिखी माहदे की सनदें॥
कर मुल्क कदीमपर कनाअत। आखिर को कबूल की अताअत॥
देहली, रोहोतक, हिसार, शिरसा। गुडगाँवा, आगरा भी छोडा॥
देहलीके मुहममे सेंधियाकी। सिक्खोंने बहुत बडी मदद की॥
लेकिन जो थे फूल [5] के रऊसा। उन सबने किनारा उस्से रक्खा॥

जंग-ए-हुलकर

अठरासो चार और पांच सनमें। दोआब्बा गंग और जमन में॥
फितना था कहीं कहीं बगावत। बाकी थी कहीं कहीं शकावत॥
पैदा हुवे बाद सेंधियाके। दुश्मन ब्रटशके इंडियाके॥
अव्वल था 'जसवंतराव हुलकर'। दोयम था 'अमीरखान' बदबर॥

---

१ शत्रू. २ परस्पर. ३ लढाई. ४ आधीनता. ५ फुलकियाँ झिंद, नाभा, पटियाला.

सिक्खोंको उन्होंने दे के तरगीब । शोरसकी निकाली तरकीब ॥
सिक्ख लोग जमन अबूर[1] करते । 'मेरठ' जाकर फिसाद करते ॥
लेकिन हुलकर से मुकाबला था खूँखार । ब्रटशने मुहमकी की थी तैय्यार ॥
जब गंग और जमनके बीच हुलकर । ब्रटशसे लढा वो खूब खुलकर ॥
यहां तक कि हुवी शकस्त ब्रटिश । फिरतो हुलकरने करके कोशिस ॥
घेरा देहलीको लेके लश्कर । अकतरलूनी था ब्रटश हपसर ।
करनेल था 'ब्रून' उसका नायब । थी जंगमें जिसकी राय सायब ॥
और नऊ रोज तलक मरेठा फौजे । दोनोंके मुकाबले कि मौजे ॥
दर्या के तरह रही वो लेती । ब्रटश भी रही शिकस्त देती ।
लेकिन वो जमी रही बराबर । आखर ब्रटशने मोर्चापर ।
जी तोडके जंग की तो हुलकर । ब्रटशके मुकावलेपे तुलकर ।
आया तो सही मगर होके मजबूर । मैदान से हो गया वो काफूर ॥
हुलकर को शिकस्त सख्त पहुंची । मजबूर रहे फरार ढूंढी ।
जमनाके जनूब को गया वो । नाकाम रहा तो फिर फिरा वो ॥
और सिमते शुमाल को गया वो । सिक्खोंसे मदद न ले सका वो ।
पटियाळा गया जवाब पाया । लाहौर से फिर रजू हो आया ॥
पंजाबमें गया जबसे 'हुलकर' । पीछे लगा 'लीग' ले के लष्कर ॥
पंजाबमें 'लीग' के मददपर । पहुंचे झिंद भी लेके लष्कर ॥
कहने लगे कि ए मुकर्रम । पंजाबमें चूंकि हो मोअज्जम ॥
पंजाब के शेरसे मिलो तुम । ब्रटश के तरफ से ये कहो तुम ॥
हुलकर को मदद न दीजीयेगा । ब्रटश पे ये लुत्फ कीजीयेगा ॥
ब्रटश दौलत रहेगी ममनू । हुलकर जो बना हुवा है मजनू ॥
पंजाब का शेर भाणजा था । कहना मामूका मानता था ॥
पंजाबके शेरने यह सुनकर । हुलकरपे नसीयतोंका दफतर ।
खोला बनलाके टाल और बाल । तलवारको उसने फिर लिया डाल ॥
और सुलह कि उसने रखके बुनियाद । इन्दौर को करलिया जो आबाद ॥

Produced from the Persian Book "*Tawarickh-Phulnama*" with the permission of the author.

---

१ पार.

मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार.

१ हरियाणा

*हिरवी दिसणारी भूमि यावरून ' हरियाणा ' असें म्हणतात. या प्रांतांत धान्याची व दुधातुपाची विपुलता असलेली दिसून येते. या प्रांतांत रहाणारे लोक शरिरानें धष्टपुष्ट दिसतात. हरियाणा प्रांतांतील रोहोतक जिल्ह्यांतील जाट बहुतेक इंग्रजी फौजेंत नोकर आहेत. या प्रांतांतील जमीन अत्यंत सुपीक आहे. या प्रांतांत मुख्यत्वें, रोहोतक, हिसार आणि गुडगांव या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. मीं या प्रांतांत पोंचल्यावर संशोधनास सुरवात रेवाडीपासून केली.

रेवाडी—हा सुमारें १० ह. लोकसंख्येचा गांव असून गुडगांव हें ह्या जिल्ह्यांतील तहसिलीचें ठिकाण आहे. बी. बी. ॲण्ड सी. आय्. रेल्वेचें हें एक जंक्शन स्टेशन असून स्टेशनपासून गांव लागलेलेंच आहे असें म्हटलें तरी चालेल. येथून रेल्वेची एक शाखा भाटिंड्याकडे जाते. शहरांत हायस्कुलें, म्युनिसिपालिटी, कोर्टकचेरी, कन्याशाळा इ. संस्था असून कित्येक प्राचीन व अर्वाचीन मंदिरें व धर्मशाळाहि आहेत.

शहराचे मध्यभागीं एक ' **घण्टेश्वर** ' नांवाचें महादेवाचें प्राचीन मंदिर असून हें मंदिर मराठ्यांनीं बांधलें असें लोक सांगतात. या देवळांत इतक्या घण्टा आहेत कीं, त्यांची गणति करणें झाल्यास कागद व पेन्सिल हातांत घेतल्याशिवाय भागणार नाहीं.

गोकुळगड—रेवाडीपासून दोन मैलांवर ' गोकुळगड ' नांवाचा कसबा आहे. हें पूर्वी अहीर राजाचें राजधानीचें ठिकाण होतें. किल्ल्याच्या तटाचा व आंतील इमारतीचा मुख्य भाग शाबूत स्थितींत

* हा निबंध भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें, त्रैमासिक वर्ष १७ अंक ३ व ४ मध्यें आलेला आहे.

आहे. या अहीर घराण्यांतील विद्यमान दोन घराणीं सांप्रत रेवाडीस नांदत आहेत. रेवाडीच्या मित्रसेन व गंगाविशन या दोघां अहीर राजांचे व मराठ्यांचे कित्येक संघर्ष झालेले आहेत असें इतिहासावरून दिसतें. मराठ्यांचे हुकमतीचे वेळीं हें परगण्याचें मुख्य ठिकाण होतें. लछमनदादा, जगवाबापू, वामनखंडेराव, गोपाळराव भाऊ, इ. मराठ्यांचे सेनापति येथें रहात असल्याचे दाखले सांपडतात.

रेवाडीचें अहीर घराणें-या घराण्यांतील सांप्रत विद्यमान राव रणधीरसिंग, रहीस सफेद घोश, कटरा, रेवाडी; यांचे कडील कागदपत्रांच्या नकला खालीं दिल्या आहेत. यांनीं आपल्यासंबंधीं प्रत्यक्ष सांगितलेली हकीकत व गंगाबिशन व मित्रसेन अहीर यांच्यासंबंधानें आणखी खुलासा—

नंदराम (बोलनीका)

- राव गूजरमल
  - राव भवानीसिंग
    - राव दिलेरसिंग
- राव बालकिसन
  - राणी मयाकुवर, दिवाण मित्रसेन } रामसिंगको गोद लिया

राव मित्रसेनके समय मरेठोंके गोकुळगड पर तीन हमले हुवे. मित्रसेन के दो लडके थे. हरकरण और हरीसिंग. दोनो लढाई मे मारे गये. इसी लढाईमे रामसिंग कीभी मृत्यू हुई. लढाई सं. १८४२ मे हुवी. गंगाबिशन अहीर बोलणी का था. उसकी और मित्रसेनकी शत्रुता थी. स्वयं दिवाण बनना चाहताथा. रामसिंगके पश्चात् राणीसाहाबानें हीरासिंग को गोदमे लिया. मरेठोंने गंगाबिशन को अलग जागीर करदी. हीरासिंग और राणीको अलग जागीर कर दी. गंगाबिशनको पुत्र नहीं था. उसने मीरपूरका बालकिशन नामका एक लडका गोद मे लिया. ”

" राणी मयाकुवर और झौकीराम इन दोनोके बीचमे नाइत्तफाकी रही. राव गंगाबिशन मरचुके थे. तेजसिंगनें गंगाविशन के वशीलेसे तरक्की करी. उसने झौकीराम को मार दिया. "

तेजसिंग

राव जवदारसिंग	राव नाथूराम	राव पूरणसिंग
	राव गोपाळदेव	राव तूळाराम
	राव लालसिंग	राव ज्युधिष्ठिरसिंग
	राव रघुवीरसिंग	राव बलवीरसिंग
	राव रणधीरसिंग (सांप्रत हयात)	(सांप्रत हयात).

क्र. १
मू. न.

श. १७०८ वैशाख वद्य ११
इ. १७८६ मे २४

शहाअलम बादशहा गाजी फिद्बी सवाई माधोराव नारायण बहादुर मुख्यदुस्सलतनत आसातीन, दारुलखिलाफा श्रीनाथ मनसूरे जमा नायब महाराजाधिराज माधोराव सेंधिया अलिजाबहाद्दर वकील मुतल्हिक उलमुमालिक उमदतुलउमरा. स. २८ जलूस.

कमाविसदार वर्तमान व भावी प्रो रेवाडी सुबे शहाजहाँबाद बिदानंद राव गंगाबिशन चौधरी यांनीं येऊन विदित केलें कीं आमजे पुस्त्यानपुस्त चौधरीपणाची बाबत चालत आली आहे. फर्मान पादशाही व सुभेदार वं कमाविसदार यांचेकागदपत्र जवळ आहेत तरी कृपाळू होऊन सरकारांतून भोगवट्यास सनद दिली पाहिजे त्यावरून मनास आणितां पादशाही फर्मान वगैरे कागदपत्र पाहून ही सनद भोगवट्यास दिली असे.

ह्या ग्रंथांत आलेल्या ऐ. जुन्या सनदापत्रांतील जुलूस, फसली, सुहूर, संवत् वगैरे सर्व सनांचे शक व इसवी सन देण्याचें काम श्री. **शं. ना. जोशी** यांनीं केलें आहे.

मौजे गुरावडे वगैरे पेटे सात प्रो मा अलतमगा राव बालकिशन गूजरमल यांचे नांवे पादशाही फर्मान मौजे गुरावडा सायर जमीनदारी मौजे निसाना छीथरी नंदरामपुर राजीयाक मीरापुर मदोला एकूण गांव ७ सात....

मौजे फतहपुरी वगैरे प्रो मजकूर पैकीं पेटे ९ नऊ जमीनदारी एक हिसा सरकार व तीन हिस्से रयत

मौजे छीलडा धारुहेडा पाचोर खुरमपुर पचगांवा निगानियावास पीठणवास ... सगवाडी फतहपुरी इ. एकूण गांव ९

एक हिस्सा सरकार व तीन हिस्से रयत सायर कटडा राव गुजरमल याणी केला होता व दरोबस्त चुंगी जमीनदारी माफ असे ....कलम १

२८००० रु.

सदर्हू प्रमाण करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी राव मशारनिल्हे यांजकडे चालविणें कोणे गोष्टीची दिक्कत न करणे जाणिजे छ २५ माहे रज्जब सुरुसन शीत सम्मानीन मय्या व अल्लफ

मोर्तब
सुद.

क्र. २
मू. न.

श. १७०८ पौष व. ३०
इ. १७८७ जाने. १९

शहाआलम बादशाह गाजी फिदवी सवाई माधोराव नारायण बहादुर मूय दुस्सलतनत, उलअसातनि उलखिलाफत, सवाई श्रीनाथ मनसूरेजमा नायब महाराजाधिराज, माधोराव सेंधिया वकीलमुतलक, मुमालिक उमदतुल उमरा अलिजा बहादूर

ताकीद कमाविसदार परगणे तावडू सूबे शहाजहाँनाबाद—राव गंगाविशन चौधरी परगणे रेवाडी याची जमीनदारीचा परगणे मजकुरीं वसूल वगैरे कोठे असेल तर तो राव मशारनिल्हेस पावते करवीत जाणें. पुन्हां सरकार पावेतो राव मशारनिल्हेचा बोभाटा येऊं न देणें जाणिजे छ १५....

तेहेरीर पाजदहम रबीउलअवल स. २८ जलूसीवाला

मोर्तब
सुद

क्र. ३ }
मू. न. }

{ श. १७११ भाद्र. व. ४
{ इ. १७८९ सप्टें. ८

(शहाआलम बादशाह गाजी फिद्वी जनरल पेश्न बहाद्दर मुजफ्फर उल-मुल्क, नासेरइन्तिजा मुद्दौला.)
३१ जलूस

पुरखंती बा....बालकिशनसिंग वल्द तेज-सिंग इजारदार प्रो सोना-आर्बा तिस्सैन मय्या व अल्लफ. स. १२०१ फसली प्रो मजकूर येथील साल तमाम जमा व कबुलायत

४८०५३॥ ऐनमाल
१९४७॥ सायरबद्दल जमा
५०००१
पो मजराई बाब वगैरे.

११३७१८॥· स. १२०१ बद्दल हिसाब अलाहिदा.
३०५०।·। नानकार वगैरे बद्दल.
८०० नानकार कानुनगो.
२२५०।·। मोकदमी.
३०५०।·।

८३२०॥·। हिस्सेरसद. ८३२०॥·। हिसेरसद. सिबंदी खर्चाबद्दल.

२१५२८≡॥ हिशेबी बाकी निघाली होती तिचा फडशा छावणी मथुरेचें मुक्कामीं झाला जे समयीं माफी.

१३५२३।· बाकी वसूल जमा बा तपशील. २१४७७॥· दाखल. ५००० दाखल सन १२०६ फसली ५००० दाखल. छ. ३०–२५०० छ ३०–२५०० रु.

एकूण– ३६४७७॥· छत्तीसहजार चारशे सत्याहत्तर रु. बारा आणे दिली शिक्का भरणा तुम्हीं सरकारांत करून दिला त्याचा कब्जा दाखल पेशमी अलाहिदा दिल्हे आहेत जाणीजे छ १७ जिल्हेज तिस्सा* तिस्सैन मय्या व अल्लफ

मोर्तब
सुद

*हा शब्द अधिक वाटतो व प्रारंभीं आलेला सुहुर सनाचा उल्लेख जुलुस सनाशीं जमत नाहीं. वर दिलेली मिती जुलूस धरूनच काढलेली आहे.—शं. ना. जो.

क्र. ४
मू. न.

श. १७१४ ज्येष्ठ शु. ३
इ. १७९२ मे २४

(फारसी व थोडें मोडी फाटलें आहे.)

(शहाअलम बादशाह गाजी फिद्वी सवाई माधोराव नारायण बहादर मूयदुस्सलतनत असातीन उलखिलाफा सवाई श्रीनाथ मनसूरे जमा नायब महाराजाधिराज माधोराव सेंधिया अलिजाबहादर वकील मुतलीक मुखत्यार उलमुमालिक उमदतुल उमरा फर्जंद अर्जमंद अजीज ३४ जलूस.)

आमिलान हाल व इस्तकबाल परगणे रेवाडी मुजाफात दारुल खिलाफा शहाजहांबाद विदानंद—वकील काशीराम व खेमचंद ......वगैरा जमींदारान् मौजा रालियावास आमला परगणा बतौर इलतमास नमूदनीक, पट्टेदारी, देहात, अजकदीम, बमुजब असनाद राव मितरसेन व राव अमृतराव व राव विश्वासराव बनाम मुकर्रिर अस्त उमीदवार अस्त पर्वाना दरगाहे मुताबिक आँ मरहमत सूद. हसबुल हुकुम आला कलमी गर्द के मशारनिल्हे रा हसबुलजमन मुकरिर दास्ता बदस्तुर साबिक पट्टेदारी देहात मजबूर बागुजारन्द वो अजतदस्त ईशान कुलेदेहात मी गिरफता बशान्द बवजह मनउल बवजुहु. मुजाहिम के मुकर्र नशबंद. दर-इं बात ताकीद आकीद विदानंद बतारीख दोम शेहेर सव्वाल मुकर्रम् स. ३४ जलूस कलमी सुद.

इबारत जहुरि मुकार्रि जमंद फरो गुजारिंदा वकील काशीराम व खेमचंद वगैरा जमिदारान् मौजा रालियावास बदस्तकत् बदफतर रसीदके पट्टेदारी देहात जएल बमुजिब असनाद मोहोरी राव मितरसेन व अमृतराव व विश्वासराव बनाम व कीलान् मुकर्रि अस्त आमीलान् हाल व इस्तिकवाल मरहमद शुद. कैफियत अस्तके बकलम आमदा नकलखत आं किसाद्.

रालियावास जडपळ आशियाकी पाचोद डुंगरमाळी, खिजुरी, आजमावाद मालडावास मिगाणीयावास कान्हावास सांपळी, पचगावा......

क्र. ५ } { श. १७१४ कार्तिक व. ५
मू. न. } { इ. १७९२ नोव्हें. ४

श्रीमल्हार

मौज सराय प्रो। तावडू जमा रु. ५१ एकावन फसल खरीफ सन १२०० *फसली फसल खरीफ, राव गंगाबिशन यांस...... ....(फाटलें आहे)....खर्चास दिल्हा असे. तरी तुम्ही आपले सरंजामा सुद्धां तेथें आबाद होणें. छ १८ हप्तदहम रबीउल-अवल सन ३४ जलूस

मोर्तब
सुद.

क्र. ६ } { श. १७१४ फाल्गुन शु. ७
मू. न. } { इ. १७९३ फेब्रु. १७

शहाआलम बादशाह गाजी नायब माधोराव सेंधिया अलिजा बहाद्दर फिद्वी राजा समशेर बहाद्दर खंडेराव हरी.
१२०६ हिजरी

राव हीरासिंग परगणे तावडू प्रांत मेवात यांचेकडून सुरूसन सल्लास तिस्सैन मय्या व अल्लफ पासोन प्रो। मजकूरचा पट्टा साल दरसाल ठराव करून महाल मजकुरी खर्च व मोकदमी परभारे जाऊन निव्वळ सरकारांत ऐवज येणें तो खालीलप्रमाणें

सन १२०२ फसली सालाबद्दल रब्बीची फसल जमा-खर्चांत परभारें बाकी येणें.

५००० रु. स. १२०३ बद्दलचा ठराव महाल मजकूर कारण मोकदमी खरीफ २५०० रब्बी २५००

५००० रु. स. १२०४ बद्दलचा ठराव २५०० = २५००

५००० रु. स. १२०५ बद्दलचा ठराव ,, ,,

१५००० रु.

---

* जुलूस धरून तारीख काढली आहे. फसली उत्तरी पद्धतीचा धरला म्हणजे जुलूस, फसली व शक बरोबर येतो.—शं. ना. जो.

एकूण पंधरा हजार १५००० जमा तीन सालाबद्दल खर्च वगैरे वजा जाऊन ठराव करून दिली असे. साल दरसाल फसल सरकारांत ऐवज दिल्ली सिक्का आदा करीत जाऊन रय्यत आबाद राखोन अमल करीत जाणे परगणे मजकूरचा बंदोबस्त यथास्थित राखित जाणें छ ५ रज्जब

मोर्तब
सुद.

क्र. ७ }
मू. न.

{ श. १७१८ भाद्र. शु. ८
{ इ. १७९६ आक्टो. ९

मोडी

ज्योतिस्वरूपच[1] रणीं तत्पर महाद[1] जी सूत दवलतरा[1] व सिंदे निरंतर

[1]राजश्री जगन्नाथराम व लक्ष्मण अनंत गोसावी यासीं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री ——— दवलतराव सिंदे रामराम विनंती की इकडील वर्तमान कुशल जाणोन स्वकीयें लिहीत जाणें रावगंगाबिशन रेवाडीवाला याची जमीन प्रो रेवाडी येथें आहे त्यास पातशाह याणीं हमदस्तुर करून दिल्हा असे त्याप्रमाणें त्याचे चुलते रावगूजरमल यांचे कारकीर्दी पासोन त्यांजकडे भोगवटा चालत आला सध्या त्याचे भाऊबंद दिकत करीत आहेत म्हणोन कळले त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहीत आहे तरी ये विसी तुम्हीं बंदोबस्त व ताकीद करून पूर्वीपासून चालत आल्या प्रमाणें त्यांची मिलकत त्याजकडेस चालेल ते करणे आणि खंडेराव हरी यांनीं त्याचे कबिले मुलामाणसासुद्धां अटकावून ठेविले आहेत त्यास ताकीद करून सोडून देणें व [2]जहांजफिरंगी पलटणवाला यानें येऊन जी चीजवस्त नेली

---

१ ह्या लेखांकांतील शिक्क्यामधील मजकूर मूळ शिक्क्यांतील ओळीशीं ओळ असा घेतां आला नाहीं.

२ George Thomas.

आहे ती त्यास ताकीद करून माघारी देणें जाणिजे छ ७ माहे रबिलावल बहुत काय लिहिणे हे विनंति

मोर्तब
सुद.

पत्राच्या मागील बाजूस फारशी तेहेरीर

चिठ्ठी महाराजा दवलतराव बइस्म जगवाबापू लखवादादा दर्याफ्त चौधरासत रेवाडी बमुजब फरमान अजकदीम दरतसरुफ राव गंगा-विशन रेवाडीवाला सुरुसन सब्बा तिसेन मय्या व अल्लफ.

क्र. ८ | श. १७१९ माघ शु. १३
मू. न. | इ. १७९८ जाने. ३०

पत्र मोडी

राजश्री वामनाजी खंडेराव गोसावी यांसी,

ज्योतिस्वरूप चरणीं तत्पर महाद्‌जीसुत दवलतराव सिंदे निरंतर.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्री—दवलतराव सिंदे दंडवत विनंती उपरांत इकडील कुशल जाणोन स्वकीय वर्तमान विदित करणें राव गंगाबिशन यांचे कबीले मुलांमाणसांसुद्धां तुम्ही अटकावून ठेविले आहेत म्हणोन मशारनिल्हे इसम यांणीं येऊन सांगितले त्यावरून हे पत्र तुम्हांस लिहीत आहे तरी तुम्हीं कबीले अटकावून ठेविले असल्यास सर्व चीजवस्त सुद्धां सोडून देऊन हरएकविसी बरदास्त करीत जाणें जाणिजे छ १२ साबान सुरु सन सम्मान तिस्सैन मय्या व अल्लफ

मोर्तब
सुद

तेहेरीर फारसी चिठ्ठी दवलतराव सेंधिया बहादूर बनाम वामन खंडेराव दर्याफ्त गुजास्त मुतल्लीकान राव गंगाबिशन रेवाडीवाला.

३

क्र. ९
मू. न.

श. १७२१ वैशाख शु. ६
इ. १७९९ मे ११

ज्योति स्वरूप चरणी तत्पर महाद्जी सुत दवलतराव सिंदे निरंतर.

राजश्री जगन्नाथराम व लक्ष्मण अनंत गोसावी यासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री—दवलतराव सिंदे रामराम इकडील कुशल समजोन स्वकीय कुशल विदित करणें..................राव गंगाबिशन याजकडेस सरकारांतून मामलत प्रा॰ रेवाडी येथील सांगोन तुम्हाकडे रवानगी करून पाठविला आहे तरी मशारनिल्हे तेथें पोहोंचल्यावर सरकार आज्ञेप्रमाणें कामकाज उगवून घेऊन महालीं रवाना करून देणें जाणिजे. कोणे विसी दिवसगत न लागे ते करणें महाल मेवात प्रांतीं आहेत त्यांच्या रसदेची तडजोड लावून दिल्ही पाहिजे जिकडून सरकारी किफायत दृष्टीस पडेल ते करणें महाली आबाद करून घेणें जाणिजे छ ५ जिल्हेज सुरुसन तिस्सा तिस्सैन मय्या व अल्लफ

मोर्तब
सुद.

फारसी चिठी महाराजा दौलतराव सेंधिया बहादुर बइस्म जगवाबापू, लखवादादा.

क्र. १०
मू. न.

श. १७२१ श्रावण शु. ११
इ. १७९९ आगष्ट ११

मोडी

ज्योतिस्वरूप चरणीं तत्पर महादजीसुत दवलतराव सिंदे निरंतर

राजश्री जगन्नाथराम व लक्ष्मण अनंत गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री—दवलतराव सिंदे रामराम विनंति विशेष इकडील वर्तमान कुशल समजोन स्वकीय कुशलवृत्त लिहित जाणें राव गंगाबिशन रेवाडीवाला याणें

येऊन अर्ज केला कीं मौजे मजकूर येथील इजारा पहिलेपासोन आम्हाकडे होता त्यास आमचेकडून महाल काढोन खाजगीकडे ठेविला येविसी सरकारांतून पत्र देऊन इजारा पूर्ववतप्रमाणें आम्हाकडे चालविला पाहिजे म्हणोन सांगितलें व त्यावरून हें पत्र तुम्हास लिहीत आहे. तरी परगणे मजकूर येथील जमेचा आकार पाहून जो इजाफा ठरविणें असेल तो ठरवून इजाऱ्याच्या सनदा करून देऊन राव मशार-निल्हे यास महालनिहाय इनाम करून देणें छ ९ माहे रबिलावल सुरू सन मय्यातेन व अल्लफ बहुत काय लिहिणें हे विनंति

मोर्तब
सुद

तेहरीर फारसी बनाम लखवादादा जगवाबापू पेशकार दवलतराव सेंधिया बहादुर दर मुकदमा मुस्तीजरी प्रगणे रेवाडी राव गंगाबिशन.

रेवाडी गांवाच्या आसपास प्राचीन इमारतींचे अवशेष दिसत नाहींत यावरून मराठ्यांचें वास्तव्य गोकुळगडांतच त्यावेळीं असे, असें अनुमान निघतें. मराठ्यांच्यापूर्वी, नजफकूलीखान व मिर्झाइस्माइलबेग यांनीं गोकुळगडावर वेळोवेळीं हल्ले चढविले होते त्याचा उल्लेख इतिहासांत सांपडतो. रेवाडीस येणाऱ्या महाराष्ट्रीय प्रवाशानें तेथून फक्त दोनच मैलावर असलेला हा ‘ गोकूळगड ’ अवश्य पहावा. सांप्रत जरी तो पडक्या स्थितींत आहे तरी आपल्या पूर्वकालीन वैभवाचें स्मृतिचित्र प्रवाशाच्या अंतःकरणांत कांहीं वेळ तरी उभे करितो.

येथील अहीर रावराजांच्या दोन घराण्यांपैकीं ‘ राव रणभीरासिंग ’ यांच्याकडील कागदपत्रांच्या नकला यापूर्वीच मीं दिल्या आहेत. दुसरें घराणें रावबलवीरसिंग यांचें होय. पण त्यांच्याजवळ जुने कागदपत्र नाहींत असें मला त्यांनीं सांगितलें. तेव्हां येथून ‘झज्झर’ येथें जाण्याचा बेत ठरविला. मराठ्यांच्या हुकूमतीची स्मृती येथील कित्येक लोकांना आहे. मराठ्यांचें राज्य गेल्यावर व इंग्रजी राज्य प्रस्थापित झाल्यावर

इंग्रजानीं रेवाडीस जे पहिले तहशीलदार नेमिले ते ' रंगराव ' नांवाचे एक महाराष्ट्रीय ब्राह्मण होते असें येथील वृद्ध सांगतात.

रेवाडीहून " झज्झर " ३२ मैल पडतें. पावसाळ्यामुळें मोटारींची वहातूक बंद असते. कच्ची सडक आहे. पावसाळ्याखेरीज इतर दिवसांत रेवाडीहून ' झज्झर ' ला जाण्याच्या मोटारींची गर्दी असते. यासाठीं मला हा प्रवास पायीं केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. रेवाडीहून निघून तेथून १६ मैल अंतरावर असलेल्या ' पाटोदा ' गावीं जाऊन मुक्काम केला.

पाटोदा—

सुमारें पंधराशें लोकसंख्येचें हें खेडें रोहोतक जिल्ह्यांतील झज्झर तहसिलींत आहे. हा कसबा बराच प्राचीन दिसतो. येथील ' राधाकृष्णाचें मंदीर ' मराठ्यांनीं बांधिलें आहे असें लोक सांगतात. देवळाचे सांप्रतचे पुजारी पंडित जगन्नाथ शर्मा नांवाचे गौड ब्राह्मण, ब्राह्मण असून त्यांच्या पूर्वजांना ५० बिघे जमीन व २ कूवे मराठ्यांचे कडूनच मिळाले. ते सांप्रतही त्यांचेकडे चालत आहेत. आमच्या जवळील सनद माझे वडीलांनीं कचेरींत दिली ती परत मिळाली नाहीं पण हें मंदिर मराठ्यांनींच आपल्या हुकमतीच्या वेळीं बांधून आमच्या पूर्वजांनी जीवीका (जमीन) लावून दिली. कानोडचा किल्ला सर करण्याकरितां मराठा सेनापति फौजा घेऊन जात होते व त्यांनीं येथें एक दिवस मुक्काम केला. त्यावेळीं माझ्या पूर्वजांना या सेनापतीनीं कांहीं ज्योतिषविषयक प्रश्न विचारिले व त्या प्रश्नांचीं उत्तरें पुढें खरीं ठरल्यावर आम्हास हें दान दिलें." अशी कथा माझे आजोबा सांगत व गांवांतील वृद्ध मंडळी अजूनहि हीच कथा सांगतात. हा कसबा मध्यवर्ती असा असल्यामुळें दिल्लीहून उत्तरेस व पश्चिमेस जाणाऱ्या मराठ्यांच्या फौजा पाटोद्यास मुक्काम करून कित्येक दिवस रहात असत, असें इकडील लोक अजूनही सांगतात. पाटोद्याहून झज्झर १६ मैल पडतें.

झज्झर—

रोहोतक जिल्ह्यांतील हें तहसिलीचें ठिकाण असून लोकसंख्या सुमारें पंधरा हजार असावी. ‘ जूझन ’ नांवाच्या एका मनुष्यानें हा गांव बसविला व त्यावरून “ झज्झर ” हें नांव पडलें असें लोक सांगतात. शहरांत हायस्कूल, म्युनिसिपालिटी, कोर्ट कचेरी, दवाखाना, इ. संस्था आहेत. धर्मशाळा नसल्यामुळें प्रवाशांची फार गैरसोय होते. मी येथील सुप्रसिद्ध व इतिहासप्रेमी गृहस्थ पं. उमादत्तशर्मा एम्. ए., एलएल्. बी. ॲडव्होकेट, यांचेकडे मुक्काम ठेविला होता.

गांवाभोंवती तट नाहीं. नुसते दरवाजे आहेत. त्यांचीं नांवें—दिल्ली दरवाजा, घोषी दरवाजा, माता दरवाजा, बेरीदरवाजा, शिलाणीदरवाजा घडी दरवाजा इ.. गांवाचे मध्यभागीं एक घण्टाघर आहे. झज्झरहून दिल्लीस मोटारींची रहदारी एकसारखी सुरू असते. येथून दिल्ली सुमारें ५० मैल दक्षिणेस आहे. गांवाच्या बाहेर एक प्राचीन तलाव असून त्यास सुंदर घाट बांधिलले आहेत व सभोंवार प्रवाशांच्याकरितां पक्क्या इमारती आहेत. झज्झरच्या लोकांचें संध्याकाळच्या वेळचें हें एक क्रीडास्थानच आहे असें म्हटलें तरी चालेल. या प्रांतांत मराठ्यांची हुकूमत होती ही गोष्ट सर्वांस ठाऊक आहेच.

स्मृति— मराठ्यांच्या पूर्वी हा प्रांत नजफकूलीखानाच्या ताब्यांत होता. “ मरेठा लोक जब झज्झर मे आगये, तब यहांके हिन्दू प्रजाको बडा हर्ष हुवा. मराठोंनें हिंदूओके एकत्रित किया और पूछा कि तुमारे गाव मे कोई मंदीर नही है. मंदीर होना चाहिये और उसी वख्त शिवजीका मंदिर बनवाया जो इस समय झज्झर मे “ बूढा शिवालय ” नामसे महशूर है. सेंधिया के सेनापती, आपा खांडेराव, और गोपाळराव भाऊ, पंडीत नीलकंठराव, और लछमनदादा, जगवाबापू इ. हमारे प्रांतमे हुकूमत करते थे, ” या मराठ्यांच्या सेनापतींचीं नांवें सर्व वृद्ध माणसांच्या जिभेवर खेळत आहेत.

तवारीख झज्झर मधील उतारे

" तवारीख झज्झर " लेखक गुलाम नब्वी मेरठी. जुलै १८६५ मतवा फैज अहमद लाहोर. ही फारसी तवारीख मि. खैर महंमदखां, सैय्यद मोहीला, झज्झर यांचेकडे मिळाली.

" महादजी सेंधिया का एक सरदार जिसका नाम ' आपा खांडेराव ' था और उसका राजा समशेर बहादर था. सेंधियाने उसके सपूरद दो पलटणे कियी थी. उसने बुंदेलखंडपर हमला किया, फतह न हुवा. कर्जा हो गया. सेंधियानें नाराज होकर अखत्यार छीन लिया और अलहिदा कर दिया. मगर आपा खांडेराव आली दिमाख और बडा होसलेवाला था. लढाई के जोरपर ' मेवात ' को दबाता हुवा हरियाणा मे आगया, झझरपर अमलदारी मरेठोंकी हो गयी. पंडित नारोपंत बापू शंकर फडणीस, रामचंद्रभाऊ, नीलकंठराव, लछमनदादा, झझरकी हुकूमत करते रहे.

" आपाखांडेराव ने अपने पास जार्ज थॉमस एक फिरंगी नोकर रखा. मेवातके लोग बागी हो गये थे उनको ठीक करनेके लिये थॉमस को भेजा. और तनखाके लिये तिजारा, डपूकडा, फिरोजपूर झिर्का, नू इ. प्रांत तोड दिया. थॉमस वफादार नोकर था. आपाखांडेराव मर्द बहादुर था.

" इतनेमे पेशवा के खत महादजीको मिले, और, महादजी हिसाब करनेके लिये पूना गया. महादजी सेंधिया अपनी जगाहपर गोपाळरावभाऊ, तुकोजी होळकर, और अलीबहादर को छोड कर पूना गया, वही उसकी मृत्यू हुई. "

" बापू शंकर फडणीस सरकार पूनाका हाकम था. सेंधियासे रुपिया मांगता था. आपा खांडेराव का और उसका झगडा हो गया. परन्तु थॉमसने बीचमे होकर, कुछ गांव गिर्वी रखकर उसको रुपीया

देदिया और पूनाको भेज दिया. मेवात मे " गंगाबिशन अहीर " जो सिपह सालार था, उसको थॉमसने पकडलिया. बाद छोड दिया. थॉमसने अपनेपास बहूत फौज रखी. उसने आपना एक गड कायम किया था जिसका नाम जॉर्ज गड रक्खा, जो अभी जहाजगड कहलाता है. थॉमसने अपनी राजधानी " ठांसी " कायम किया.

"आपा खांडेराव के मृत्यूके पश्चात उसका लडका ' वामनराव ' कानोड के किलेमे तक्खतनशीन हुवा. उसने थॉमसकी रियासत छीननेकी कोशिस किया. ' वामनराव ' नातजरु बेकार था.

" महादजीके मृत्यूके पश्चात और आपाखंडेराव के मरनेके बाद मरेठोका सिराजा बिगडने लगा. दौलतराव सेंधिया को ' जनरल पेरन ' ने बहका दिया कि थॉमस की रियासत छीननी चाहिये. बाद ' पेरन ' और थॉमस की कई लढाईया हुई.* थॉमस अंग्रजीमे भाग गया. "

" नसवारीके युद्धके पश्चात मरेठोंकी हुकूमत का खातमा होगया. लेकिन जसवंतराव हुलकरनें फिर ' झझरपर ' हमला किया. हुलकर के तरफसे. मिर्झा असदबेग नारायणराव, और हरनाथराय झझरकी हुकूमत करते रहे. आखिरकार इ. स. १८०५ मे मरेठोकी हुकूमत पुरीतौर खतूम हुई. जसवंतराव को लढाईमे परास्त किया और अंग्रेजोनें नबाबी कायम कियी. "

लोककथा—झझर येथें मराठ्यांचें नांव अजरामर आहे. " वाहवारे जसवंतराव बहादुर सवाई डंका बजा दिया "। हे लोकगीत इकडे सर्वतोमुखी आहे. मुसलमानी जुलमी सत्तेस इकडील हिंदू प्रजा अगदीं कंटाळून गेली होती. या प्रांतांत मराठी सत्ता प्रस्थापित झाल्यावर इकडील हिंदू प्रजेस त्यावेळीं जो आनंद झाला

* See Military Memoirs of George Thomas written by Mr. Francklin.

त्याचें चित्र झज्झरच्या कित्येक सुशिक्षित गृहस्थांनीं माझ्या दृष्टीसमोर जें उभें केलें तें मी कधींही विसरणार नाहीं. येथील लोकांनीं माझें जसें स्वागत केलें तसें इतरत्र कोठेंहि झालें नाहीं. शेकडों लोक माझ्याशीं संभाषण करण्याकरितां येत. पण ही मराठी सत्ता पंचवीस वर्षांपेक्षां ज्यास्त दिवस टिकली नाहीं; व इ. स. १८०५ मध्यें पुन्हां येथें नबाबी स्थापित झाली. अर्थात् झज्झरच्या एकाच पिढीनें हिंदू राज्य अनुभविलें.

ही नबाबी* अत्यंत जुलमी व दुःसह होती. पुन्हां मुसलमानी अमलांत गेल्यामुळें इकडील हिंदू प्रजा रडूं लागली व त्यांना मराठ्यांची आठवण होऊं लागली. पण काय उपयोग ! ! हा नबाब हिंदु स्त्रियांना एकत्र जमवून त्यांच्याशीं 'होळी' खेळत असे, व याशिवाय अत्यंत घाणेरडे व हिंदूंना चीड आणणारे असे प्रकार त्यावेळीं घडून आल्यामुळें इकडील स्त्रिया मराठ्यांचें नामस्मरण करूं लागल्या होत्या. **हमारे होलीखेलन आवे नबाब। कहोना मेरठा उनको मारे।** हें लोकगीत इकडील स्त्रिया त्यावेळीं गात असत. पुढें ही नबाबी† इ. स. १८५७ सालच्या बंडानंतर नष्ट झाली. त्यावेळचे नबाब अबदुल रहिमानखा यास इंग्रजांनीं फांसी दिली व हा प्रांत इंग्रजी राज्यास जोडला.

जहाजगड, बेरी, दुबलधन--

झज्झरहून दाद्री ३२ मैल पडतें. पावसाळ्यामुळें मोटारी बंद होत्या. सबब पायीं जाण्याचें ठरविलें. दाद्रीहून झज्झरकडे जाणारे व येणारे पुष्कळ लोक भेटतात. कच्चा रस्ता आहे. झज्झरहून बेरी नऊ मैल पडतें. पक्की सडक लागते. हीच सडक पुढें रोहोतककडे जाते. बेरी हा प्राचीन कसबा आहे. तेथें कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र मिळाले नाहींत. परत फिरून 'जहाजगड' येथें आलों. जार्जगडचा अपभ्रंश जहाजगड झालेला आहे. येथें पूर्वी जहाज

---

* Jhaggar Nabab, was the creation of the British.

† या नबाबाचे वंशज लखनौ येथें आहेत असें म्हणतात.

फिरंगी ऊर्फ जॉर्ज थॉमस रहात असे, ही गोष्ट जहाजगडच्या सर्व लोकांना माहीत आहे. जहाजगडचीं मुलें बेरीच्या हायस्कुलांत रोज जातात. जहाजगडची लोकसंख्या सुमारें एक हजार असावी. बेरी मोठा गांव आहे. जहाज येथें प्राचीन किल्याचे अवशेष दृष्टीस पडतात. सांप्रत ही किल्याची जागा जेलदाराच्या ताब्यांत आहे. किल्यांत तोफांचे गोळे सांपडतात. कांहीं वर्षांपूर्वी जमीन खणली असतां भाजलेले चणे सांपडले असें लोकांनीं सांगितलें. येथें लुइन बोरक्वीन व थॉमस या दोघांची लढाई झाली होती हीहि गोष्ट सर्वांना माहीत आहे. जहाजगड येथें 'काशीराम' पटवारी यांचेकडे माझा मुक्काम होता. कोणत्याहि प्रकारचीं कागदपत्रें पहावयास मिळालीं नाहींत. येथून सुमारें ८ मैलांवर दुबलधन नांवाचें खेडें लागतें. येथेंहि मराठ्यांच्या हुकूमतीच्या वेळचीं कांहीं स्मृतिचिन्हें असल्याचें कोणीं सांगितलें नाहीं. येथून मजल दर मजल करीत पांच सहा दिवसांनीं दाद्रीस पोंचलों.

झझरच्या नबाबाची मोहोर

शरे मिनशम्स खा-
दिन काजी बद्रुद्दीन
झझर. दीवाण किशन-
लाल. बिस्तचाहारून रबि-
उल अवल १२४४ हिजरी.

नजफकुलीखानाची जुनी मोहोर.

अहंमदशाह जंगबहा-
दुर हस्तादर दुर्रानी फिद-
बी बक्षी उलमुल्क, अमी-
रउलउमरा असतउद्दौला.
नजफकुलीखां बहाद्दर.
११८२ हिजरी.

स्वाद

दाद्री—

बी. बी. ॲण्ड सी. आय. रेलवेचें स्टेशन चर्खी दाद्री. हा गांव सांप्रत झिंद संस्थानाचें जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. चर्खी आणि दाद्री या दोन गांवांत अंतर आठ मैलांचें आहे. प्राचीन

कागदपत्रांत दाद्रीचा उल्लेख ' दाद्री चालकलियाणा ' या नांवानें केलेला आढळतो. चालकलियाणा हा गांव दाद्रीपासून आठ मैलांवर आहे. गांवांत हायस्कूल, दवाखाना, कोर्ट कचेरी, म्युनिसिपालिटी इ. संस्था आहेत. हा कसबा फार प्राचीन आहे यांत शंका नाहीं. गांवांत कित्येक प्राचीन मंदिरें व धर्मशाळा आहेत, यासाठीं प्रवाशास कोणत्याहि प्रकारची गैरसोय भासत नाहीं. गांवांत मरेठा गौडांचीं शंभर घरें आहेत. स्टेशनपासून गांवाचें अंतर एक मैलाचें आहे. स्टेशनपासून गांवांत जाऊं लागलें म्हणजे उजव्या बाजूस एक गढी दिसते. समोर थोडीशी बाग आहे. येथें झिंद संस्थानच्या कचेऱ्या आहेत. हा भाग प्राचीन आहे असें लोक सांगतात. तसेंच दाद्रीस मराठ्यांचा मोठा तोफखाना होता असें कांहीं लोक सांगतात. मराठ्यांची हुकमत येथें होती ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. येथें पं. भीमसेन शर्मा यांच्याकडे मुक्काम ठेविला होता.

दाद्रीचे मरेठा गौड ब्राह्मण---

येथें जे ब्राह्मण आहेत ते बहुतेक सर्व मरेठा गौड आहेत. कित्येक वृद्ध गृहस्थांना एकत्र करून यासंबंधानें विचारपूस केली. कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र कोणाजवळहि नाहींत. यांच्यांत 'पंत' आणि 'प्रधान' अशीं नांवेंहि असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. " आम्ही पहिल्या बाजिरावाचे वेळीं दक्षिणेंतून इकडे आलों " असें कित्येक वृद्ध गृहस्थांनीं मला सांगितलें. यांच्यांत चुलेठा, पुरोहित, मुदरहट्ट, अशीं निरनिराळीं शासनें आहेत. पैकीं ' मुदरहट्ट ' शब्दाचा अपभ्रंश 'मरेठा' असा झाला असावा असें मला वाटतें. सांप्रत यांचा रोटी व बेटी व्यवहार या प्रांतांतील सर्व गौडांशीं होतो. पुष्कळ प्रयत्न केला परंतु कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र उपलब्ध झाले नाहींत.

दाद्री येथें ' मुसद्दीलाल ' नांवाचे गौड ब्राह्मण रहातात. यांच्या पूर्वजांना मराठ्यांकडून ' सातोर ' ' मंदोली ' व ' घसोला ' हे गांव

जहागीर मिळाले होते. मराठ्यांचे हुकूमतीनंतर येथें झझर नबाबाचा अंमल सुरू झाला. तरी हे गांव त्यांच्या वंशांत चालत राहिले. पण झिंद संस्थानाची हुकूमत सुरू झाली तेव्हां हे गांव निष्कारण जप्त करण्यांत आले. मुसद्दीलाल यांनीं पुष्कळ दाद मागितली पण उपयोग झाला नाहीं. मराठ्यांनीं दिलेल्या जमीनी कोठेंहि व कोणीहि संस्थानानें हिसकल्या नाहींत असें, राठ, हरियाणा व मेवात या तिन्ही प्रांतांत मला दिसलें. पं. मुसद्दीलाल यांचें उदाहरण हें एकच अपवाद ठरतें. त्यांचे जवळील कित्येक अस्सल कागद झिंद संस्थानांतील कोर्टांत पुराव्याकरितां गेले. जे कांहीं कागदपत्र पाहिले त्यांच्या नकला घेतल्या त्या खालील प्रमाणें—

क. ११ } मू. न.

{ श. १७२९ पौष शु. ७
इ. १८०० जाने. २

फारसी

शहाआलम बादशाह गाजी फिद्वी सवाई माधोराव नारायण बहादुर, फर्जंद खासउलखास, मउझाजा, पंडितप्रधान, महाराजाधिराज, सवाई मनसूरे जमासावित उल इस्तिकलाल, वकील मुतल्लिक-अमीर उल उमराव-महाराज दौलतराव सेंधिया बहादूर.

स. ४२ जलूस

आमिलान हाल व इस्तकबाल परगणे दाद्री चालकलियाणा बिदानंद मिश्र 'नथमल' व 'कणीराम' खलफ मिश्र सीलचंद, बहुजूर इलतिमास नमूदन कि मौजे 'मंदोली' परगणे मजकूर दरवज्जे पुण्यर्थ बिनावर मसरूफ मदद व माश दूवा गोयान अज साबिक मुकर्रर व माफ अस्त. बतऱ्हे हस्त हेकाक नदारम्. देहे मजकूर ब दस्तूर साबिक बनाम अला अज सरकार मुकर्रर व बहाल दर करार दास्ता बिना बरान बशमूल कि फसल रब्बी सन १२०७ फसली देहे मंजूर निज्द माफ व नबी ब कलम दास्ता मसरूफ व अखत्यार मसारिला बागुजारन्द. बवे व मनुआ मजाहमत ब ऐवज वरसानद.

बहासिलात आरा सरफ खुद हा बरदास्ता बदुवाए अज्याद उमर व तरक्की एकबाल सरकार मुतफ बाशन्द. दरीबाब ताकीद दामत मौजा दरोबस्त मौजा आशजी मिलक व बाग सन ४२ जलुसीवाला छ ६ साबान

मोर्तंब
सुद

क्र. १२
मू. न.

श. १७२५ भाद्र. ते १७२६ श्रावण
इ. १८०३ ऑग. ते १८०४ ऑग.

(फारसी)

श्रीमंत नारायणराव बहादुर.

चौधरीयान् व कानुनगोयान् प्रो दाद्री चालकलियाणा बिदानंद मौजे सातोरी आमले परगणे मजकूर दरब्बजे इनाम कुनबाहा सीलचंद मशारला अज इफ्तदाय फसल खरीफ स. १२११ हिजरी. मफूस बरकबत नमूद शुद बअहद कि मौजा मजकूर बतोर ब अखत्यार बागुजास्त नबी मुजामत न साजन्द. क्या हासलात अ आँरा सिर्फ बेशत्तिहाज खुद नमूदा बाशन्द तेहेरीर हस्तदोयम स. ४६ जलूसीवाला.

क्र. १३
मू. न.

श. १७२० आषाढ वद्य ८
इ. १७९८ जुलै ६

श्रीमंत वामनराव बहादूर. १२०८ फसली.

बइस्म कणीराम मिश्र बमुजब पर्वाना मोहोरी पंडित महाराजा वामनराव बहादुर मौजा धसोला परगणें दाद्री सरकार नरनोळ सुबे शहाजहांबाद चौधरीयान व कानुनगोयान् जिरायत कशान जमीदारान् मौजा मजकूर हर दो फसल रब्बी व खरीफ १२०८ फसली चकबस्ता नमूदा हवाले मुइल्ला नमूदा शुद्र बअहद कि आराजी

मजकूर बखादीरजमा काश्त कुनानिन्दाः हतसिलात आरा फसल ब फसल साल बसाल. बइत्तिहाज खुद नमूदा बदुवाए दामे दौलत इस्तकबालमे नमूदा बाशिंद तेहेरीर तारीख बिस्तएकम् मोहोरम् उलहराम्.

दाद्रीहून निघून थोड्याच अंतरावर असलेल्या कोसली या गांवीं पोंचलों.

कोसली, नाहाड, बुधवाणा—

कोसली हा कसबा जुना आहे. येथें मराठ्यांच्या संबंधाच्या कित्येक गोष्टी वृद्ध लोकांनीं सांगितल्या. माफीदार कोणीहि असल्याचें समजलें नाहीं. जसवंतराव हुलकरा संबंधानें कांहीं दोहे ऐकावयास मिळाले. याशिवाय दुसरी कोणतीहि स्मृती उपलब्ध झाली नाहीं. कोसली हें बी. बी. ॲण्ड. सी. आय. रेलवेचें स्टेशन आहे. या प्रांतांत ' अहीर ' लोकांचें विशेष प्राबल्य दिसतें. कोसली येथें एक अहीर हायस्कूल आहे. तशी दुसरी प्रबल जात म्हणजे ' जाट ' ही आहे. अहीर आणि जाट, या लोकांचा इंग्रजी फौजेंत विशेष भरणा आहे. कोसली गांवांत शेंकडों अहीर व जाट मिलिटरीचे मोठमोठे पेनशनर असून सुखानें कालक्रमणा करीत आहेत.

कोसलीहून सहा मैलांवर ' नाहाड ' नांवाचें खेडेगांव आहे. हा गांव सुमारें एक हजार लोकवस्तीचा असून तो दुजाण्याच्या नबाबाच्या ताब्यांतील एक तहसील आहे. मराठ्यांच्या हुकूमतीच्या वेळीं हें एक परगण्याचें ठिकाण होतें असें सांगतात. येथें नुऱ्या फकिराजवळ मराठ्यांचा पट्टा आहे असें समजलें. पण मी मरेठा आहे व पट्टा पहात फिरतो आहे हें वृत्त लोकांनीं त्यास सांगितलें तेव्हां भीतीनें तो भटिंड्यास पळून गेला. आपली जमीन हिसकावून घेण्याकरितांच हा आलेला आहे अशी त्याची भावना झाली. नाहाड येथें एक गढी

आहे. पण ती कोणी व केव्हां बांधिली तें लोकांना निश्चितपणें सांगतां येईना.

नाहाडहून वीस मैलांवर बुधवाणा नांवाचें एक गांव आहे. हा प्रवास उंटावरून केला. उंटावरून २०।२५ मैलांचा प्रवास सुखकर होतो. जास्ती लांबचा प्रवास अत्यंत कष्टप्रद वाटतो. बुधवाणा हें एक खेडें आहे व सांप्रत पटियाळा संस्थानांत आहे. कानोडहून चरखी-दाद्रीच्या रस्त्यांत हा गांव आहे. बुधवाण्याच्या लोकांनीं महादजी शिंदे यांच्या संबंधानें व त्यांचे सेनापती खंडेराव हरी व गोपाळराव रघुनाथ यांच्या कांहीं दंतकथा सांगितल्या. बुधवाणा येथें मराठ्यांचे आमिल 'मुकुंदराव' नांवाचे रहात असत असेंहि कांहीं लोक म्हणाले. बुधवाणा आणि नाहाड या दोन्ही ठिकाणीं गुरांचे मोठमोठे बाजार भरतात. दूरदूरचे व्यापारी येथें गाई, म्हशी बैल, उंट इ. जनावरें विकण्याकरितां येतात. याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची स्मृति उपलब्ध झाली नाहीं. कानोडहून चरखी-दाद्रीचा रस्ता मराठ्यांनींच तयार करविला असें सांगतात. हा रस्ता डोंगरांतून आहे. या डोंगरांतील झाडी तोडून फौजेच्या हालचाली व्यवस्थितपणें करिता याव्यात म्हणून हा रस्ता मराठ्यांनीं तयार केला.

हांसी, हिसार, रोहोतक—

हांसी हें हिसार जिल्ह्यांतील तहसिलीचें ठिकाण आहे. येथील किल्ल्यांत 'जहाज' फिरंगी रहात असे. त्यानें आपलें स्वतःचें नाणेंहि पाडलें होतें. मीं पुष्कळ प्रयत्न केला परंतु नाणें मिळालें नाहीं. हें नाणें एका पुस्तकांत छापिलेलें मीं पाहिलें आहे. हांसी येथें नंतर कर्नल स्किनर रहात असे. त्याला त्यावेळीं हिंदुस्थानी लोक सिकंदरसाब असें म्हणत असत. सांप्रत जेथें कचेरी भरते तोच पूर्वीचा जुना किल्ला. हिसार आणि रोहोतक हीं दोन गांवें त्या काळीं

अस्तित्वांत नव्हतीं. प्राचीन कागदपत्रांत यांचा उल्लेख नाहीं. आणि जरी अस्तित्वांत असलीं तरी सामान्य खेडीं असावींत.

' महीम ' आणि ' तुश्याम ' हे कजबे प्राचीन आहेत. या प्रांतांत बांधिलेलीं शंकराचीं प्राचीन मंदिरें मराठ्यांनींच बांधिलीं असें इकडील लोक सांगतात. पलीकडे आणखी उत्तरेस ' बुढलाडा ' नांवाचें गांव लागतें. मी जसजसा उत्तरेकडे आणखी जाऊं लागलों तसतशीं जसवंतराव होळकरांचीं गाणीं माझ्या कानावर पडूं लागलीं. 'जसवंतराव तेरे मारनेबाद अंग्रेजोनें राज्य बढायो है ' इ. गाणीं इकडे आबालवृद्ध गातात. हीं गाणीं व दुसरीहि कित्येक माहिती मिळविण्याकरितां पुन्हां भरारी मारण्याचें मीं ठरविलें. येथून झिंद अगदीं जवळ पडतें, पण मी तेथें गेलों नाहीं. कारण जितका व्याप वाढवावा तितका वाढतो. येथून सतलज नदी सुमारें २५ मैल पडते. हरियाणा प्रांतांत अजूनहि पुष्कळ ऐतिहासिक सामुग्री मिळण्यासारखी आहे. महादजी शिंदे, जसवंतराव होळकर, शिंद्यांचे सेनापती खंडेराव हरी, नारायणराव, गोपाळराव भाऊ यांचीं नांवें कित्येक लोकांना माहीत असून कांहीं जमिनीचे पट्टेहि पहावयाचे राहिले आहेत. हिसारच्या पुढें विशेष साहित्य मिळत नाहीं. याप्रमाणें हरियाणा प्रांताचें भ्रमण पुरें करून मी ' कोटपुतळीस ' परत आलों.

---

२ राठ

कोटपूतली—

' कोट ' आणि ' पूतली ' या नांवाचीं दोन निरनिराळीं गांवें एक मैलाचे अंतरावर आहेत. ' पूतली ' हें केवळ पन्नास घरांचें खेडें आहे. ' कोट ' ची लोकसंख्या सुमारें दहा हजार असावी. सांप्रत खेतडी संस्थानचें तालुक्याचें व जिल्ह्याचें मुख्य ठिकाण बी. बी. सी.

आय्. रेलवेच्या डाबळा स्टेशनपासून २५ मैल अंतरावर असून येथें मोटारींची रहदारी बारा महिने सुरू असते. कोटपूतळीच्या पूर्वेस अलवर संस्थानची हद्द सुरू होते. ‘ कोट ’ हा कजबा प्राचीन असून गांवा-जवळच एक भुईकोट किल्ला असलेला दिसतो. हा किल्ला मराठ्यांनीं बांधिला असें तिकडील लोक सांगतात. किल्ल्याच्या सभोंवार खोल खंदक खणलेला आहे. किल्ल्याचा तट ठिकठिकाणीं ढासळून पडलेला आहे. मुख्य दरवाजानें आंत गेल्यावर मध्यें खुलें मैदान लागतें. तेथें एक लहानशी तोफ आहे. या तोफेवर “ नारनोळ के लढाईमे अभयसिंग के जमानेमे लायी हुई ” असा लेख आहे. येथून वळसा घेऊन पुढें गेलें म्हणजे दुसरा दरवाजा लागतो. हा नवीन बांधण्यांत आला आहे. पहिला दरवाजा पूर्वींचाच कायम आहे. दुसऱ्या दरवा-ज्यांत प्रवेश करूं लागलें म्हणजे डाव्या बाजूस संत्री अथवा पहारेकरी यांना बसण्याकरितां दगड खोदून चौक्या बनविल्या आहेत.

या दुसऱ्या दरवाज्यांतून पुढें गेलें म्हणजे मुख्य मैदानांत प्रवासी येतो. समोरच जी इमारत दिसते तीच मुख्य इमारत. या इमारतींत सांप्रत ए. व्ही. स्कूलचे विद्यार्थी रहातात. मराठ्यांची मोठी तोफ “सावन भादवा ” येथें होती ती खेतडीस नेण्यांत आली असें लोकांनीं मला सांगितलें. ‘ महादजी सिंदे ’ यांचे सेनापती, सुभेदार ‘ खंडेराव हरी भालेराव ’ उर्फ ‘ अप्पा खांडेराव ’ ह्यांचें ह्या किल्ल्यांत वास्तव्य असे. त्यांनीं या किल्ल्याचें ‘ मोतीगड ’ असें नांव ठेविलें होतें असें म्हण-तात. पण यांच्यापूर्वीं सुभेदार “ मल्हारराव होळकर ” हेहि या ठिकाणीं कित्येक वर्षें मुक्काम करून होते, असें इतिहासावरून दिसतें.

किल्ल्यांतून बाहेर जाण्यास एक भुयार होतें पण तें सांप्रत बुजलेलें आहे. हा लहानसा व टुमदार भुईकोट किल्ला पाहून प्रवाशास समाधान वाटतें. बुरजाच्या वर चारी बाजूस स्त्रियांना रहाण्याकरितां मोठमोठ्या इमारती होत्या त्या पाडून टाकण्यांत आल्या असें कळलें.

मराठ्यांचे हुकूमतीचे वेळीं हें परगण्याचें ठिकाण होतें. सं. १८४३ पासुन सं. १८६० पर्यंत (श. १७०८ इ. १७८६ ते श. १७२५ इ. १८०३) कोटपूतळी हें मराठ्यांच्या हुकूमतीखालीं परगण्याचें मुख्य ठिकाण होतें हें खास.

शहरांत "भाऊगंज" नांवाचा एक भाग (मोहोल्ला) आहे तो मराठ्यांचे त्या काळचे अंमलदार "गोविंदराव भाऊ" यांनीं वसविला असें लोक सांगतात.

लेकसाहाबकी कोठी

कोट गांवापासून थोड्याच अंतरावर एक कोठी आहे. ही प्राचीन आहे. सांप्रत दुरुस्ती करून ती "गेस्ट-हाऊस" मध्यें रूपांतरित झाली आहे. येथें लेक साहेबाचा 'अर्धपुतळा' (बस्ट) आहे. पुढेंच एक विस्तृत बाग असून गांवांतील लोकांचें संध्याकाळच्या वेळचें हें एक क्रीडास्थान होय. तेथील हवापाणी उत्तम आहे. गांवांत कित्येक प्राचीन मंदिरें व धर्मशाळा आहेत.

उत्तर हिंदुस्थानांतील संशोधन कार्याविषयीं कांहीं माहिती—

राजपुताना, संयुक्तप्रांत, पंजाब, या प्रांतांत "चौधरी" व 'कानुनगो' ह्या जुन्या संस्था होत. पैकीं चौधरी हे वैश्य असून कानुनगोचें (वसूलीचें) काम 'कायस्थ' करीत असत. त्यानंतर, इनामदार, माफीदार, जहागीरदार, इ. घराण्यांच्या सनदांना इकडे, 'पट्टा' असें म्हणतात. मराठ्यांनीं दिलेल्या माफीजमीनीचे पट्टे कित्येक लोकांजवळ पहाण्यास मिळतात. एक माफीदार दुसऱ्या माफीदाराचें नांव आपोआपच सांगतो.

एक पट्टा अथवा सनद पहावयास मिळाली तर त्यावरून तत्कालीन इतिहासावर बराच प्रकाश पडतो. त्यानंतर "काजी" चें घराणें. बहुतेक सर्व काजींच्याजवळ मोंगल बादशहांच्या वेळचे कागद-

पत्र पहावयास मिळतात. शिवाय, रायभाट, राय, मिराशी, राणा, जोशी इ. लोकांजवळ, पूर्वीच्या काळचे ऐतिहासिक दोहे, कवित्व, इ. लिहिलेलीं बाडेंच्याबाडें कधीं कधीं मिळतात. कोणत्या वेळेस काय मिळेल याचा नेम नसतो. लोकांना या कागदपत्रांची किंमत नसते. कित्येक मूर्ख लोक आपल्याजवळील कागदपत्रें दाखवीत नाहींत. ते दुसऱ्या गावीं पळून जातात.

मराठ्यांच्या जमीनीच्या सनदा (पट्टे) लोकांनीं सतरा कुलपांतून बंद करून ठेविल्या आहेत. सांप्रतच्या हलाखीच्या स्थितींत या जमीनींचें केवढें महत्त्व!!

देशी संस्थानें--झिंद, नाभा, पतियाळा, अलवर, व इंग्रजींतील हिसार, गुडगांव, रोहोतक हे तीन जिल्हे; या क्षेत्रांतून प्रवास करतांना अशा प्रकारचे शेकडों पट्टे पहावयास मिळतात. या माफीजमीनींतील उत्पन्नावर भूक शांत करून, आज शेकडों कुटुंबें आपलें जीवन व्यतीत करीत आहेत!!! व मराठ्यांना दुवा देत आहेत!!!

कोटपुतळीस पाहिलेले कागदपत्रांच्या नकला, सारांश.

येथें गणेशदत्त चतुर्वेदी नांवाचे गौड ब्राह्मण रहातात. यांचे पूर्वज दवलतराव शिंदे यांचे आश्रयास होते. यांना ग्वाल्हेर संस्थानांत 'सबळगड' येथें कांहीं जमीन इनाम मिळाली आहे असें ते म्हणाले. कोटपूतळीसही यांना इनाम जमीन आहेच. त्यांचेकडे खालील कागद पाहिले.

क्र. १४ } 'फेरिस्त' कोटपूतलीके राजा, { एक जुना फारसी कागद. कोटपूतली येथें कोणत्या राजांनीं कोठपर्यंत राज्य केलें त्याचा तपशील)—

संवत् १७४६ (श. १६११ इ. १६८९) अलमगीर शहाजादा.
" १७६२ ते ६७ (श. १६२७-३२ इ. १७०५-१०) फरक शायरकी माफी जागीर मे

,, १८११ (१६७६ इ. १७५४) भूलसिंग नाथावत
,, १८१३ (१६७८ इ. १७५६) सवाई माधोसिंग
,, १८२३ (श. १६८८ इ. १७६६) महाराज उम्मेदसिंग
,, १८३४ (श. १६९९ इ. १७७७) सवाई पृथ्वीसिंग
,, १८३७ (१७०२ इ. १७८०) प्रतापसिंग
,, १८४१ (श. १७०६ इ. १७८४) मरेठोंकी हुकूमतमें
सुभेदार खंडेरावहरी, बापूशामराव, गोविंदरावभाऊ, महादजी सेंधियाके नायब.
,, १८६० (श. १७२५ इ. १८०३) राजा अभयसिंगको अंग्रेजोने दिया

क्र. १५ }
मू. न. }

{ श. १७१८ फाल्गुन शु. ११
{ इ. १७९७ मार्च ९

सिद्धी श्रीदिवाण रायचंदजी जोग श्री महाराजाधिराज अलिजा-बहादर दवलतराव सेंधिया रामराम वाचजो.

ज्योतिस्वरूप चरणीं तत्पर महादजी सुत दवलतराव सिंदे- —निरंतर—

यहां को समचार भलो छे. अपरंच निर्भय-राम जोशी आश्रित सरकार वस्ती कोट-पूतलीसो चेनसुख वगैरा भाईबंद है. उन्होने जबरदस्तीसे जमीन वतनकी लेली है वे सबल है अभय-सिंग " तुम्हारे पास है. उसको ताकीद करके इस बीचमें ' निर्भय-राम जोशी ' की वतनकी जगह दिवावजो. ऐसा बंदोबस्त कर देना. जो योग्य हो सो करणो. मिती फाल्गुन शु. ११ सं. १८५३ (इ. १७९७ मार्च ९, श. १७१८)

मोर्तब
सुद.

खुलासा—या निर्भयरामाचे वंशांतीलच रा. गणेश दत्त चौभे ऊर्फ चतुर्वेदी हे आहेत.

२ एका फाटक्या कागदावरील तेहेरीर— (फारसी)

तेहरीर महादजी सेंधिया— आमिल. बापू शामराव
गोविंद्राव भाऊ. श्रीमंत वामनराव भालेराव. १२०६ हिजरी.

३ एका टिप्पण बुकावरील नोंद—सं. १८६० (श. १७२५ इ. १८०३) मे लेक साहाब अंग्रेजने ' अभयसिंग ' को राज दिया. उससमय ' सेखमल्लू ' मरेठोके तरफसे सेनापती था. उसने लॉकिन साहाबसे वीस दिन लढाई किया. लढाईमे मारागया. कब्र किलेमे शीरसके पडे के पास है.

खुलासा—सेखमल्लू तेरा राज बना रहियो । कूवेपे चाक चढा रहियो ॥ अशी लोकोक्ति कोटपुतळीस प्रसिद्ध आहे.

४ " नर्मदापार अजिंठा की घाटीमे जनरल ' लेक ' सिपह सालार ईस्ट इंडिया कंपनी और " जसवंतराव हुलकर " की लढाई चल रही थी. इस अवसरपर श्रीमंत पेशवाके हुकूमसे खिलत लेकर ' दवलतराव सेंधिया ' दश हजार फौज लेकर आया. लेक साहाबकी और उनकी लढाई हुवी. उससमय ' लेक ' साहाब और ' बॉल ' साहाबको ' बागसिंग ' ने मदत कीथी. मरेठोंकी हार होतेही. परगना कोटपूतली अभयसिंग को दिया गया. "

" कानोड " और ' नारनोळ ' झझरके नबाब को दिया गया. तिजारा, खेरी, रामगड, किशनगड, बेहेरोड, बानसूर, अलवरके बखतावरसिंगको दिये गये.

" नजफकूलीखाँ दशहजार फौज लेकर कोटपूतली आगया. मरेठोंकी और उनकी लढाई हुवी. जयपूरके दिवाण ' खुशालीराम ' और ' सेवकराम ' इन्होने ' प्रतापसिंग माचेडी वालेंको खबर दीयी, " नारायणराव मरेठा " दस हजार फौज और २० तोफे लेके आयो है. राजगडपर जोर दियो है. नजफकूलीखां भाग गया. मरेठोंका अधि-

कार कोटपूतलीपर होगया. किलेमे बहुतसी मरेठोंके फौजकी भीड रहतीथी. सं. १८६० तक मरेठोंका इन्तिजाम बहुत अच्छाथा. "

कोटपूतळी येथें ' माथुर ' कायस्थ घराणें आहे. मराठ्यांचे हुकूमतीचे वेळीं हे कानुनगो होते. वसूलबाकीचें काम पहात असत. यांचेंच एक घराणें जयपूर येथें आहे. यांचे पूर्वज आसाराम कानुनगो हे होते. सांप्रत लाला रघुनाथ सहाय माथुर हे विद्यमान. यांचेकडे जाऊन मराठ्यांच्या वेळचे जमाबंदीचे कागद पाहिले. हे जमाबंदीचे कागद पहातां त्यावेळीं कोटपूतळी परगण्यांत १२० गांव होतें. सं. १८५३ (श. १७१८ इ. १७९६) मध्यें या परगण्याचें वार्षिक उत्पन्न साठ हजार रु. चें होतें. सं. १८५६ (श. १७२१ इ. १७९९) मध्यें चव्वेचाळीस हजार होतें. एकट्या पूतळी गांवचें उत्पन्न ४५८॥· होतें. म्हणजे त्यावेळीं ' पूतळी ' हें खेडेंच होतें असें अनुमान निघतें. जमाबंदीचे कागद सर्व ठराविक नमुन्याचे आहेत. त्यांपैकीं एक नमुना म्हणून देतों. फारशी

जमाबंदीच्या कागदाचा नमुना—

जमाबंदी मवाजियान प्रो कोटपूतली, सरकार नारनोळ. दारुल खिलाफा शहाजहांबाद. फसल रब्बी. ११९९ *फसली. मुताबिक सं. १८४९ दर अमल राजा समशेर बहादर खंडेराव हरी. बइन्तिजाम भास्करराव रघुनाथ आमिल मुस्ताजीर.

कोटपूतली. ४४००० रु.

आसाराम कानुनगो.

(सही फारशी.)
भास्करराव रघुनाथ.

स्वाद.

तेहेरीर उलतवारीख नवाजदहम शेहेर
सफर. उलमुजफ्फर सन ३२(३४ ?) जलूसीवाला.

* श. १७१४ इं. १७९२. फसली उत्तरी पद्धतीचा आहे. --शं. ना. जोशी.

फारसी भाषेंतील पत्र फाटून तुकडे झालेले आहेत. मोहोर नाहीं. “ लेकसाहाबका खत ” ‘ अभयसिंग ’ को ता. १ मे १८०५ ई. “ हमको ऐसा मालुम हुवा है कीं ‘ नारायणराव ’ कुछ बदमाषोंको एकठा करके फसाद मचानेकी कोशीस कररहाहै. सो ‘ बखतावरसिंग ’ अलवरसे सुलह करके फौज इकठा करके ‘ नारायणरावको ’ निकालनेकी कोशिस करो. ”

खुलासा– लासवाडीस पराभव झाला तरीहि मराठ्यांची पुन्हां या प्रांतांत आक्रमण करण्याची तयारी चालू होती असें दिसतें. हे नारायणराव, खंडेराव हरीचेच कोणी नातेवाईक असावेत. यांनीं निमराणा रेवाडी इ. ठिकाणीं बहादुरीचीं कामें केलीं असल्याचें मला संशोधनांतीं कळून आलें आहे.

लोककथा–कर्नल स्किनर यानें इंग्रजी फौज घेऊन ‘ जमशेदखान ’ पेंढारी यास पकडण्याकरितां कोटपूतळी गांवांतून कूच केलें. येथील लोकांनीं गोरी फौज याच वेळीं प्रथम पाहिली असें म्हणतात.

काजी गुलामअल्ली कोटपूतळी यांचेकडील कागद–

नं. १ फारशी–मोडी.

क्र. १६
मू. नं.

श. १७२० अ. श्रा. व. १४
इ. १७९८ ऑगष्ट ११

पेरनची फारशी मोहोर.

शहा आलम बादशाह गाजी फिद्वी जनरल पेरन बहादूर मुजफ्फर उलम्मुक नासरे इन्तिजामुद्दौला
हिजरी १२१३

चौधरी व कानुनगो प्रो शेरगड सूबे अकबराबाद यांस परगणे मजकूर येथील मामलत किशनलाल याजकडेस इजारियानी सांगितली होती. ती दूर करून सालमजकूर पासोन सेखहशम याजकडेस सांगितली आहे. तरी

मशारनिल्हे रुजू करून घेऊन अमल सुरूं करणें. छ २८ सफर ३९ *जलुसीवाला.

मोर्तब
खुद.

खुलासा—या सेख हाशमच्या वंशांतीलच काजी गुलामअली हे आहेत.

कोटपूतली येथें सूरतराम नाग यास ५० बिघे जमीन १ कूवा दिल्याचा पट्टा. सांप्रत गोविंददास नागा विद्यमान.

नजफकूलीखाँची मोहोर फारसी

शहाअलम बादशाह गाजी फिद्वी सैफुद्दौला नजफकूलीखाँ बहादर मुजफरजंग बक्षी उलमुल्क
हिजरी ११६६

कोटपूतली येथें गजाधर चौधरी यांच्या पूर्वजांना कल्याणपुरा वगैरे पांच गांव मराठ्यांनीं दिले होते, पुढें ते खेतडी दरबारनें कांहीं योग्य कारण दाखवून जप्त केले. या पट्ट्यावरील मोहोर. पट्टा फाटून गेला आहे.

पेशव्यांची फारशी मोहोर

शहाआलम बादशाह गाजी फिद्वी महाराजाधिराज सवाई माधोराव नारायण बहादर सादतमंदी जान पेबंद फर्जंद खास उलखास, सरदार कसराउल इकतिदार यार वफादार, सिपहलार, मलिक मदारुलसलतनत, वकील मुतल्लक आमीर उलउमरा, मुखत्यार उलमुमालिक, उमदतुल उमरा आसातीन—

कोटपूतलीचें काम मला २० दिवस पुरलें. तेथून बाणसोर १२ मैल पडतें. येथें ' मिश्रांना ' मराठ्यांकडून जहागीर गांव मिळाले आहेत असें समजल्यावरून तेथें गेलों.

बाणसोर—

' बसई ' आणि ' बाणसोर ' हे दोन निरनिराळे गांव एक मैलाच्या अंतरावर आहेत. बसई उजाड आहे. बाणसूर हें अलवर

---

* शिक्यांतील हिजरी १२१३ हा बरोबर धरल्यास ३९ जुलूस येत नाहीं, ४१ येतो. हिजरी वरून कंसांतील शकसन दिले आहेत. — **शं. ना. जोशी.**

संस्थानांतील तहसील आहे. लोकसंख्या सुमारें पांच हजार असावी. बाणसोरहून अलवर येथें मोटारी जातात. गांवाजवळ डोंगरावर एक किल्ला आहे तेथें पहाण्यासारखें कांहीं नाहीं. वसई-बाणसोर असा उल्लेख जुन्या कागदांत आहे.

येथें ' मिश्र ' गौड ब्राह्मण रहातात. येथें ' रामकुमार मिश्र ' व ' दामोदर मिश्र ' यांच्या पूर्वजांना मराठ्यांनीं ' दखोरा ' गांव इनाम दिला आहे. शिवाय ' दुर्गचानांगल ' हा गांवहि यांच्याकडे मोंगलाच्या वेळेपासून चालत आला आहे. दोन्ही गांव पतियाळा संस्थानांत आहेत. मराठ्यांनीं पूर्वींचे पट्टे कायम ठेवून, मोहोर आपली लावून मोडी भाषेंत ही पुरवणी जोडली आहे असें आढळतें. शिरोभागीं मराठ्यांची मोहोर नंतर फारशी व शेवटीं मोडी अशा प्रकारचे पट्टे आहेत. इकडील लोकांना मोडी वाचतां येत नाहीं. त्यामुळें मोडीचें भाषांतर हिंदींत करवून तें निराळ्या कागदावर माझ्याजवळून लिहून घेत. " मरेठी जबान " है हम तो जानते नही, आप उलथा हिंदीमे करदों " असें सांगत. " तुम्हारे कृपासे हम अपना जीवन चलारहे है. मरेठोंका पट्टा है. इ. इ. सांगून मोठ्या प्रेमानें माझें स्वागत करीत. मराठ्यांनीं दिलेल्या माफी जमीनी दुसऱ्या राजांनीं हिसकल्या नाहींत; त्या तशाच आजतागायत चालत आल्या आहेत हें आश्चर्य नव्हे काय ! ! आज जर हे जमीनीचे पट्टे दृष्टीस न पडते तर आम्हांस मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन करितां आलें नसतें व तिकडील लोकांना " तुम्हारे प्रांतमे मरेठोंकी हुकुमत थी " नव्हे " हमारी हुकूमत थी " असें लोकांना ठासून सांगतां आलें नसतें. असो.

रा. दामोदरलाल मिश्र यांचेकडील कागदपत्रें पाहिलीं. त्यांचें वर्णन—

१ एक पत्र मोडींत लिहिलेलें. मोहोर नाही. तेहेरीर नाहीं. फाटलेलें आहे.

" रा जैसिंगराव कदम कमाविसदार व खंडेराव बापूजी गोसावी यांसी, अखंडित लक्ष्मी अलंकृत यशवंतराव सिंदे रामराम

रा. भागीरथदास मिश्र वसईकर यांजकडे नारनोळकडील गांव मोजे दखोरा इनाम आहे. त्यासी मागील भोगवटा व रा. बाबूराव पांडुरग यांचे अंमलापावेतों वहिवाट, तरी चौधरी व कानुनगो यांचा दाखला पाहून सनद मुजब करून देणें जाणिजे. ब्राह्मण सत्पात्र आहे. गांव धर्मकारणी कोणे गोष्टीविसी तुम्हीं दिकत न करणें कळावें ही विनंति. "

मोर्तब
सुद.

क्र. १७ }
मू. न. }

{ श. १७२० आश्विन व. ३
{ इ. १७९८ आक्टो. २७

(पट्टा फारसी मोडी मोहोर पेशव्यांची)

शहाअलम बादशाह गाजी फिदवी सवाई माधोराव नारायण बहादुर, फर्जंद खासउलखास, पंडितप्रधान, महाराजाधिराज सवाई मनसुरे जमा विलइस्तकबाल वकील मुतल्लेक, अमीर अलउमराव महाराजा दवलतराव सेंधिया बहादुर, उमदतुल उमरा फर्जंद अजर्मंद अजीज फसलीसन

कमाविसदार वर्तमान व भावी प्रांत नारनोळ सुबे शहाजहांबाद, सुरू सन तिस्सा...मय्या व अलफ...वेदमूर्ती भागीरथदास मिश्र जोशी वास्तव्य वसई बाणसोर यांनी हुजूरकडे येऊन विनंति केली कीं, " योगक्षेम जीविका चालत नाहीं. परिवार कुटुंब यांचे पोषण झालें पाहिजे. ठाकुरद्वारा श्रीसीतारामजीचें पूजन करून स्नानसंध्यादि आन्हिक करून महाराजांस व राज्यास अभीष्ट चिंतोन कालक्षेप करीत जाऊं " त्यावरून मनास आणितां ब्राह्मण सत्पात्र व कुटुंबवत्सल जाणोन श्रीठाकोर सीतारामजीचें पूजनाबद्दल व मिश्र जोशी यांचे कुटुंबाचे खर्चाबद्दल मौजे " दखोरा " हा गांव दरोबस्त हकदार अव्वल

मजकूर पासून करार करून ही सनद सादर केली असे. तरी मौजे मजकुरी उत्पन्न येईल ते मिश्र जोशी यांस अविछिन्न देऊन परगणे बंदोबस्तास भेट बेगार वगैरे गांव धर्मार्थ जाणोन माफ केली असे. त्याप्रमाणें चालविणें. कोणे गोष्टीविसी दिकत न करणें. अमल-दखल सुरक्षित होणें जाणिजे. छ. १७ माहे जमादिलावर

मोर्तब
सुद

क्र. १८
मू. न.

श. १७२१ आश्विन व. ४
इ. १७९८ आक्टो. १८

(मोडीपत्र मोहोर नाहीं)

रा. वर्तमान व भावी कमाविसदार प्रो नारनोळ सुबे शहाजहां-बाद बिदानद वेदमूर्ति *रा. भागिरथदास बिन रामसेवक मिसर ज्योतिषी वास्तव्य बसई बाणसोर यांनीं रा. अंबोजी इंगळे यांजपाशीं मथुरेचे मुकामीं येऊन विदित केलें कीं आपण कुटुंबवत्सल आहों, उपजीविका चालली पाहिजे त्यावरून मनास आणितां मौजे 'दखोरा' हा गांव धर्मार्थ मिश्र मजकुरास करार करून देऊन ही सनद सादर केली असे तरी मौजा मजकूर त्यांजकडे चालविणें कोणे गोष्टींविसी दिकत न करणें छ १८ माहे जमादिलावर +फसली १२०७

मोर्तब
सुद.

क्र. १९
मू. न.

श. १७२१ श्रावण व. १
इ. १७९९ आगष्ट १६

(मोडीपत्र मोहोर नाहीं)

वर्तमान व भावी कमाविसदार प्रो नारनोळ सुबे शहाजहांबाद बिदानद भागिरथदास मिश्र कजबे वसईकर याणीं रा. रा.

---

* रा. दामोदर मिश्र हे भागीरथदास यांच्या सहाव्या पिढींतील आहेत.
+ उत्तरी पद्धतीचाच फसली धरून वरील काल दिला आहे.—**शं. ना. जोशी**

अंबोजी इंगळे यांचे ताकिदपत्र आणिले कीं मौजे दुर्गचानांगल प्रो मजकूर हा गांव धर्मार्थ देऊन चालविणें त्यांस मौजे मजकूरची जमा पाहतां दीड हजारांची जाणोन त्याचे ऐवजी दुसरा गांव मौजे दखोरा प्रो मजकूर हा देऊन हे सनद सादर केली असे. मिश्र मजकूर स्नानसंध्या करून सरकारचे अभीष्ट चिंतन करितील कळावे छ १४ माहे रबिल्यवल फसली. १२०७

मोर्तब
सूद

क्र. २० } { श. १७२१ श्रावण व. १४
मू. न. } { इ. १७९९ ऑगष्ट १६

(पट्टा फारसी. मोडी कागद जोडलेला नाहीं.)

फारसी

शहाआलम बादशाह गाजी नायब महाराजा माधोराव सेंधिया फिदवी राजा समशेर बहादुर खंडेराव हरी

पर्वाना बअहद समशेर बहादर खंडेराव हरी चाहार दहम रबीउलअवल सन ४१ जलूसीवाला—

—आमिलान् हाल व इस्तकबाल प्रो नारनोळ मरजाद सूबे दारुलखिलाफा शहाजहांबाद—बिदानंद—मौजे दखोरा अमला परगना मजकूर बइस्म भागिरथदासमिश्र जोशी बसई बाणसूर धर्मार्थ अजफसल खरीफ स. १२०७ फसली, ब मुजब पर्वाने अलीजा बहादूर मुकर्रार कर्दीदा शुद. व अहद कि देहे मजकूरा माफ व मर्फ उलकलम दानिस्ता मिनउल बजू अज अबयाब व मनुआ वगैरा मजाहिम बमुतारिजन बूद दरतेहेत नसरूफ मूमीइला बा गुजारन्द. कि वजह हासला आँरा सर्फ बेहेतिहाज खुद नमूदा दर परिस्ती शिवपूजा ठाकुर श्री सीतारामजी ब दुबाए तरक्की उमददौलत अबदमुद्दत इखतगाल मे नमूदा बाशिन्द. दरींबाव ताकीद आकब ब

कदगत मजीद दानिस्ता हसवुल मरकूस बअमल आरन्द मोहोर तारीख सदर सन इलाफस्त

मोर्तब
सुद.

बाणसोरपासून २५ मैलांवर ' मणेटी ' म्हणून गांव आहे. तेथील मिश्रांना तो गांव मराठ्यांनीं इनाम दिला आहे; ही खबर मला बाण-सूरच्या लोकांनीं दिली. या प्रांतांत उंटावरून प्रवास करणें सोईचें व कमी खर्चाचें असतें. पण ते कोणाला ? तत्प्रांतीयांनाच. पर-प्रांतीय पाहिल्याबरोबर उंटवाले दुप्पट भाडें मागतात. २५ मैलांचा १ रु. उंटवाला मागे. मी त्याला आठ आणे देऊं लागलों तो ते घेईना. मी राजपुतान्यांत १५ वर्षे राहिलेला असल्यामुळें मला उंटावर प्रवास करण्याची सवंय झालेली आहे, उंटाची स्वारी एकंदरींत सुखदायक नाहीं असा माझा अनुभव आहे. यासाठीं पायीं प्रवास करण्याचेंच ठरविलें.

रस्त्यांत म्हणजे या २५ मैलांत १२ गांवें लागलीं. भेटणारा प्रत्येकजण मला नांव गांव विचारी, पूना सितारा, असें मी सांगित-ल्यावर " महाराज आप हमारे प्रांतमे क्यों आये ! क्या कार्य !" इ. इ. प्रश्न विचारी. खिशांतील एक विडी काढून दिली म्हणजे भेटणारा मनुष्य पंधरा मिनिटें गप्पा मारीत बसतो. या गप्पांत कित्येक नवीन नवीन गोष्टी कळतात. इतिहाससंशोधकाला पायींच प्रवास करणें फायद्याचें. एक विडी दिली असतां एखादा भाट जुना दोहा म्हणून दाखवितो. शिवाय दुसऱ्याहि कित्येक गोष्टींची विचारपूस करतां येते. लोकांची परिस्थिति कशी आहे तेंहि समजतें. एखादा मूर्खहि भेटतो तर एकादा विद्वानहि भेटतो. तात्पर्य, पायीं भटकण्याची मजा कांहीं और आहे. असो.

मणेटी—

हा गांव बी. बी. ॲण्ड सी. आय. रेल्वेच्या ' अर्जेका ' स्टेशनपासून सात मैल पडतो. येथें मिश्रांचीं १५।२० घरें आहेत. हा गांव त्यांना मराठ्यांनीं इनाम दिलेला आहे. या गांवास ' झालास मणेटी' असें इकडील लोक म्हणतात. बीजवाड येथें जीं १।२ मिश्रांचीं घरें आहेत तीं यांचेच भाऊबंदांचीं.

ज्या मिश्राजवळ पट्टा आहे त्यानें मला तो दाखविण्याचें नाकारलें. तो म्हणे कीं, ' आप कौन है! पट्टा क्यों मांगते है! क्या कुछ हमारा गांव छीननेका विचार है ! ' इ. मी त्याची समजूत सर्व प्रकारें केली. इंग्रजांचें राज्य हल्लीं आहे तेव्हां तुमची जमीन मी कसा हिसकावून घेईन. मी इतिहास लिहीत आहे यासाठीं १२०० मैलांवरून तुझ्या गांवीं आलों ! तो म्हणे ' आप मरेठा है मेरें पास मरेठोका पट्टा है ! इसलिये मै आपको नही बताऊंगा ! '

हा पहिलाच भांडणाचा प्रसंग, त्यामुळें मला काय करावें हें सुचेना ! इतिहाससंशोधन करूं लागल्यापासून निरनिराळ्या प्रकारचे पूर्वी भ्रमणांत न घडलेले असे प्रसंग घडूं लागले. तो मिश्र मला पट्टाहि दाखविना व गांवात कोणाकडे माझी जेवण्याची व्यवस्थाहि लागू देईना. मनांतल्या मनांत शिव्या देऊं लागलों, जवळच असलेल्या ' झालास ' गांवीं जाऊन जेवलों व देवळांत झोप काढली !

दुसऱ्या दिवशीं झालासच्या सर्व लोकांना जमा करून त्यांच्यापुढें मी आपली तक्रार मांडली तेव्हां २।२ वृद्ध गृहस्थ माझ्या बरोबर येऊन त्यांनीं मणेटीच्या मिश्रांना पट्टा दाखविण्याविषयीं भाग पाडलें. यापुढें निरनिराळ्या युक्त्या लढवून मी आपलें कार्य उरकीत असे.

क. २१ } म. न.

{ श. १७१६ आश्विन
इ. १७९४ सप्टें. आक्टो.

(वर फारशी खालीं मोडी)

शहाआलम बादशाह गाजी नायब महाराज माधोराव सेंधिया अलिजा बहाद्दूर फिद्वी राजा समशेर बहादर खंडेराव हरी.

वर्तमान व भावी कमाविसदार प्रो मुंडावर सूबे अकबराबाद सरकार अलवर बिदानंद वेदमूर्ति *रामदत्त मिश्र ज्योतिषी वास्तव्य बीजवाड यांस मौजे मणेटी परगणे मजकूर देह एक ब्राह्मण सत्पात्र व कुटुंब वत्सल जाणोन सालमजकूर पासोन उदक धर्मादाय करून दिला असे-तरी मौजे मजकूर येथील सायर व इनाम मिळकत खेरीज करून वेदमूर्तींचा अमल दखल करून देणें, कोणे गोष्टींविसीं दिकत न करणें. असल सनद नकल घेऊन भोगवट्यास देणें +फसली १२०२ संवत १८५०

मोर्तब

सुद

विद्यमान:—रामचरणलाल मिश्र व नंदलाल मिश्र. मु. मणेटी, पोस्ट सांजापूर, जि. गुडगांव

मणेटीहून थोड्याच अंतरावर भोजपुरी म्हणून गांव आहे. तेथें ' प्रेमसुख व्यास ' नांवाचे दाहिमा ब्राम्हण रहातात. त्यांना हा गांव इनाम आहे. यांचेजवळ मराठ्यांच्या वेळचे कित्येक कागदपत्र आहेत असे लोकांनीं सांगितल्यावरून तेथें गेलों. पं. प्रेमसुख व्यास हे सुशिक्षित असून नम्र दिसले, त्यांनीं मोठ्या प्रेमानें माझें स्वागत केलें ते म्हणाले, ' आपको इतिहास है, ' आपके पूर्वजोंने बडेबडे पराक्रम किये है, और संशोधन कार्य के लिये आप हमारे प्रांत मे आये हैं;

---

* वेदमूर्ती रामदत्तमिश्र यांच्या वंशांतील सहाव्या पिढींतील.

\+ सं. १८५० ला दक्षिणेकडीलहि १२०२ फसली येत नाहीं. सबब उत्तरी फसली म्ह. १२०४, ह्यामध्यें वरील महिने व ते संवत् असे येतात म्हणून हा शक सन दर्शविला आहे—**शं. ना. जोशी.**

परंतु हमको तुम्हारे प्रांत मे जानेका क्या कारण है! हमारा इतिहास क्या है! दिल्ली के बादशहा की हम प्रजा है!! ' हमारा इतिहास क्या है '!!! असो.

भोजपुरी—

हा लहानसा गांव अलवर संस्थानांतलि मुंडावर तहसिलीमध्यें आहे. रा. प्रेमसुख व्यास यांचे जवळ पुष्कळ प्राचीन कागदपत्र आहेत. त्यांत मराठींत लिहिलेलेंहि (मोडींतीलहि) कित्येक कागद पाहिले.

क्र. २२ }
मू. न. } { श. १७०८ आश्विन शु. ३
{ इ. १७८६ सप्टं. २५

(वर फारशी खालीं मोडी)

शहाआलमबादशहा गाजी फिद्वी सवाई माधोराव नारायण बहाद्दर वकील मुतल्लुक मुखत्यारउलमुल्क उमदतुलउमरामूय दुस्सल-तनत उस्सातीन उलखि-लाफा आलिजा बहाद्दर महाराजाधिराज माधोराव सेंधिया श्रीनाथ मनसुरे जमा स. २८ जलूस

कमाविसदार वर्तमान व भावी प्रो मुंडावर व प्रो बावल सरकार रेवाडी तालुके कानोड सूबे शहाजहांबाद बिदानंद मौजे भौजपुरी व दुलहेडा हे दोन गांव वेदमूर्ती रा. दिनकर दास वल्द रामसुख व्यास याजकडेस नज-फकुलीखानाचे अमलापासोन चालत आले आहेत व त्यांचेकडे माफ राहिले आहेत व आतां रा. खंडेराव हरी यांचे अंमलांत जप्ती झाली. तरी यापुढें गांव खुलें करून सनद सादर करण. गोष्टीविसी दिकत न करणें. एकून गांव दोन छ २ जिल्हेज

मोर्तब
शूद

या दिनकरदास व्यासाच्या सहाव्या पिढीतील सांप्रत विद्यमान पं. प्रेमसुख व्यास मुकाम भोजपुरी तहसील मुंडावर अलवरस्टेट.

क्र. २३ }
मू. न. }   { श. १७२५ भाद्र. व. १२
                { इ. १८०३ सप्टं. १२

(मोडीपत्र, मोहोर नाहीं.)

आमिलान हाल व इस्तकबाल प्रो मुंडावर सरकार रेवाडी सुबे शहाजहांबाद बिदानंद सुरुसन अर्बा मय्यातैन व आलफ वेदमूर्ती रा. दिनकरदास वलद रामसुख व्यास वास्तव्य देहली याजकडेस मौजे भोजपुरी हा गांव कदीम पासोन चालत आला आहे आणि हुजूर दवलतराव शिंदे यांचे येथून पर्वाना सरकारी आणिला त्यावरून सरकारांतून गांव उदक धर्मादाय करार करून सनद करून दिली असे. तरी मौजे मजकूर हा गांव त्याजकडे चालविणें कोणे गोष्टीविसी दिकत न करणें. जाणिजे छ २५ माहे जमादिलावर, स १२११ फसली

मोर्तब
शुद

क्र. २४ }
मू. न. }   { श. १७२५ मार्ग शु. २
                { इ. १८०३ नोवें. १६

(फारसी व मोडी)

शहाआलम बादशाह गाजी नायब माधोराव सेंधिया आलिजा बहाद्दर. फिद्वी राजा समशेर बहाद्दर खंडेराव हरी ... ... १२११ फसली

अमिलान् हाल व इस्तकबाल प्रो बावल सरकार रेवाडी सूबे शहाजहाँबाद, सुरूसन अर्बा मयातेन व अल्लफ वेदमूर्ती रा. दिनकरदास व प्रेमसुख व्यास वास्तव्य देहली याणीं येऊन विदित केले कीं, आम्हांस कांहीं उपजीविका आपले महालीं करून देणें. त्यावरून मनास आणितां. ब्राह्मण ज्योतिषी व सत्पात्र जाणोन प्रो मजकूर पो मौजे दुलहेडा हा गांव उदक धर्मादाय करून दिला असे तरी तो त्याजकडे चालविणें दिकत न करणें. छ १ साबान १२११ फसली*

मोर्तब
सुद

—शं. ना. जोशी.

* हा फसली उत्तरी पद्धतीचाच आहे.

मुंडावर—

भोजपुरीहून मुंडावर १२ मैल पडतें. हा कजबा प्राचीन आहे. सांप्रत अलवर संस्थानांतील तहसिलीचें हें ठिकाण असून लोकसंख्या सुमारें पांच हजार असावी. बी. बी. सी. आय. रेल्वेच्या हरसोली स्टेशनपासून ७ मैल अंतरावर हें आहे. स्टेशनवर पुष्कळ उंटवाले भाड्याकरितां प्रवाशाच्या पाठीस लागतात. मुंडावर हें मराठ्यांच्या हुकुमतीच्या वेळींहि तहसिलीचेंच ठिकाण होतें.

घोडेवालोंका राज—मराठ्यांच्या राज्याला उद्देशून कित्येक लोक 'घोडेवालोंका राज' असेंहि म्हणतात. या प्रांतांत घोड्यावरून येणारे असे पहिल्यानें मराठेच असावेत. शिंद्यांचे सेनापति गोपाळराव भाऊ यांच्यासंबंधानें लोकांना मोठा आदर वाटतो. "गोपाळराव भाऊ मरेठा, हमारे यहां राज करता था" असे म्हातारे लोक म्हणतात.

मुंडावरचे प्रसिद्ध जहागीरदार 'रावराजे' हे अलवर येथें रहातात. हे पूर्वी राजपूत होते, पुढें मुसलमान झाले. हे सांप्रत अलवर येथें ऑनररी मॅजिस्ट्रेट आहेत. यांच्याजवळ जुने कागदपत्र असावयास पाहिजे होते, परंतु कांहीं एक उपलब्ध झालें नाहीं.

रताय—

मुंडावरपासून १२ मैल अंतर. ह्यास इकडील लोक 'रताय सराय' असेंहि म्हणतात. 'रताय मुंडावर' असा उल्लेख जुन्या कागदपत्रांत सांपडतो. रताय आणि सराय या दोन गांवांमध्यें ६ मैल अंतर असून सराय येथें एक जुना किल्ला आहे. तो पडक्या स्थितींत आहे. येथें कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र मिळाले नाहींत. मराठ्यांची स्मृति कोणत्याहि प्रकारची लोकांनीं कळविली नाहीं.

नीमराणा—

सुमारें पांच हजार लोकसंख्येचा हा गांव एका लहानशा डोंगराच्या पायथ्याशीं वसलेला आहे. बी. बी. सी. आय. रेल्वेच्या कुंड

स्टेशनापासून १२ मैल अंतरावर हा आहे. ‘ अटेली ’ स्टेशनवरूनहि नीमराण्यास लोक जातात. येथील राजे ‘ चव्हाण ’ वंशाचे राजपूत आहेत. त्यांचा रहाण्याचा प्राचीन वाडा दुरून पुष्कळ अंतरावरून दिसतो. नीमराणा हें एक लहानसें स्वतंत्र संस्थान आहे. यांच्या ताब्यांत लहानमोठे पंचवीस गांव असून वार्षिक उत्पन्न एक लाख रु. चें आहे असें म्हणतात. गांवांत दवाखाना, ए. व्ही. स्कूल, मुख्य कचेरी, ब्रँच पोस्ट ऑफिस इ. संस्था आहेत. गांवाच्या जवळच एक तलाव आहे. येथील हवापाणी फारच उत्तम आहे. सांप्रतचे राजेसाहेब यांस भेटल्यावर त्यांनीं मोठ्या प्रेमानें माझें स्वागत केलें.

नीमराण्याचें राज्य पूर्वीं फार मोठें होतें. तेव्हां सुमारें शंभर गांवें यांच्याकडे होतीं. इ. १८०२ पर्यंत राज्याचा हा विस्तार कायम टिकला. नीमराण्याचे त्यावेळचे राजे हे मराठ्यांचे मित्र होते. मराठ्यांचे मोठमोठे सेनापती येथें फौजेसुद्धां तळ देऊन असत. इंग्रजास नीमराण्याच्या राजाची व मराठ्यांची मैत्री दुःसह वाटूं लागली. मराठ्यांचे सेनापती नारायणराव यांचें नांव या प्रांतांत अजरामर आहे. सांप्रत लहान थोर सर्वांना या नारायणरावांच्या पराक्रमाचें कौतुक, आदर, वाटत आहे. इंग्रजांनीं नारायणराव यांना पकडण्याकरितां नीमराण्याचे राजास कित्येक वेळां सांगितलें पण त्यानें तें ऐकिलें नाहीं. या संबंधानें निरनिराळ्या लोककथा येथें उपलब्ध आहेत. लोककथा—नारायणराव यास निमराण्याचे त्यावेळचे राजे ‘ चंद्रभानसिंग ’ यांनीं आपल्या महालांत ठेवून घेतलें. ‘ जनरल लेक ’ नारायणराव यांस पकडण्याकरितां फौज घेऊन हिंडत होते. त्यांस हें वर्तमान समजल्यावर त्यांनीं निमराण्याचा महाल व गांव यास फौजेचा वेढा दिला. “ मराठ्यांना या प्रांतांतून काढून टाकण्याबद्दल आम्ही इतके प्रयत्न करीत असतांना तुम्ही त्यास आपल्या महालांत ठेवितां हें ठीक नव्हे ” याप्रमाणें गोंडीगुलाबीच्या गोष्टी सांगून लेकसाहेबानें चंद्रभान-

सिंगाचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण उपयोग झाला नाहीं. चंद्रभानसिंगानें लेकसाहेबास निक्षून सांगितलें कीं मीं ज्याला एकदां आपला मित्र असें म्हटलें त्यास प्राण गेला तरी सोडणार नाहीं. शेवटीं इंग्रजांनीं महालावर तोफांचा व बंदुकांचा भडिमार सुरू केला. गांवांतील लोक गांव सोडून पळून गेले. रात्रौ बारा वाजल्यावर अंधारांत तोफांच्या व बदुकांच्या गोळ्यांचा भडिमार चालू असतांना चंद्रभानसिंग नारायणराव बहाद्दर यासुद्धां येथून पन्नास मैलांवर जयपूर स्टेट मधील 'प्रागपावटा ' नांवाच्या ठिकाणीं घोड्यावर स्वार होऊन निघून गेले. इंग्रजांना ही गोष्ट सकाळीं समजल्यावर त्यांनीं नीमराण्याचा वेढा उठवून रेवाडीकडे कूच केलें.

वरील कथा नीमराण्यास सर्वश्रुत आहे. आबालवृद्ध सर्वांना माहीत आहे. या कथानकासंबंधानें एक दोहा इकडे प्रसिद्ध आहे. नीमराण्याच्या रायभाटांनीं तो म्हणून दाखविला. तो पुढीलप्रमाणें. दोहा—

—दोहा— (कवित्व)

" अमरयश किन्हूं, दक्खनी शरण राख लिन्हूं, फिरंगी को न दीन्हूं भयी फौज नकी भीड है "

" अपनो प्राण पाल्यो, जीव लोभ ना विचाऱ्यो, ले 'नारायण' उबाऱ्यो, दाता पावस परव बीर है "

'नीमागड' गाज्यो सो विराज्यो राज्य गद्दीपे, नौबत दरबार बाज्यो परवे रघुवीर है ॥

महासिंगजीके नंद " चंद्रभान " भूप जंग, सतको हरचंद बली हटको हमीर है ॥

प्याऊची कथा—नीमराणाके घाटीमे एक प्याऊ है. यह बहुत प्राचीन है कहते है की अंग्रेज किसी राजाको पकडके इस घाटीमेसे जा रहेथे. नीमराणाके राजाको इसबात का पता लगा. पूछा. की घाटीमे

किसकी फौज जा रहीहै, कौन है, कुछ स्वार भेज दिये ? बाद पता लगगया कि, अंग्रेज किसी दक्खनी राजाको पकडके पिंजरेमे बंद करके करके ले जा रहे है. राजाने पूछा, कितनी फौज है ? जबाब मिला, करीब २०० ज्वान है. घुडस्वार है और चारपांच फिरंगी है. अंग्रेज है. राजाने तुरन्त अपनी फौज भेजकर फिरंगी को मार भगाया. और दक्खनी मरेठा 'नारायणराव' को अपने मेहेलमे रक्खा. नायणराव मर्द बहाद्दर था " इ. इ.

और एक कथा–"कहते है कि, राजा 'चंद्रभानसिंगका' जमाना था. कोई दक्खनी राजा अपनी फौज लेकर नीमराणाके घाटीमेसे गुजर रहे थे. प्याऊपर ठहर गये. आराम किया. प्याऊ को पांच सुनेरी मोहोरे दियी. प्याऊने झट राजाको खबर दियी. राजानें पूछा "वे कौन राजा थे ! कहांतक पहुचगये ? कितनी दूर गये होंगे ?" प्याऊनें कहा "करीब एक घण्टा हा गया है. और आप जल्दी स्वार होकर जाय तो अभी ५।६ कोस तक आपको मिल सकते है." चंद्रभानसिंगने तुरन्त स्वार होकर राजाके पास जा कर कहा की, "हे राजा, मेरे मेहेलमें आकर कुछ दीन मेरा अतिथि रहने की इच्छा है ! जैसी मेरी ताकद है वैसा आपका स्वागत सन्मान करूंगा." मरेठा राजानें कहा "मैं आपको बहुत धन्यवाद देता हूं. परन्तु हे राजा, मेरे पीछे, मुझे पकडनेके लिये फिरंगीओंकी फौज आ रही है ! ! आप आपनेको वृथा क्यों धाखैमे डालते हो ?" चंद्रभानासिंग ने एक न मानी. और 'नारायणराव मरेठा' को आपने मेहेलमे बडे प्रेम से कई दीनों तक रक्खा " इ. इ.

नीमराण्याचे सांप्रतचे राजे 'उमरावसिंग' हे विद्याव्यासंगी व प्रेमळ स्वभावाचे दिसले. मराठ्यांच्या संबंधानें त्यांना मोठा अभिमान वाटतो. "इंग्रजांनीं इ. स. १८२० मध्यें आमचें राज्य जवळजवळ खालसा करण्याचाच डाव योजिला होता, पण तसें न होतां

शंभर गांवांपैकीं सांप्रत फक्त पंचवीस गांव राहिले. मराठ्यांना मदत केल्याचा आमच्या पूर्वजांवरील रोष अशा रीतीनें इंग्रजांनीं शांत केला. इ. इ. गोष्टी माझे पूर्वज सांगत आले आहेत व तसेंच "आमचेकडील सर्व कागदपत्र, मौल्यवान् जडजवाहीर, किंमती वस्त्रें इ. इंग्रजांनीं नेलीं" असेंहि ते म्हणाले.

काटी–

सुमारें दोन हजार लोकसंख्येचें हें खेडेंगांव 'नाभा' संस्थानांत आहे. गांवाजवळ एक लहानसा डोंगर आहे. अटेली स्टेशनपासून फक्त ७ मैल अंतर आहे. जवळच एक 'खेडी' म्हणून गांव आहे. त्यावरून इकडील लोक 'काटीखेडी' असेंहि म्हणतात. कित्येक लोक 'बावलकाटी' असेंहि म्हणतात. बावल येथें सरकारी अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या आहेत. काटी आणि बावल या दोन ठिकाणांमध्यें २० मैलांचें अंतर आहे. काटीच्या लोकांना सरकारी कामानिमित्त बावल येथेंच जावें लागतें. काटी हा गांव पूर्वीं डोंगराच्या पलीकडे होता असें लोक सांगतात. शंभर वर्षें झालीं डोंगराच्या दुसऱ्या बाजूस वसविला गेला. डोंगरावर एक शंकराचें देऊळ आहे. शिवाय मोठमोठ्या दगडी इमारतींचे अवशेष कायम आहेत. हें मंदिर मराठ्यांच्या वेळचें आहे असें इकडील लोक सांगतात.

डोंगरावर मराठ्यांची कचेरी असे असें लोक सांगतात. गांव प्राचीन आहे यांत शंका नाहीं. काटीस एका महंताजवळ पट्टा पाहिला. ही एक मोडी भाषेंतील फाटकी चिठ्ठी आहे. यांत पूजेकरितां व देवाच्या नैवेद्याकरितां डाळ, आटा, घी व पावआणा, द्यावा असा उल्लेख आहे. त्याप्रमाणें नाभा संस्थानांतून देण्यांत येतें. 'मरेठोंकी हुकूमत थी' असें काटीचे सर्व लोक सांगतात. येथें 'खंडेराव हरी' व त्यांच्यानंतर 'वामनाजी खंडेराव' हे मराठ्यांचे सेनापती रहात असत.

क. २५
मू. नं.

श. १७१०
इ. १७८८

शहाआलम बादशाह गाजी, फिदवी सवाई माधोराव नारायण बहादुर, पंडित प्रधान, सवाई मनसुरे जमा, गाहात बिल इस्तिकलाल, अमीरउल उमराव महाराजा दवलतराव सेंधिया अलीजा बहादूर उमदतुलउमरा फर्जंद अर्जमंद आजीज.
११९८ फसली.
१२०३ हिजरी.

(काटी येथें जयनारायणसिंग नांवाचे एक रजपूत रहातात. यांच्या भाऊबंदांचीं कित्येक घरें काटीस आहेत. हे गृहस्थ धनवान असून नम्र दिसले.) यांचे पूर्वज 'ठाकूर हुकुमसिंग' यांना मराठ्यांनीं ७ गांव ४ कुवे व २५०० रु. वर्षासनाचा पट्टा दिलेला आहे.' हें वर्षासन नाभा दरबारांतून मिळत आहे. काटीस हेंच घराणें मोठें आहे. यांना जहागीरदार या नांवानेंहि संबोधितात. ठाकूर हुकुमसिंग यांच्या सहाव्या पिढींतील, जयनारायणसिंग हे सांप्रत विद्यमान. पत्ता-ठाकूर जयनारायणसिंग जहागीरदार, काटी. पो. अटेली, नाभास्टेट.

नारनोळ—

हें बी. बी. सी. आय्. रेल्वेचें स्टेशन असून पतियाळा संस्थानांतील जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण. नारनोळ शहरची लोकसंख्या सुमारें चाळीस हजारांवर असावी. येथें पोस्ट व तार ऑफिस, हायस्कूल, सिव्हिल हॉस्पिटल, लेडी हॉस्पिटल, नाझिम कचेरी, म्युनिसिपालिटी, आर्यसमाज, सनातनधर्म समाज इ. संस्था आहेत. स्टेशनपासून गांव अगदीं लागूनच आहे असें म्हटलें तरी चालेल. येथें अग्रवाल, वैश्य व गौड ब्राह्मण या दोन वर्गांचा मोठा भरणा आहे. नारनोळचे वैश्य हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत व्यापाराकरितां पसरलेले आहेत. गांवाच्या चारी बाजूंस तट, दरवाजे, गुमच, मशीदी दिसतात. हा कजबा फार जुना आहे. मोंगल बादशहांच्या वेळीं हें परगण्याचें मुख्य ठिकाण होतें. येथें मराठ्यांच्या पूर्वीं नजफकूलीखानाचा अंमल होता. त्यापूर्वीं येथें एक रजपूत राजा राज्य करीत होता.

'नाहारनवल' या शब्दाचा अपभ्रंश नारनोळ असा झालेला आहे. नारनोळच्या लोकांनीं कित्येक क्रांत्या पाहिल्या. नारनोळ येथें व आसपास, कित्येक युद्धें झालीं होतीं. याची साक्ष शहराबाहेर हिंडूं लागलें म्हणजे पटते. शहरांत " संगीवाडा " नांवाचा भाग धनाढ्य वैश्यांचा आहे. येथील कित्येक प्राचीन इमारती, देवळें व तलाव, पहाण्यासारखे आहेत. प्रवाशांना रहाण्याकरितां कित्येक धर्मशाळा व देवळें आहेत. नारनोळ शहरांत कित्येक जुने वाडे ओसाड पडलेले दिसतात. शहराच्या आसपास शेंकडों जुनीं थडगीं दिसतात. ' आणासागर ' नांवाचा प्राचीन तलाव प्रसिद्ध आहे. येथील हवापाणी उत्तम प्रकारचें आहे.

मराठ्यांनीं हा प्रांत स. १७९० चे सुमारास नजफकूलीखानापासून जिंकून घेतला. सुभेदार खंडेराव हरी व गोपाळराव रघुनाथ ह्या दोन सेनापतींचीं नांवें लोकांच्या जिभेवर अजूनहि खेळतात. शिवाय रघुनाथराव नांवाचें एक मराठ्यांचे अंमलदारहि या ठिकाणीं होऊन गेले असें कळतें.

मराठ्यांची स्मृति--

पुराणेमंडीमे एक दरवाजा बनाहुवा है जिसको ' रघुनाथराव ' मरेठाका बनवाया हुवा कहतेहै. सांप्रत एक महंतके पास है. अलावा इसके बजारके बीचमे चतुर्भजका मंदीर (गोपालमंदीर) मरेठोंका बनवाया हुवाहै. चामुंडा देवीकी गढी, और एक तालाव मरेठोंका बनवाया हुवा है. उत्तरकी तरफ, छलक नदीके किनारेपर एक पूल और शिवालय पुख्ता इमारत मरेठोंके हुकूमतके समयकी है.

(लाला बिहारीलाल रेवाडी यांच्याकडे मिळालेल्या टिप्पण बुकावरून).

ढोसीतीर्थ--

नारनोळापासून चार मैलांवर ' ढोसी ' म्हणून तीर्थ आहे. तेथें च्यवन ऋषी तपश्चर्या करीत होते असें म्हणतात. ' ढोसर '

म्हणून जे ब्राह्मण या प्रांतांत आहेत त्यांचा विकास येथूनच झाला असें म्हणतात. येथें प्रत्येक पौर्णिमेला मोठा मेळा भरतो. डोंगरांत अगदीं एकीकडे हें स्थान आहे. येथें कित्येक कुंडें असून सभोंवार प्राचीन देवळें दृष्टीस पडतात. येथील कित्येक देवालयें मराठ्यांनीं बांधिलीं असें लोक सांगतात.

मांदी—

नारनोळपासून चार मैल दक्षिणेस मांदी म्हणून एक खेडें आहे. तेथें एक मारुतीचें प्राचीन स्थान आहे. " यह हनुमानजीका मंदीर तो बहुत पुराणा है; मरेठोंके राजके समयका है " असें लोक म्हणतात. मंदिरावर कोणत्याहि प्रकारचा शिलालेख नाहीं. हें हनुमानजीचें स्थान या प्रांतांत प्रसिद्ध आहे. दूरदूरचे लोक या ठिकाणीं दर्शनाकरितां येतात.

भाकरी—

नारनोळपासून आठ मैलांवर पश्चिमेस ' भाकरी ' नांवाचा खेडेगांव आहे. हा गांव पतियाळा संस्थानांत आहे. हा गांव " गौरीशंकर " नांवाच्या शाकद्वीपी ब्राह्मणास पेशव्यांनीं इनाम करून दिला. खर्ड्याच्या लढाईला मुहूर्त काढून देणारा हाच ज्योतिषी. सांप्रत गौरीशंकराचे वंशांतील सहाव्या पिढींतील. निरनिराळीं घराणीं या गांवचें उत्पन्न खात आहेत. हा गौरीशंकर पेशव्यांच्या पदरीं राहात होता असें भाकरीचे लोक सांगतात. अस्सल सनद, पेशव्यांचें महादजी शिंद्यास पत्र इ. कागद, ग्वाल्हेर संस्थानांतील इतिहाससंशोधक रा. रा. भास्कर रामचंद्र भालेराव यांच्यापाशीं मीं पाहिले. याशिवाय गौरीशंकर यांना मराठ्यांकडून अलवर संस्थानांत ' खेडाकीलपूर ' व ग्वाल्हेर संस्थानांत ' निधान ' इ. गांव इनाम मिळाले होते. या दोन्ही गांवीं त्यांचे आप्तेष्ट सांप्रत विद्यमान आहेत. भाकरीस शाकद्वीपी ब्राह्मणांचीं १०।१२ घरें आहेत. शिवाय गौड ब्राह्म-

णांचीं २५।३७ घरें आहेत. या शाकद्वीपी ब्राह्मणांचा व गौड ब्राह्मणांचा रोटीबेटीव्यवहार होत नाहीं.

खटोटी—

नारनोळच्या मिश्रांना हा गांव इनाम आहे. भाकरीपासून थोड्याच अंतरावर हा गांव आहे. पण ही गोष्ट मला मागाहून कळली. ' राठ ' प्रांतांतील कार्य आटोपून ' मेवात ' मध्यें भ्रमण करीत असतांना मला ही कळली. यास्तव मिश्रांचे कागदपत्र पहाणें राहून गेलें. हा गांव मराठ्यांनीं दिलेला आहे हें खास.

तिनकीरुढी—

मुंडावर तहशीलमध्यें हा गांव असून, किशनगडच्या मिश्रांकडे आहे. सनद (पट्टा) मिळाली नाहीं. गांव मराठ्यांनीं आमच्या पूर्वजांस दिला असें पं. शतानंद मिश्र सांगतात.

नारनोळकडील वाक्प्रचार—

नारनोळपासून थोड्याच अंतरावर ' ठणवास ' म्हणून गांव आहे. तेथें मी पं. हजारीलाल वैद्य यांचेकडे मुक्काम केला होता. त्यांनीं माझें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. मी महाराष्ट्रीय आहे असें सांगितल्यावर ते म्हणाले, ' हमारे प्रांतमे तो आप लोगोंकी हुकूमत थी, बडे सौभाग्य की बात है की, आपका दर्शन हुवा ! ! ! ' त्यावर गांवांतील कित्येक वृद्ध मंडळींस बोलाविलें. तेव्हां आमच्याकडे एक वाक्प्रचार अजूनहि अस्तित्वांत आहे, असें लोकांनीं मला सांगितलें. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याशीं भांडू लागला तर तो दुसऱ्यास उद्देशून म्हणतो " तू कोन ऐसो खांडेराव लग्यो है " अथवा तू " बडो खांडेराव बनबैठ्यो है ? " *

* सुभेदार खंडेराव हरी उर्फ आप्पा खांडेराव, राजा समशेर बहाद्दर, महादजी शिंद्याचे सेनापती.

नारनोळपेक्षां कानोडला त्या काळीं ज्यास्त महत्व होतें असें इतिहासावरून दिसतें. कानोडचा किल्ला विस्तारानें फारच मोठा व इतिहासप्रसिद्ध आहे. नारनोळपासून कानोड १८ मैल पडतें. मोटारींची रहदारी एकसारखी सुरू आहे.

सांप्रत व्यापाराच्या दृष्टीनेंहि नारनोळचें महत्त्व बरेंच आहे. खेतडी, सिंयान, लोहारु इ. दूरदूरच्या ठिकाणाहून उंटाचे काफिले माल घेऊन चोंहीकडे चाललेले दृष्टीस पडतात. सेखावाटी प्रांतांतून नारनोळकडे लोकांची येरझार सारखी सुरू असते.

कानोड उर्फ महींद्रगड—

सुमारें दहा हजार लोकसंख्येचा हा गांव पतिआळा संस्थानांतील तालुक्याचें ठिकाण आहे. जिल्ह्याचें ठिकाण नारनोळ हें आहे. कानोडा हा गांव नारनोळइतकाच प्राचीन आहे असें हा गांव पाहिल्याबरोबर प्रवाशास वाटतें. गांवांत पोस्ट व तार ऑफिस, दवाखाना, म्युनिसिपालिटी, सार्वजानिक वाचनालय, संस्कृत पाठशाळा, ए. व्ही. स्कूल, इ. संस्था आहेत. मुख्य रस्ता रुंद असून दुतर्फा दुकानें असलेलीं दिसतात. आसपास १५।२० कोसांवर दुसरें मोठें शहर नसल्यामुळें दूरदूरचे लोक बाजारहाट करण्याकरितां येथें येत जात असतात. मुख्य रस्त्यांत उंटांची इतकी गर्दी असते कीं, पायीं चालणाऱ्या मनुष्यास डोळे उघडे ठेऊनच चालावें लागतें. शहरांत कित्येक प्राचीन मंदिरें व धर्मशाळा असल्यामुळें प्रवाशास कोणत्याहि प्रकारची गैरसोय भासत नाहीं. बिडाट मोहोल्ला, कानोडिया मोहोल्ला तिवाडी मोहोल्ला, बास मोहोल्ला, करेलिया बाजार, कामपुरा मोहोल्ला इ. शहराचे निरनिराळे भाग आहेत. 'कानोडिया' म्हणून जे आग्रवाल वैश्य आहेत ते मूळचे कानोडचेच रहाणारे असें समजावें. शहरांत ब्राह्मण आणि वैश्य या दोन वर्गांचाच जास्त भरणा असलेला

दिसतो. कानोड येथें कित्येक धनवान् वैश्य रहातात. कौशिक प्रिंटिंग प्रेस नांवाचा एक छापखानाहि येथें दिसला.

कानोडचा किल्ला—

शहराच्या पश्चिमेस थोड्या अंतरावर हा प्रचंड भुईकोट किल्ला असून दूरदूरचे प्रवासी हा किल्ला पहाण्याकरितां येतात. ऐतिहासिक दृष्ट्या हा किल्ला फार महत्त्वाचा आहे, यांत शंका नाहीं. मराठे या प्रांतांत येण्यापूर्वी नजफकूलीखानाच्या ताब्यांत हा किल्ला होता.

हा किल्ला आपल्या ताब्यांत असावा अशी फार वर्षांपासून मराठ्यांची इच्छा होती. मराठ्यांनीं हा किल्ला सर करण्याकरितां ४।५ वेळां निकराचे हल्ले चढविले. इ. स १७९० च्या अखेरीस नजफकुलीखान मृत्यू पावला. त्याच्या स्त्रीनें मिर्झा इस्माइल बेग नांवाच्या सरदारास आपल्या संरक्षणासाठीं बोलाविलें. किल्ला फार जुना असल्यामुळें तेथें पुष्कळ धन असावें अशी मराठ्यांची कल्पना होती.*

एवढा मजबूत, विस्तृत, प्राचीन आणि मध्यवर्ती असलेला हा किल्ला आपण ताब्यांत घेऊन तेथें केव्हां राज्य करूं असें मराठ्यांना होऊन गेलें होतें. यासंबंधीं विस्तृत हकीगती " दिल्लीकडील राजकारणें " (हिंगणें यांचीं पत्रें) या पुस्तकांत ठिकठिकाणीं वाचावयास मिळतात. शेवटीं खंडेराव हरी, गोपाळराव भाऊ, आणि पेरन या तिघा सेनापतींनीं आपापल्या फौजा एकत्र करून शेवटचा व निकराचा हल्ला चढविला व किल्ला सर केला. मिर्झा इस्माइल बेग पळून गेला.

हा किल्ला कोटपूतळीच्या किल्यापेक्षां विस्तारानें पांचपट मोठा आहे. किल्याचा घेर एक मैलाचा असावा. किल्याभोवतीं भव्य खंदक खणलेला आहे. किल्याचें मोठें प्रवेशद्वार दुरूनच दिसूं लागतें, प्रवाशास हें मोठें दार दिसलें म्हणजे जणूकाय आपणास आंत येण्याविषयीं

*"वाकॉ-ए-शाहाआलम-" वरून- (अलवरसंस्थानचा इतिहास); लेखक पिनाकीलालशर्मा (अप्रकाशित).

तें सूचना करीत आहे असा भास होतो, व आनंद होतो; आणि आंत केव्हां जाईन असें होऊन जातें. प्रवेशद्वाराजवळ पहारेकऱ्यास बसण्याची प्रशस्त चौकी आहे. आंत गेलें म्हणजे दुसरा असाच एक मोठा दरवाजा दिसतो. या दोन्ही दरवाज्यांना मोठे मोठे लंगरी खिळे असलेले दिसतात.

दरवाज्याची उंची सुमारें वीस फूट असावी. दुसऱ्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे मुख्य इमारत दिसूं लागते, पण सभोवार नजर फेंकली म्हणजे कित्येक मोठमोठ्या प्राचीन भव्य इमारती दृष्टीस पडतात व यांतील कोणती इमारत मुख्य समजावयाची हेंच कळत नाहीं. तेणेंकरून प्रवासी थोडासा बुचकळ्यांत पडतो. काय पहावें आणि काय नाहीं असें होऊन जातें. एका भव्य इमारतीचा जेलासारखा उपयोग करण्यांत आला आहे. पतियाला संस्थानचे जन्मठेपेचे कैदी येथें राहातात. शिवाय पुष्कळ पहारेकरीहि रहातात. सांप्रत किल्यांतील एकंदर मनुष्यवस्ती १५० च्या वर असावी. किल्याच्या या भागाकडे कोणाहि प्रवाशास जाऊं देत नाहींत. जेलासारखा उपयोग करितां यावा म्हणून या इमारतींची ठिकठिकाणीं दुरुस्ती केली आहे असें जेलरनें मला सांगितलें. कित्येक ठिकाणीं पूर्वीच्या लहान भिंती पाडून मोठ्या भिंती (तट) बांधण्यांत आल्या आहेत असें ते म्हणाले.

किल्याच्या बाजूच्या मैदानांत कांहीं जुन्या तोफा पडलेल्या आहेत. एका तोफेवर कांहीं लिहिलेलें दिसलें पण तें वाचतां येत नाहीं इतकें अस्पष्ट आहे. किल्याच्याबाहेर समोरच जी एक मोठी इमारत दिसते तीहि प्राचीन असून तेथें पूर्वी मराठ्यांची कचेरी भरत असे, असें म्हणतात. किल्यांतील मोठमोठ्या खोल्यांतून तलवारी, तोफांचे गोळे, ढाली, यांचे ढिगारेचे ढिगारे सांठवून ठेविलेले आहेत. तोफांचे व बंदुकांचे गोळे किल्यांत अजूनहि सर्वत्र सांपडतात. या शिवाय, पूर्वीच्या काळीं फौजेचा मुक्काम असतांना शिपायांनीं जेवण्यास केलेल्या

'बाठ्यांचे' अवशेष किल्यांत व बाहेर खणूं लागले म्हणजे सांपडतात असेंहि लोकांनीं सांगितलें.

मराठ्यांच्यापूर्वी हा किल्ला मुसलमान राजाच्या ताब्यांत होता व नंतरहि झझरच्या नबाबाकडे देण्यांत आला. सुमारें १५ वर्षांपेक्षां ज्यास्त येथें मराठ्यांचें वास्तव्य नव्हतें. यामुळें, मुमताज दरवाजा, बेगम दरवाजा अशीं नांवें दरवाज्यावर लिहिलेलीं दिसतात. मुख्य इमारतीस आणखी दोन दरवाजे आहेत. दहा हजार फौज सुरक्षित व सुव्यवस्थित राहूं शकेल इतका हा किल्ला विस्तारानें मोठा आहे. किल्यांत मोठमोठ्या भव्य प्राचीन इमारती, ओसाड पडलेल्या दिसतात. राखेचे ढिगारेचे ढिगारे खोल्यांतून भरलेले दिसतात. एकट्या मनुष्यास निर-निराळ्या इमारतींतून हिंडताना भीति वाटते. किल्यांतील कित्येक इमारती शाबूत असून आपल्या प्राचीनत्वाची साक्ष पटवितात.

किल्यांतील कित्येक इमारतींना पांढरा संगमरवरी दगड वापरण्यांत आला आहे. कांहीं ठिकाणीं नकशीकामही केलेलें दिसतें. किल्यांत कैदी लोकांचा सतरंज्या तयार करण्याचा मोठा कारखाना आहे. मध्यभागीं एक विहीर आहे. दुसऱ्याहि कित्येक विहिरी किल्यांत आहेत. एका विहिरीच्या खालच्या बाजूस भिंतीवर नकशीकाम केलेलें दिसतें. चित्रांचा रंग जशाचा तसाच अद्याप कायम आहे. दोन पेहेल-वानांची कुस्ती, द्रोणागिरी हातांत घेतलेलें मारुतीचें चित्र, मोराचें चित्र, वाघाचें चित्र एवढेंच नकशीकाम सांप्रत दिसतें. या किल्यांत पूर्वी हिंदू राजा रहात असावा. याचें प्रमाण या चित्रांशिवाय दुसरें सांप्रत दिसत नाहीं. विहिरीवर चढून जाण्यास जिना आहे तोहि प्राचीन आहे. जिना चढून वर गेलें म्हणजे खालीं नजर फेंकली असतां प्राकृतिक (नैसर्गिक) दृश्य उत्तम दिसतें. दरवाज्याच्या एका छतास एक मोठें फूल कोरलेलें आहे, ही नकशी कायम आहे. या शिवाय दुसरें नकशीकाम सांप्रत दिसत नाहीं, मारुतीच्या डोक्यावर आघात झालेला दिसत आहे.

तेथें नकशी छिन्नभिन्न झाली आहे. किल्ल्यांत कधीं कधीं तांब्याचे चांदीचे शिक्के (नाणीं) सांपडतात असें पहारेकरी सांगतात. किल्ल्यांतील पूर्वीचे बरेचसे कागदपत्र जाळण्यांत आले व कांहीं पटियाळा येथें नेण्यांत आले असें म्हणतात. मराठ्यांच्या हुकूमतीनंतर † झज्झरची नबाबी येथें स्थापित झाली. ही नबाबी जवळ जवळ ४० वर्षें टिकली. इ. स. १८५७ सालानंतर हा प्रांत पटियाळा संस्थानास इंग्रजांनीं तोडून दिला.

मरेठांका बाग और छत्री—कानोड शहरास लागून थोड्याच अंतरावर पूर्वेस एक बावडी आहे. तेथेंच पूर्वी मराठ्यांची मोठी बाग होती असें लोक म्हणतात. सांप्रत मोठमोठे वृक्ष आपल्या प्राचीनत्वाची साक्ष पटवितात. ही विहीर कोरडी असते. झरा नाहीं. अशा प्रकारच्या विहिरी ह्या प्रांतांत नाहींत. विहिरीजवळ एक गुरुद्वारा आहे. तेथेंच एक जुनी छत्री बांधलेली दिसते. ही छत्री 'शामराव गुणाजी' नांवाचे मराठ्यांचे सेनापति कानोडचा किल्ला सर करीत असतांना मारले गेले, त्यांची आहे असें म्हणतात. कोणत्याहि प्रकारचा शिलालेख नाहीं. रावसाहाब बिहारीलाल, रहीस, सराय बलिभद्र, यांचें रेकार्ड पाहात असतां एका जुन्या कागदावर खालील नोंद मिळाली. हा कागद शंभर वर्षांचा जुना आहे.

"किला कानोडमें मरेठोंकीं अंमलदारी रही. करीब पंधरा साल रही. "वामनरावजी*" मरेठानें बाग लगाया. एक छत्री बनवायी, सात ठाकुरद्वारे बनवाये, पांच शिवालय और एक हवेली बनवायी. मरेठोंकी हूकूमतका खातमा लसवारीके युद्धमे हुवा. मरेठोंको अपनी जायदाद किलेके बाहर निकालनेका मोका नहीं मिला. बाद झज्झर नबाबी हुई, और अंग्रोजोकी हुकूमत मालुम पडने लगी." (उर्दू)

---

† Jhaggar Nabab was the creation of the British.

* सुभेदार खंडेराव हरी यांचे दत्तक पुत्र.

राठ प्रांतांत भ्रमण करिते वेळीं मीं आपलें केंद्र ' कोटपुतली ' हें ठेविलें होतें. १०।१५ गांवें हिंडून झालीं म्हणजे मी कोटपुतलीस येऊन विश्रांति घेत असे. राठ प्रांतांतील काम मला जवळ जवळ ३ महिने पुरलें. तरीहि कित्येक काम बाकी राहिलें आहे. कित्येक लोकांच्या सनदा अजून पहाणें आहे. ज्यांच्याजवळ मराठ्यांचे पट्टे असतात त्यांच्याजवळ इतर कागदपत्रहि मिळण्याचा संभव असतो. कोणत्या वेळेस काय मिळेल याचा नेम नसतो. जें काम अजून शिल्लक राहिलें आहे त्याचा तपशील—तातारपूरच्या ठाकुरसाहेबांकडील कागदपत्रें पहाणें. कारण हें घराणें प्राचीन आहे. शिवाय खालील पट्टे पहाणें आहे—कोटपुतली जवळ ' गोपाळपुरा ' गांव आहे, तेथील महंता-जवळील पट्टा. अलवर संस्थानांतील बेहेरोड जवळ ' गूती ' म्हणून गांव आहे तेथील देवळास मराठ्यांनीं जमीन दिलेली आहे तो पट्टा. शिवाय बणेटी, देवता, छादडी, शामपुरा हीं अलवर संस्थानांतील गांवेंहि पहाणेचें राहून गेलें. येथें मराठ्यांनीं दिलेल्या माफी जमिनी आहेत हें मला मागाहून कळलें.

---

३ मेवात

' मेव 'जातीच्या मुसलमान लोकांचें या प्रांतांत प्राबल्य असल्यामुळें 'मेवात' या नांवानें हा प्रांत संबोधिला जातो. यांत अलवर संस्थानांतील बराचसा भाग व इंग्रजींतील ' गुडगांव ' जिल्ह्यांतील कांहीं भाग ह्याचा समावेश होतो. 'मेव' लोक हे पूर्वीपासूनच उपद्रवी ह्मणून प्रसिद्ध आहेत. यांनीं कोणत्याहि राजाला, आजपर्यंत स्वस्थ बसूं दिलें नाहीं. मराठ्यांच्या ताब्यांत हा प्रांत इ. स. १७८५ नंतर आला. त्यावेळीं कित्येक ठिकाणीं मेव लोकांनीं बंडें केलीं व तीं मोडण्याकरितां मराठ्यांना फार त्रास पडला. मराठयांच्या फौजा दाक्षिणेकडे गेल्या ह्मणजे हे लोक पुन्हां उपद्रव करीत, व मराठयांच्या घोड्यांच्या टापा पुन्हा ऐकूं येऊं लागल्या म्हणजे चुपचाप बसत. अशा प्रकारचा क्रम कित्येक वर्षें सारखा सुरु होता. नुकतेंच मेव लोकांनीं या प्रांतात जें बंड केलें होतें त्याची हकिकत बहुतेक लोकांनीं वर्तमानपत्रांतून वाचली असेलच. या बंडाचें पर्यवसान अलवारच्या महाराजांना पदच्युत करण्यांत झालें व नंतर हें बंड शांत झालें. असो.

अलवर—

ह्या सस्थांनाचे मूळपुरूष अथवा स्थापित करणारे, रावराजे प्रतापसिंग माचेडीवाले हे होत. यांची व महादजी शिंदे यांची फार मैत्री असे. अलवर संस्थांनात ' माचेडी ' म्हणून जो गांव आहे तें यांचें रहाण्याचें ठिकाण. त्या काळीं अलवर या ठिकाणाला फारसें महत्व नव्हतें. महादजी शिंदे अलवारच्या किल्ल्यांत वारंवार जाऊन रहात असत, असा उल्लेख इतिहासांत सांपडतो. या प्रतापसिंगांना पुत्र नव्हता. त्यांनीं बख्तावरसिंगास दत्तक घेतलें. हा बख्तावरसिंग कांहीं दिवस मराठ्यांच्या तंत्रानेंच चालत असे, पण पुढें पुढें त्यानें उघडपणें इंग्रजांची मैत्री संपादिली व इ. स. १८०३ मध्यें लासवारीच्या

लढाईच्या वेळीं त्यानें मराठ्यांच्याविरुद्ध इंग्रजांस मदत केली. इंग्रजांस तर हेंच पाहिजे होतें. लासवारीच्या पराभवामुळें मराठ्यांचा उत्तरेकडील राज्यविस्तार संपुष्टांत आला. व इ. स. १८१० मध्यें " अलवर " स्वतंत्र संस्थान मानण्यांत आलें व इंग्रजांचा कायमचा तह झाला.

रावराजा प्रतापसिंग सं. १८१२ से १८४७ तक
(श. १६७८ ते १७१२ = इ. १७५६–१७९०)

बखतावरसिंग सं. १८४७ से १८७१ तक
(श. १७१२ ते १७३६ = इ. १७९०–१८१४)

विजयसिंग सं. १८७१ से १९१४ तक
(श. १७३६ ते १७७९ = इ. १८१४–१८५७)

शिवदानसिंग सं. १९३१ से १९४९ तक
(श. १७९६ ते १८१४ = इ. १८७४–१८९२)

मरेठा चौकी किंवा दख्खनी चौकी--

अलवर पासून १५ मैल पूर्वेस ' रामगड ' नांवाचें तालुक्याचें ठिकाण आहे. अलवरपासून रामगडपर्यंत पक्की सडक आहे. हीच सडक पुढें दिल्लीस जाते. रामगड हें तालुक्याचें ठिकाण असल्यामुळें अलवरहून रामगडपर्यंत लोकांची येरझार एकसारखी सुरुच असते. रामगडच्या पश्चिमेस सुमारें दोन मैलांवर हें ठिकाण आहे. ह्या ठिकाणास कांहीं लोक ' चौकी ' या नांवानेंच संबोधितात. मराठ्यांच्या हुकमतीच्या वेळीं ह्या ठिकाणास फार महत्त्व होतें असें इकडील लोक सांगतात. " या प्रांतांतून जमा केलेलें धन मराठे येथें ठेवीत असत " असेंहि कांहीं लोक सांगतात. येथें पांचशें शिपायांचा जमाव असे असें लोक म्हणतात. जुन्या इमारतींचे पडलेले अवशेष दृष्टीस पडतात. येथेंच एक विहीर आहे. तीहि फार प्राचीन आहे. जवळच मेव लोकांचीं कांहीं घरें आहेत. गुरें चारण्याच्या निमित्तानें मेव लोकांचीं पोरें येथें सारा दिवस येऊन बसतात.

मेवाच्या पोरीस धन सांपडलें--

सुमारें ७।८ वर्षांपूर्वी एका मेवाच्या पोरीस ती ढोरें चारीत असतां कांहीं पिवळा पदार्थ चमकत असल्याचें दिसलें. तिनें ही गोष्ट आपल्या बापास कळविली व त्यानें येऊन जमीन खणण्यास सुरवात केली. एका काळ्या ताटांत असलेल्या १०।१२ सोन्याच्या मोहोरा त्यास मिळाल्या; त्या मेवानें ही गोष्ट कोणासहि कळविली नाहीं. पण या मुलीच्या भाग्यानेंच हें धन मिळालें अशी त्याची भावना झाल्यामुळें त्यानें तिचें लग्न मोठ्या थाटानें केलें. अर्थात् पुढें ही गोष्ट सर्वतोमुखीं झाली. यानंतर आसपासच्या लोकांचें लक्ष साहजिकपणेंच तिकडे वेधल्यामुळें जो तो येऊन त्या पडक्या इमारतीच्या आसपास खणूं लागला. पण त्यानंतर कोणास कांहीं मिळालें नाहीं असें रामगडचे लोक सांगतात. तरीपण रिकाम्या वेळीं तेथें जाऊन खणण्याचे प्रयत्न चालूच आहेत असें लोक म्हणतात.

बाबल—

हें बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें स्टेशन असून सांप्रत नाभा संस्थानांतील जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण, आहे. स्टेशनपासून अर्ध्या मैल अंतरावर हा गांव आहे. गांवाजवळच एक गढी आहे पण ती अर्वाचीन आहे असें लोक म्हणतात.

मरेठा गौड ब्राह्मण

येथें पं. ज्वालासहाय नांवाचे ‘ मरेठा गौड ’ ब्राह्मण राहातात असें मला समजलें. तेव्हां त्यांना भेटावें म्हणून त्यांच्याकडे गेलों. तुम्हांस ‘ मरेठा गौड कां म्हणतात ? तुमचा आणि मराठ्यांचा संबंध होता ? इ. प्रश्न मीं त्यांस विचारिले तेव्हां त्यांनीं पुढील उत्तर दिलें.

“ आम्ही वासिष्ठ गोत्री यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण, आमचे ‘ शासन मरेठा ’ हें आहे. आमच्या जवळ कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र नाहींत. माझे आजोबा सांगत कीं आपण मूळ महाराष्ट्रां-

तीलच रहाणारे. पाहिल्या बाजिरावाचे वेळीं उत्तरेकडे आलों. चरखी दाद्री येथें आमचीं १०० घरें आहेत. आमचा सर्व गौड ब्राह्मणांशीं रोटीव्यवहार व बेटीव्यवहार होतो. दाद्रीस गेल्यावर आपणांस विशेष माहिती मिळेल.

यांनीं आपल्या सहा पिढ्यांतील मुख्य नामावळी वाचून दाखविली त्यांतील नावें महाराष्ट्र पद्धतीचीं दिसलीं नाहींत. पं. ज्वालासहाय यांचा राहण्याचा वाडा विस्तारानें मोठा असून प्राचीन दिसतो. यावरून त्यांच्या जुन्या काळच्या वैभवाची साक्ष पटते. त्यांच्या संबंधानें *वाजब-उल-अर्ज मध्यें खालील नोंद आहे.

"अहद मरेठा मे नोकर थे. उस वक्त्त इलाखा बिशनपूर चंद गुजरोने गैरे आबाद कियाथा इन्होने आबाद किया. रकबा उनको दिया गया." पं. ज्वालासहाय यांना ३०० बिघे जमीन माफी व पांच कूवे असून झझरच्या नबाबाचा पट्टा आहे. मरेठा गौडा संबंधानें विशेष खुलासा हरियाणा प्रांतांतील चर्खी दाद्रीच्या वर्णनांत वाचावयास मिळेल. बावल येथें मराठ्यांची स्मृति कोणत्याहि प्रकारची उपलब्ध झाली नाहीं. बावलचें हवापाणी फारच उत्तम आहे. मी इतका हिंडतों पण अशा प्रकारचें उत्कृष्ट हवापाणी मला फारच थोड्या ठिकाणीं दिसलें.

कोटकासम—

प्राचीन नांव "कोट काशीराम" असें होतें. पृथ्वीराज चव्हाणाचे कारकीर्दींत काशीराम नांवाच्या ब्राह्मणानें हा गांव वसविला. अकराव्या शतकांत हा गांव आबाद झाला असें लोक सांगतात. लोकसंख्या सुमारें पांच हजार असावी. बावलपासून १२ मैल अंतर पडतें. येथें स्वामी शिवदयाल नांवाचे एक वृद्ध गौडब्राह्मण रहातात व

---

* प्रत्येक गांवची सरकारी लिहिलेली हकीगत.

त्यांच्या जवळ प्राचीन हस्तलिखित तवारीख पाहिली, तींत खालील उल्लेख आहे–

" जमाने सलतनत मुगलियामे यह परगना ताल्लुक सूबा देहली था. जब सलतनतमें ओफ हुवा मरेठा लेगोने बशमूल दीगर मुलुख इसपरभी अपना असरूफ कर दिया. बअहद शहाअलम व मिर्झा अकबर-शहाको मरेठोने नजर किया. तबसे मतबक शाहीमे रहा. जनरल लेक साहाबने इस मुलुखमे तसरूफ फरमाया. सं. १८४४ मे थॉमस मेटकाफ को दिया. बाद इ. स. १८६० मे जयपूर को दिया. इससे पहले गुडगांव जिलेमे था. " पेशव्यांच्या बखरींत ' कोटकासम ' चा उल्लेख आहे. येथून टपूकडा १४ मैल अंतरावर आहे.

टपूकडा–

हा गांव अलवर संस्थानांतील लहानसा तहशील असून ह्याची लोकसंख्या सुमारें तीन हजार असावी. सभोवार ' मेव ' लोकांची दाट वस्ती व मध्येंच हा लहानसा हिंदूंचा कसबा व हिंदूंनींच आबाद केलेला असलेमुळें ' तपूकडा ' असें नांव पडलें. टपूकडा = टापूचा तुकडा. गांवाबाहेर एक गढी आहे व ती प्राचीन आहे असें लोक ह्मणतात. कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र येथें मिळाले नाहींत. मराठ्यांची कोणत्याहि प्रकारची स्मृती लोकांस ठाऊक नाहीं. येथून तिजारा १२ मैल पडतो.

तिजारा–

हें मेवात प्रांतांतील मध्यवर्ती ठिकाण असून अलवर संस्थानांतील जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. लोकसंख्या सुमारें दहा हजार असावी. येथें हायस्कूल, पोस्ट, तार ऑफीस, दवाखाना, म्युनिसि-पालिटी इ. संस्था आहेत. हा कसबा प्राचीन दिसतो. गांव एका उंच टेकडीवर वसविण्यांत आला आहे. गांवाभोंवतीं मजबूत तट

आहे. गांवाच्या पूर्वेस डोंगरावर एक प्राचीन किल्ला आहे पण तेथें पहाण्यासारखें असें कांहीं नाहीं. गांवाच्या दक्षिणेस एक 'गूमच' आहे. त्यास 'भर्तृहरीचा गूमच' म्हणतात. गांवाच्या उत्तरेस आणखीहि एक प्राचीन इमारत दिसते. या इमारतीस येथील लोक नौमेहेला असें म्हणतात. ही इमारत मोंगलांच्या वेळची आहे असें लोक सांगतात. प्राचीन नांव "त्रिगर्त" असें होतें; त्यावरून पुढें तिजारा असें रूपांतर झालें. महाभारतांत या नगरीचा उल्लेख आहे, असें एक पंडीत मला म्हणाले. गांवाभोंवतीं जो तट आहे तो अत्यंत मजबूत आहे. मराठ्यांच्या हुकूमतीच्या वेळची कोणतीहि स्मृती येथें नाहीं. येथून किशनगड १४ मैल आहे.

किशनगड–

अलवर संस्थानांतील तहसिलीचें हें ठिकाण असून लोकसंख्या सुमारें तीन हजार असावी. बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेच्या 'खेरथळ' स्टेशनपासून सहा मैल अंतर आहे. गांवाजवळ एक मजबूत भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला भरतपूरच्या जाट राजानें बांधिला असें लोक सांगतात. मराठ्यांच्या वेळेची अशी कोणतीहि स्मृती लोकांनीं सांगितली नाहीं. येथें शतानंद मिश्र नांवाचे गौडब्राह्मण रहातात व त्यांना मराठ्यांकडून कांहीं जमीन माफ आहे. पण त्यांचेजवळ 'पट्टा' मिळाला नाहीं. हे मिश्र व नारनोळचे मिश्र हे भाऊबंद आहेत.

या शिवाय खेरथळ, हरसोली, दरबारपूर, राते इस्माइलपूर इ. निरनिराळीं गांवें हिंडून तेथें मराठ्यांच्या वेळच्या सनदा (पट्टे) कोणाजवळ असल्यास पहावें म्हणून सुमारें पन्नास मैल आणखी भटकलों. पण कांहीं मिळालें नाहीं. राते हा गांव उजाड आहे. या नंतर उत्तरेकडे जाण्याचें ठरविलें व ब्रिटिश मेवात (गुडगांव) जिल्ह्यांत प्रवेश केला.

फिरोजपूर (झिर्का)—

गुडगांव जिल्ह्यांतील हें तहसिलीचें ठिकाण असून हा गांव डोंगराच्या पायथ्याशीं वसलेला आहे. लोकसंख्या सुमारें पांच हजार असावी. डोंगरावर जमिनींतून एक पाण्याचा झरा येत असून तेथें एक कुंड आहे व प्राचीन शिवालय आहे. या झऱ्यास इकडील लोक ' झिरना, ' ' झिर्का ' असें म्हणतात. व त्यावरून ' झिर्काफिरोजपूर ' या नांवानें ह्या ठिकाणाचा उल्लेख केला जातो. मराठ्यांच्या वेळचे कागदपत्र कोणत्याहि प्रकारचे उपलब्ध झाले नाहींत, तेव्हां येथून पुढें २४ मैलांवर ' नू ' येथें मोटारीनें निघून गेलों.

नू—

गुडगांव जिल्ह्यांतील तहसिलीचें मुख्य ठिकाण. ब्रिटिश मेवात हद्दींतील मध्यवर्ती असलेलें गांव आहे. गांवाच्या चारी बाजूंनीं डोंगरांच्या रांगाच्या रांगा पसरलेल्या दिसतात. हवा चांगली नसून रोगकारक भासते. येथें ब्रेनमेव हायस्कूल, तहसील कचेरी, गर्ल स्कूल, दवाखाना, म्युनिसिपालिटी इ. संस्था आहेत. पूर्वी हा प्रांत मराठ्यांनीं मिर्झा इस्माइल बेगाकडून जिंकून घेतला होता व त्यांचे सेनापती, गोपाळरावभाऊ व पंडीत शामराव हे येथें रहात असत, असें कांहीं वृद्ध सांगतात. पण कोणत्याहि प्रकारचे कागदपत्र, जमिनीच्या सनदा वगैरे पहाण्यास मिळालें नाहीं. मराठी सत्तेची कोत्याहि प्रकारची 'स्मृती' आढळली नाहीं. येथून आणखी उत्तरेकडे जाण्याचें ठरविलें. येथून " सोना " २० मैल पडतें.

सोना—

एक प्राचीन कसबा असून गुडगांव जिल्ह्यांत आहे. हा गांव मराठ्यांनीं रेवाडीच्या ' गंगाबिशन ' अहीराला इनाम करून दिला होता. रेवाडीच्या अहीराचे कागदपत्रांत या संबंधीं मराठ्यांनीं दिलेली अस्सल

सनद मिळाली आहे व तिची नक्कल ‘ रेवाडी ’ च्या वर्णनांत वाचावयास मिळेल.

याप्रमाणें ‘ मेवात ’ प्रांत सर्व हिंडलों. सुमारें एक महिना मोडला. या प्रांतांत पायीं प्रवास करितांना अत्यंत त्रास झाला. कित्येक गांवांत हिंदूंची मुळींच वस्ती नसून ‘मेवांची’ वस्ती आहे. त्यामुळें पायीं प्रवास करून खाण्याचे अत्यंत हाल झाले व माझी जी दुर्दशा झाली ती लिहितां येत नाहीं. मेवातच्या भ्रमणांत निष्पन्नहि कांहीं झालें नाहीं. असो. शेवटीं राहिलेलें ठिकाण म्हणजे “ लासवारी ” चें रणक्षेत्र हें होय. या रणक्षेत्रांत कांहीं दिवस मोडून तेथें कांहीं मिळतें कां पहावें असा बेत करून मी ‘ रामगड ’ येथें पुन्हा परत आलों.

रणक्षेत्राकडे—

लासवारी कोठें आहे, व तेथें कोणत्या रस्त्यानें जावें या संबंधी चौकशी अलवर येथें असतांना श्रीयुत पिनाकीलाल शर्मा यांच्याजवळ केली होती. त्यांनीं लासवारीला जाण्याचे दोनतीन रस्ते कागदावर दाखवून दिले व नकाशेहि माझ्या समोर ठेविले. त्या सर्वांत जवळचा व सोपा मार्ग म्हणजे ‘ रामगड ’ वरून जाण्याचा असें मला कळलें व त्यांनींहि तोच सल्ला दिला. ‘ लासवारीचें युद्ध ’ हें मराठ्यांच्या इतिहासांत महत्त्वाचें युद्ध आहे व तुम्ही इतक्या लांब आलां तर तेथें जरूर जा असें पिनाकीलाल म्हणाले. तेव्हां “ मी हें रणक्षेत्र केव्हां पाहीन ” असें मला होऊन गेलें.

अलवरहून रामगड १५ मैल पडतें. पक्की सडक आहे. हीच सडक पुढें झिर्काफिरोजपूर, नू, गुडगांव या गांवांवरून दिल्लीस जाते. अलवरहून दिल्लीस मोटारींची रहदारी सारखी सुरू असते. या सडकेनें अलवर-दिल्लीचें अंतर ९९ मैलांचें आहे.

रामगड हा कसबा प्राचीन नसून अर्वाचीन असावा. हा गांव सडकेस अगदीं लागूनच आहे. हें तहसिलीचें ठिकाण असल्यामुळें अलवरचे लोक कामकाजाकरितां रामगड येथें नेहमीं येत जात असतात. अलवरहून रामगडला घोड्याचे टांगेहि जातात व या प्रांतांत भाडेंहि फार थोडें पडतें असें मला वाटतें. रामगड येथें सर्व प्रकारचीं दुकानें असून कित्येक देवळें व धर्मशाळाहि आहेत.

रामगडला आल्यावर ' लासवारी ' संबंधानें पुन्हां चौकशी सुरू केली. तहसील कचेरीच्या बाहेर सरकारी कामाकरितां आलेले कांहीं शेतकरी हुक्का (गुडगुडी) पीत बसले होते, तेथें मीहि जाऊन बसलों. त्यांनीं मला पाहिल्यावर, महाराज, कहां रहते है ? इसप्रांतमे क्यों आये! इ. प्रश्न विचारले व मीं योग्य तीं उत्तरें दिलीं. एक शेतकरी म्हणाला, लासवाडी तो हमारे मुलुख मे कोई गांव नहीं है? आप क्या कहते है! (यावेळीं मी चुकून र च्या ठिकाणीं ड उच्चारिला होता.) त्यावर मी पुन्हा म्हणालों, अजी लासवारी तो पासही है जहां दक्खनी औरे अंग्रेज लढेथे ! ! दुसरा शेतकरी म्हणाला, लासवारी मत कहो, नासवारी कहो, ! ! इतक्यांत तिसरा मनुष्य म्हणाला, नासवारी नाहीं. ' नसवारी ' कहो. पास ही है ! ! आप कहते है सो लासवाडी यहां नहीं है.' इ. इ. हें आमचें भाषण जोरानें चाललें होतें. " लढाई झाली होती ती लासवारी दुसरी असावी मी चुकून इकडे आलों, व मला पिनाकीलालनें खोटी माहिती दिली " असेंहि क्षणभर मला वाटलें. इतक्यांत आमचें हें जोराचें भाषण ऐकून अलवरचे एक वकील तेथें कांहीं सरकारी कामाकाजाकरितां आले होते. ते माझ्या जवळ येऊन विचारपूस करूं लागले. त्यांस मी माझें मनोगत कळविलें तेव्हां ते म्हणाले, ' You are right. The same Lasbari where a decisive battle was fought between the Marathas and the British in the year 1803. But the place is locally known as ' Nasbari '.

It is only ten miles from this place. You have to cross those big hills on foot. या वकिलांनीं मला बाररूममध्यें नेऊन तेथें माझें स्वागत केलें. एका शब्दाचीं निरनिराळीं रूपांतरें झाल्यामुळें प्रवाशाची कशी गाळण उडते याबद्दल तेथें मोठा हंशा पिकला.

रामगडहून दोन मैल पुढें गेले म्हणजे डोंगराच्या पायथ्याशीं असलेलें ' पूठी ' नांवाचें खेडें लागतें. येथून डोंगर पार केला म्हणजे दुरूनच मोठमोठीं मैदानें दिसूं लागतात. या डोंगरास ' पूठीका पहार ' किंवा "ललावंडीका पहाड" असें इकडील लोक म्हणतात. डोंगराच्या माथ्यावर येऊन कांहीं वेळ इकडे तिकडे नजर टाकिली म्हणजे सृष्टीसौंदर्य उत्तम दिसतें. जिकडे तिकडे हिरवीगार शेतें पाहून कांहीं वेळ या ठिकाणीं बसून खालील भूभाग पहातच रहावें असें नवीन प्रवाशास वाटतें. येथून तीन मैलांवर 'अलावडा' नांवाचें खेडें लागतें. अलावडा-पासूनच रणक्षेत्राची हवा सुरू होते. डोंगर पार केल्यावर हवेंताहि पुष्कळ फरक पडल्याचें प्रवाशास आढळून येतें.

अलावडा—

सुमारें एक हजार लोकसंख्येचें हें एक खेडेगांव अलवर संस्थानां-तील रामगड तहसीलमध्यें आहे. येथें लाला किशोरीलाल नांवाच्या एका वाण्याकडे माझा मुक्काम होता. गांवांत मेव, खानज्यादा, ब्राम्हण आणि वैश्य इ. लोकांची वस्ती आहे. रात्रीं गांवांतील वृद्धमंडळीस एकत्र करून त्यांच्याशीं गप्पागोष्टी सुरू झाल्या. एक भाट म्हणाला:—

लेक फिरंगी चढ्या कोफ तुरियन *तुतकारा ॥
काली पीली सुर्ख रंग चढी रजमट ठारा ॥
नसवारीकी धरीनीम गोऱ्यांका घाला ॥
रणसे चाले भाबके जिसका मुह काला ॥ इ.

* तु-तू-तू असा बिगुलाचा ध्वनी.

अलावड्यापासून थोड्याच अंतरावर उत्तरेस दोन विहिरी आहेत. एकीचें नांव ' रणवाला ', दुसरीचें नांव ' जंगवाला '. ह्या विहिरी प्राचीन असून, येथपर्यंत मराठ्यांची फौज पसरली होती हें आमचे पूर्वज सांगत असत असें लोक म्हणाले. येथून मालपूर दोन मैल पडतें.

मालपूर—

अलवाड्याहून मालपुरास येऊं लागले म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूंस कित्येक शेतें दिसतात. पुष्कळशी जमीन ओसाड पडलेली दिसते. मालपूर व भोंवतालचें मैदान हेंच रणक्षेत्राचें केंद्र होय. मालपुराच्या अगदीं जवळ आले म्हणजे डाव्या बाजूस एक प्राचीन व तुटकीफुटकी अशी इमारत दिसते. या इमारतीस इकडील लोक ' एदघा ' असें म्हणतात. युध्दाचे वेळीं शेकडों तोफांचे व हजारों बंदुकांचे गोळे लागल्यामुळें या एदघ्याच्या भिंतींना मोठमोठीं भगदाडें व खिंडारें पडलीं आहेत. मालपूरच्या लोकांनीं ठिकठिकाणीं दुरुस्ती केली आहे. या एदघ्या भोंवतीं पुष्कळ वेळां फिरून नीट विचार केला असतां असें दिसून येतें कीं, मराठी फौजा नसवारीहून मागें हटत हटत येथपर्यंत येऊन पोंचल्या. तोफांचा व बंदुकांचा मारा पूर्वेकडे होत होता हेंच अनुमान निश्चित ठरतें. या दिशेकडे मराठी फौज पाठमोरी होती. इंग्रजी फौजेचीं तोंडें पश्चिमेस होतीं. नकाशाचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां हेंच अनुमान निघतें. या एदघ्या जवळच एक गूमच आहे तोही जुना आहे. जवळच एक विहीर आहे तीहि फार जुनी आहे. असे लोक सांगतात.

मालपूर येथें खानज्यादा लोकांची वस्ति विशेष आहे. हे लोक "आम्ही पूर्वी ज्यदूवंशी राजपूत होतों. नंतर मुसलमान झालों असें सांगतात. मालपूर गांवाजवळ आणखी जी एक छत्री दिसते ती अर्वाचीन आहे. मालपूरच्या उत्तरेस शेकडों जुनीं थडगीं आहेत ! !

कित्येक जमिनींत गडप झालीं आहेत तर कित्येक जामिनीच्या वर शाबूत आहेत. प्रतिवर्षी शेकडों इंग्रज हातांत नकाशे घेऊन हें रणक्षेत्र पाहाण्याकरितां येतात व मालपूरच्या लोकांना एकत्र करून निरनिराळ्या गोष्टी विचारितात. कित्येक इंग्रज मालपूरच्या एदघ्या-जवळील मातीचें चुंबन करून कांहीं माती कागदाच्या पुडींत गुंडाळून खिशांत ठेवितात. दक्षिणी असा तेथें जाणारा मी पहिलाच असें. मालपूरच्या लोकांनीं मला सांगितलें. मालपूर हा गांव प्राचीन असून लोकसंख्या सुमारें पांचशें असावी. मालपूरहून नसवाडी दोन मैल पडते.

नसवाडी—

सुमारें पांचशें लोकसंख्येचें हें खेडेंगांव एका लहानशा नदीच्या किनाऱ्यावर आहे. या नदीस 'रूपारेल' असें नांव आहे. गांवांत बहुतेक वस्ती 'मेव' लोकांची आहे व फक्त एक घर भोरेलाल नांवाच्या खंडेलवाल वैश्याचें आहे. ही नदी फारशी खोल नाहीं. या नदीवर एक पाण्याचा बांध दोन मैल उत्तरेस बांधिलेला होता. तो युद्धाचे वेळीं मराठ्यांनीं फोडिला. या बांधास 'हजारी बंध' म्हण-तात. नदीचा उल्लेख इंग्रजी पुस्तकांतून 'बराकी नाला' या नांवानें केलेला आढळतो. मराठ्यांनीं आपल्या तोफा मालपुरास ठेविल्या होत्या. नदीपार झाल्यावर बांध फोडिला असें लोक सांगतात.

लोककथा—

" अंग्रेजोंने जलालपूरमे नदी पार किया, और नसवारी व माल-पूरेक बीचके मैदानमें मरेठोंको घेर लिया. दक्खनी रोटी बनारहे थे, और पूठीके पहाडके तर्फ जा रहे थे. दक्खनीओंने मालपूरके पास एक कूवेमें बहुतसा धन पटक दिया है. कूवेका पता नहीं है. दबगया है. हमारे गांवमें और मालपूरमें तोफोंके गोले बहुतसे मिलते है. अंग्रेज ले जाते है. प्रतिवर्ष कई अंग्रेज नसवारी और मालपूरमें आते रहते है. हम

लोगोंको एकठा करते है. और लढाईकी बातें पूछते रहते है. कई जगह खोदते है, और चले जाते है. जाते समय मिट्टीको चुमते है कागज की चुडीयोंमें बांधकर ले जाते है. दक्खनी आज तक कोई यहां नही पहूचा. आपको प्रथमबारही देखा. कोई आयाहो हमको खबर नहीं."

"अंग्रेज अचनेरासे चल पडे थे. दिनरातकी दौड करके दक्खनी ओको नसवाडीके मैदानमे घेर लिया. दक्खनीओंको यह खबर नही थी की पीछेसे अंग्रेजी फौज आरही है. वे रोटी बना रहे थे. जब खबर मिली फौरन 'हजारीबंध' को तोड दिया. और अपनी तोफे मालपूरमें एकट्टा किया. हजारीबंध फोडनेका मतलब यह था, कि अंग्रेजी फौज रुक जाय नदीपार न आवे. तोफे कीचड में फस जाय. परन्तु पाणी इतना ज्यादा नही था, इस लिये अंग्रेजी फौज बेखटके पार हो गयी."

"एदघाके उत्तरी जंगलका 'तीतर' बडा लडाका होता है. मालपूरके मैदान में जब कभी कुत्ता *गीधड का सामना करता है, और जब मालपूर तक पहुंच जाते है. बाद कुत्तेके पीछे गीधड लगता है. यह भूमीका असर है. यह वीरभूमी है."

"अंग्रजोंनें नदी पार करतेही मारकाट शुरू हुई. खूब लढाई हुई. लाखों आदमी दोनो तरफके मारे गये. मरेठोंकी तोफें जो मालपुर में थी अंग्रजोंके काबूमें आ गयी. यदी मरेठी फौज पूठीके पहाड के पार हो जाती और मेवात तक पहुंच जाती तो अंग्रेजोंको लढना मुष्किल हो जाता. इसी कारण 'लेक' फिरंगीने पहाड पार करनेसे पहिलेही मरेठी फौजको घेर लिया"

"इस लढाई में अंग्रेज बहुतसे मारे गये. कहते है किं रूपारेल नदीका पाणी लाल हो गया था. और मालपूर और नसवारी के लोग

१ पक्षीविशेष. * कोल्हा.

अपना गांव छोड कर भाग गये. एक सालके बाद वापिस आगये. मरेठोंने बडी बहादुरी दिखलायी. परन्तु उनकी फौज कम थी. अंग्रेजकी ज्यादा थी."

"एक समय एक अंग्रेज हातमें नकशा लेकर यहां आ गया. कहने लगा कि मेरे पूर्वज यहां मरगये है उनकी कब्र बताओ. उसने लेक्चर भी दिया. हमारे गांवमें एक नूरखाँ खानज्यादा था उसने अंग्रेजको कई बाते बतलाथी. दोनो साथ मिलकर खोदने लगे.

एक छोटासा तोफ का गोला मिल गया. अंग्रेज बडा खुष हो गया. उसने नूरखाँ को तीन रु. माहवार पेनशन लिख दिया जो अबतक उसको मिलता था. नूरखाँ को मरे हुवे करीब पांच साल हुवे."

"गूमच के पास एक कूवा था जिसमें धन पटक कर दक्खनी भाग गये. मैदानमें और भी कई कूवे होंगे जो दब गये है. पता नही है. मालपूर के मैदान में अभी तक किसी को धन नही मिला. यहां लाखो कबरे थी जो जमीन मे दब गयी."

"हमारे पूर्वज कहते थे की जब अंग्रेजोंकी और दक्खनीओंकी लढाई हो रही थी, गोविंदगड का रहनेवाला एक खानज्यादा जिसका नाम 'जुल्ला' था, मरेठोंकी हार होतेही अंग्रेजोंको मिल गया. उसने "मरेठोंके खच्चर लूटे" मरेठी फौज भागने लगी तब उन्होने कई जगह रास्तेमे जहां कूवा देखा वहीं धन पटकना शुरु किया. जुल्ला बडा बदमाष था. पीछेसे धन समेटता गया."

"जुल्ला" ने नसवारी के मैदानमें जो माल मरेठोंका लूट लिया था, उससे वह बडा बेचैन था. उसको रातदिन यह फिकीर थी कीं, शायद कोई मरेठा घुडसवार मुझे रातको पकडकर काट न डाले, इस फिकीर के मारे वह बुंदेलखंडमे पन्ना नामकें गांव में भाग गया. वहीं मर गया."

" इस मैदानमें मरेठोंने बडी बहादुरी दिखलायी. उनकी फौज बहुत कम थी. अलावा इसके मरेठा लोग लढनेके लिये तैयार नहीं थे. उनको लेक फिरंगीने अचानक घेर लिया. दक्खनी रोटी बना रहे थे. कहते है कि यह लढाई शिंदियाके साथ हुवी. जिसने अपना राज्य बहुत दूरतक बढाया था. "

" बक्खतावरसिंग " और " अहंमदबक्सखान " इन्होंने इस लढाईमे बहुतसी फौज अंग्रेजोंके सहायतामें भेज दियी. जिसके बदलेमें अलवर और लोहारू इन दोनो रियासतों की नींव डाली गयी. " इ. इ.

यासंबंधाने खालील उताऱ्यावरून बराच बोध होण्यासारखा आहे.

Punjab State Gazetteer Part A, section B, 1875

Loharu State.

The ancient history of Loharu is not known. It once formed the part of the Jaipur state, but towards the middle of the 18th century some thakurs, after the fashion of the day, shook off Jaipur authority and formed an independent state. The Raja of Khetdi a dependency of Jaipur Raj attempted to subdue them, but was slain in the battle of Loharu. The state was reannexed to Jaipur for a time, but it soon regained an independence. The British Govt: ceded its territory to the Maharaja of Alwar, who had loyally aided during the Maratha campaign. Then the Maharaja in turn, with the assent of the British Govt. entrusted the stet to Nawab Ahmadbux khan who had fought gallantaly on the British side in the Lasbari campaign and successfully blocked the enemy at Bund Hazari.*

* मराठ्यांनीं रुपारेल नदीचा बंधारा फोडल्यामुळें, लेकसाहेबांची कशी तिरपिट उडाली हें या उताऱ्यावरून स्पष्ट दिसतें.

लासवारीच्या युद्धाची छाननी–

लासवारीच्या युद्धाची थोडीशी चर्चा कै. प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनीं लिहिलेल्या " मराठ्यांच्या लढायांचा इतिहास " या पुस्तकांत वाचावयास मिळतो. अशाच प्रकारचें दुसरें एक पुस्तक बडोद्याचे जनरल नानासाहेब शिंदे यांनीं लिहिलें आहे. रियासतकार सरदेसाई यांनीं आपल्या रियासतींत या युद्धाची चर्चा फारशी केली नाहीं.

वरील पुस्तकें म्हणजे इग्रंजी पुस्तकांचे अनुवाद आहेत. * कोणाहि लेखकानें प्रत्यक्ष जाऊन 'लासवारी' चें रणक्षेत्र पाहिल्याचें दिसत नाहीं. त्यामुळें अस्सल आणि नक्कल यांतील फरक तेव्हांच वाचकांस कळतो. इतिहाससंशोधन म्हणजे खुर्चीटेबलावर बसून, 'टाकाच्या फेंकी' किंवा गच्चीवरील गप्पा' लिहिणें नव्हे. तें काम फार सोपें आहे. पण गाठोडें खाकोटीस बांधून, उन्हातान्हांतून, तहानभुकेची पर्वा न करितां शेंकडों मैलांची जमीन रांत्रदिवस तुडवीत चालणें अत्यंत कठीण आहे. इतिहास आणि भूगोल या दोन विषयांचा परस्परांशीं अत्यंत निकट संबंध आहे. निरनिराळ्या स्थलांची प्रत्यक्ष पहाणी केल्याशिवाय, दुसऱ्या पुस्तकांच्या सहाय्यानें केलेली छाननी लंगडी व पंगु ठरते, असें माझें मत आहे.

ता. १४ सप्टेंबर १८०३ रोजीं जनरल लेक यानें दिल्लींत प्रवेश केला व शहाआलमला आपल्या ताब्यांत घेतलें. दिल्ली शहर हस्तगत झाल्याचा आनंद कोणास होणार नाहीं ! ! महादजी शिंदे यानांही यापूर्वी दिल्ली प्राप्त झाल्यावर असाच आनंद झाला होता. त्या

---

* 1 Memories of wars in India. By Magor Thorn.
2 Decisive Battles of India By Col. G. B. Malleson.
3 Memories of Viscount Lake. By Col. Hugh Peods.
4 Memories of Welleslly's Dispatches.

काळीं दिल्लीचें महत्त्वच कांहीं और होतें. दिल्लीहून मराठ्यांची फौज पळाली ती आग्र्यास गेली. या वेळीं शिंद्यांच्या पदरीं असलेला जनरल पेरन अगदीं ऐन वेळीं शिंद्यांच्या हातावर तुरी देऊन फ्रान्सांत पळून गेला होता. हाताखालीं इतकीं पलटणें असतांना मुळींसुद्धां प्रतिकार न करितां हा फ्रेंच सेनापती, अलीगड आणि कोएल हीं दोन ठाणीं चुपचाप इंग्रजांच्या हवालीं करून स्वतः मातृभूमीस पळ काढतो. हे पेरनचे (पेरू) परधार्जिणपणाचें वर्तन पाहून कोणास संताप वाटणार नाहीं ! शिंद्यांच्या पदरीं त्यावेळीं इंग्रज आणि फ्रेंच मिळून ३० फिरंगी, लष्करांत नोकर होते. या सर्वांना शिंद्यांची नोकरी सोडावयास लावून आपल्याकडे ओढण्याचा जनरल वेलस्लीचा उपक्रम सुरूच होता. पेरन, बोरक्वीन, उडीरनेक, हेसिंग, सर्व एकाच माळेचे मणी !!!

दिल्ली हस्तगत केल्यावर आग्रा केव्हां घेऊं असें जनरल लेकला होऊन गेलें. आग्र्यास मराठ्यांची थोडीशीच फौज होती. ही फौज आणि दिल्लींतून पळून आलेली फौज यांनीं मिळून कांहीं वेळ आग्र्याचा किल्ला लढविला. पण आपली बाजू कमजोर पडत चाललेली पाहून ही फौज सैरावैरा पळत सुटली, व कित्येकांनीं आपलीं नांवें इंग्रजी फौजेंत दाखल केलीं. जनरल लेक याला हेंच पाहिजे होतें. ता. १८ आक्टोबर १८०३ रोजीं इंग्रजी फौजेनें आग्र्याचा किल्ला हस्तगत केला.

आग्र्याहून जी मराठ्यांची फौज पळत सुटली ती 'मेवात' प्रांतांत दूरवर पसरलेल्या डोंगरांच्या रांगांत कांहीं दिवस दबा धरून पुन्हां आग्र्यावर आणि दिल्लीवर हल्ला करितां आल्यास पहावें या हेतूनें उत्तरेच्या रोखानें जाऊं लागली. या फौजेचा पाठलाग करावा किंवा नाहीं याचा विचार करण्यांत जनरल लेकनें आठ दिवस घालविले. मराठी फौजेचा पूर्ण बीमोड केला नाहीं तर आपणास दिल्लीस आणि

आग्र्यास शांतपणें नांदतां येणार नाहीं हें जनरल लेक पूर्णपणें जाणून होता. शिवाय ही मराठी फौज मेवातच्या डोंगरांत एकदां घुसली म्हणजे तिच्याशीं दोन हात करणेंहि कठीण जाईल हेंहि त्यास कळून चुकलें होतें. यासाठीं मराठी फौज मेवातच्या पहाडांत दबा धरून बसण्यापूर्वींच एखाद्या मैदानांत त्यांना घेरून फौजेची धूळधाण करतां आल्यास पहावी, या हेतूनें ता. २७ आक्टोबर रोजीं मोठमोठ्या तोफा व कित्येक पलटणें घेऊन जनरल लेकनें आग्र्याचा किल्ला सोडला. वाटेंत पाऊस लागल्यामुळें इंग्रजी फौजेला कूचकरण्यास बरेच कष्ट पडले. तरी रेटीतरेटीत जनरल लेक ता. ३१ रोजीं रात्रीं मेवातच्या तोंडापाशीं येऊन पोंचला. आदल्या दिवशीं येथें मराठी फौजेचा मुक्काम होता हें वर्तमान त्यास समजल्यावर मराठ्यांचा पाठलाग करण्याची त्याची इच्छा ज्यास्तच बळा-वली. यापूर्वींच मराठे हे डोंगरांत जाऊन लपून बसले असतील, व त्यांना धुंडून काढणें धोक्याचें होईल अशी जनरल लेकची भावना ता. ३१ च्या मुक्कामापर्यंत होती.

मराठे पुढें चालले आहेत व इंग्रजी फौज मागाहून येत आहे या-प्रमाणें हा पाठलाग आणखी दोन दिवस चालून रुपारेल नदीच्या तीरावर (बराकी नाला)* येऊन इंग्रजी फौजा थडकल्या. मरा-ठ्यांनीं रुपारेल नदी पार करून ' लासवारी ' स डेरे लावले व मोठ-मोठ्या तोफा, दोन मैलांवर असलेल्या, मालपुरांत नेऊन सर-बत्ती देण्याचें काम सुरू केलें. यावेळीं दोन्ही फौजांमधील अंतर म्हणजे ' रुपारेल ' नदी हेंच होतें. इंग्रज पाठीवर येत आहेत ही खबर मराठ्यांना याच दिवशीं म्हणजे ता. १ नवंबर रोजीं कळली व ताबडतोब " हजारी बंध फोडून येथेंच इंग्रजी फौजेला अडवितां

* त्यावेळीं तो एक नाला असेल पण हल्लीं ती एक नदीच आहे.

येईल तर पहावें" या हेतूनें तो बंधारा फोडला. हा बंधारा फोडण्यांत मराठा सेनापतीचें युद्धशास्त्रकौशल्य चांगल्या प्रकारें दिसून येतें.

बंधारा फोडल्यामुळें सुमारें एक मैल जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. अर्थात् चिखलांतून तोफा ओढून नेण्यास इंग्रजी फौजेला बराच वेळ लागला. व या संधीचा फायदा घेऊन ता. २ रोजीं मराठ्यांनीं मालपूरच्या तोफांच्या भडिमारानें इंग्रजी फौजेला झोडून काढलें. एकीकडे गोळ्यांचा वर्षाव होतच होता आणि त्यांतच इंग्रजी फौजेचे 'रुपारेल' नदी पार करणें चाललेंच होतें. या माऱ्यांत इंग्रजी फौजेचें बरेंच नुकसान झालें. पण रुपारेल नदी पार झाल्यावर इंग्रजांनीं मराठ्यांच्यावर जोराचा मारा सुरू करून, घोडदळ व पायदळ मिळून मराठी फौज कोंडण्याचा प्रयत्न केला. व यावेळीं दोन्ही फौजांमध्यें अगदीं थोडें अंतर राहिलें.

इंग्रजी फौजेच्या हालचाली पाहून मराठी फौजेनें लासवारी गांवांतील तळ उठवून मालपूरला तंबू ठोकले व दुसऱ्या दिवशीं ता. ३ रोजीं लढाईस सुरवात झाली. ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली. मालपूरला आपला टिकाव लागत नाहीं असें कळल्यावर मराठी फौज पेचांत सांपडली व बहुतेक लोक लढतां लढतां मेले. या लढाईत इंग्रजांचेंहि बरेंच नुकसान झालें. पण दिल्ली किंवा आग्रा येथें पुन्हा मराठे धांवून येतील ही भीति त्यांना उरली नाहीं. मराठ्यांच्या कित्येक तोफा इंग्रजांना मिळाल्या. या युद्धांत मराठ्यांच्या दुप्पट इंग्रजी फौज होती असें तिकडील लोक सांगतात.

मराठ्यांच्या फौजेचें सेनापतित्व "आबाजी*" या नांवाच्या मनुष्याकडे होतें. या लढाईचे वेळीं दवलतराव सिंदे हजर नव्हते. शिवाय दुसरे सेनापती "गोपाळराव रघुनाथ" हेहि रणक्षेत्रांत नव्हते. या अबाजीच्या युद्धकौशल्याबद्दल इंग्रज ग्रंथकारांनीं तारीफ केली आहे.

* अंबोजी इंगळा नव्हे.

" Abaji the commander-in-chief whose disposition had been so able throughout the day, exchanged for a swift horse the elephant. His name appears no more in history" (" Memories of Viscount Lake ")

" The Marathas were commanded by " Abaji " at Laswadi, a man of their own race, a man of great pertinacity and possessed of great military talents (Malleson's " Decisive battles of India ")

" Just at the critical moment, when the Enlish column was struggling forward, " Abaji " with the true eye of a general dashed his cavalry against them. (" Memories of wars in India " By Thorn)

लासवारी किंवा मालपूर या दोन्ही ठिकाणीं लोकांकडून या ' अबाजी ' संबंधानें अथवा मराठ्यांच्या संबंधानें लोककथा, गाणीं, दंतकथा, इ. कांहीं तरी मिळावयास पाहिजे होतें. व मी रणक्षेत्राच्या आसपासची, सहजपुरा, बर्वांडा, नगली, हसनपूर, इ. कित्येक गांवें हिंडून या संबंधानें पुष्कळ प्रयत्नहि केला परंतु कांहीं साध्य झालें नाहीं. इकडे ' मिराशी ' म्हणून जे मुसलमान आहेत ते गाणीं गात असतात. पण या युद्धासंबंधानें त्यांना कोणत्याहि प्रकारचीं गीतें येत नाहींत. फक्त थोड्याशा लोककथा ज्या लोकांनीं सांगितल्या त्या जशाच्या तशाच दिल्या आहेत. पानीपत प्रदेशांत हिंडतांना मला मराठ्यांचीं गाणीं मिळालीं याचें कारण त्या प्रांतांत मराठे सहा महिने येऊन राहिले होते. यासाठीं तत्प्रांतीय लोकांच्या व मराठ्यांच्या गांठीभेटी घडून आल्या होत्या. पण लासवारीस मराठे धांवत आले व तीन दिवसांनीं तेथेंच इंग्रजांकडून घेरले गेले. अर्थात् या तीन दिवसांत तत्प्रांतीय लोकांना मराठ्यांच्या तंबूंत जाऊन त्यांच्याशीं शांतपणें संभाषण करण्यास फुरसत मिळालीच नाहीं ! ! ! लासवारीचें युद्ध म्हणजे अचानक घडून आलेलें तीन दिवसांचें नाटक झालें ! ! !

लासवारीच्या युद्धानें काय झालें !

ह्या युद्धानें मराठ्यांचा दिल्लीच्या उत्तरेकडील राज्यविस्तार संपुष्टांत आला. शिंदे, होळकर आणि भोसले या तिघांना कातरींत धरून त्यांना इंग्रजांची सत्ता मान्य करावयास कसें भाग पाडतां येईल, यासंबंधानें वेलस्ली गव्हर्नर निरनिराळीं कारस्थानें रचीत होता. शेवटीं असई, अरगांव, आणि लासवारी येथें झालेल्या चकमकींनीं शिंदे आणि भोसले हे इंग्रजांच्या आहारीं पडले. व सर्जे–अंजन* गांवच्या तहानें दिल्लीच्या उत्तरेकडील शिंद्यांचा विस्तार सर्व सपुष्टांत आला. पण होळकरानें आपल्या भराऱ्यांनीं इंग्रजांना सळोकापळो करून टाकिले होते. व यापुढें जसवंतराव होळकराचा पिच्छा पुरविल्याशिवाय हिंदुस्थानांत आपली धडगत लागणार नाहीं हें जाणून जनरल वेलस्लीनें ती कामागिरी पुन्हा जनरल लेक यांसच सांगितली.

"तेरे नाडीमे 'जसवंतराव हुलकर' बोल रहा है"

लासवारीच्या चकमकीनंतर जनरल लेक 'कोटपूतली' येथें रहावयास गेला असें दिसतें. त्यास हिंदुस्थानची हवा मुळींच मानवत नव्हती. दिल्ली आणि आग्रा हीं शहरें हस्तगत करून, शिंदे आणि भोसले यांना वठणीवर आणल्यामुळें जनरल लेकची इग्लंडमध्यें वाहवा झाली. पण जसवंतराव होळकराच्या पराक्रमाच्या निरनिराळ्या बातम्या रोजच्या रोज कानावर पडूं लागल्यामुळें त्याच्या तोंडचें पाणी पळालें. कोटपूतलीस तो अजारी पडला. कोटपूतली हें ठिकाण जनरल लेक यांस फार आवडे. कारण तेथील हवापाणी फारच उत्तम आहे. हल्लीं सुद्धां कोटपूतली हें ठिकाण आरोग्याच्या दृष्टीनें फारच उत्तम आहे यांत शंका नाहीं. यावेळीं औषधोपचार करण्याकरितां दूरदूरचे वैद्य बोलाविण्यांत आले. त्यातंच जवळच

* विशेष खुलाश्याकरितां 'एचिसनचा' तहनामा पहा.

असलेल्या बेहेरोड गांवचे एक प्रख्यात पंडीतहि बोलाविले होते. त्यांनीं येऊन जनरल लेकचा हात नाडी पहाण्याकरितां आपल्या हातांत घेतला. व थोड्या वेळानें म्हटलें, " तेरे नाडीमे जसवंतराव हुलकर रहा है " तुझे बडा परिशान करेगा " तेरी आयू थोडी है " इ. इ. जनरल लेकनें या ब्राम्हणास कांहीं दक्षणा देऊन बिदा केले. ही कथा कोटपूतली आणि बेहेरोड या दोन्ही ठिकाणीं प्रसिद्ध आहे. साप्रंत कोटपूतली येथें जे ' लेक हॉऊस ' आहे तीच पूर्वीची इमारत होय. पुढें ह्या इमारतीची दुरुस्ती करण्यांत आली.

कोटपुतलीस गेल्यावर जनरल लेक यानें आपली मोहोर लावून इ. स. १८०४ मध्यें एक जाहीर पत्रक काढिलें. तें फारशी भाषेंत आहे. कोटपूतली येथें काजी महंमद गुलामअल्ली यांचेकडील कागदांत तें मिळालें.

क्र. २६ }
मू. नं. }

{ श. १७२६
{ इ. १८०४

जनरल लेकची चौकोनी मोहोर

जनरल जर्नार लेक साहाब बहाद्दुर अजसाहेबान कौन्सिल सिपह सालार, अफवाज बादशाह इंग्लिशस्तान मुतल्लिका किश्वर हिंदुस्थान कंपनी बसरे लष्कर सरकार अंग्रेज बहाद्दर. ई. १८०४

इश्तिहार बमूजब हुकूम जनाब नबाब मुस्तताब, जनरल जर्नार लेक साहाब बहादुर सिपहसालार अफवाज अंग्रेज बहाद्दर कलमी शुद.

अमिलान् व जिमेदारान् व कानुनगोयान् व चौधरियान व हमामुतबत्तनान् कसबाज, देहात व पेशावरान् व वेपारियान् अहले तिजारत

इंग्रजी सही Gen Lake इ मुलुख बिदानंद

" चूंकि दवलतराव सेंधिया, बा साहेबान् बालाशान् अंग्रेज बहादर. कमर ब मुखालिफत बस्ता. मसदरे फितना अंग्रेजी ब फसाद अस्त. अज इं सबब साहेबान् अजीमुश्यान. मुतव्वजे जंग ब जबाव देहि

फौज मुखालिफ हस्तंद. बनजूल दायरे दौलत लष्कर जफर असर कि बनवा इ मुल्ख बाके अस्त. महज बराय आबादी इ मुलुख अस्त. ब रफाइयत तमामी साकिनान् इं अमर कि दर जेरसाए लुतफे अदालत मुरफ्फाहाल बफारन उलवाल ब गुजारन दरइं सुरत हमाम मर्दमान मरकूमस सदर मुनासीब अस्त. कि बफरागत खातिर ब इतमिनान् तमाम बहुजूर हाजीर शबंध दराचोकि बेहेतरी हा महा खाहेद बुद. ब अमल खाहाद आमद, ब इश्तिहार नामेजात बराय दिलजमी ब तमानियत हमा खिलायक अजतरफ हुजूर हर देहात मामुला इलाकेआत खुद हा जारी नुमायन्द. कि तमामी बर्दवान् बमस्कन् खुद हा आमदा खुद कयामनुमायन्द. बहेच नो अंदेशा न साजन्द. दर फरिस्ता दर रसद गल्ला बलष्करे जफरे असर हरकस कि मसरुफ खरे ख्वाही फाहेद बूद. बाएस अखलास बनेको खिदमते ओदर हुजूर खाहेद शुद.

लासवारीच्या युद्धानंतर शिंद्यांचा मुलुख कसा वाटला गेला व सांप्रत कोणाजवळ आहे त्यासंबंधीं खुलासा–

कोटपूतली–संवत १८६० (श. १७२५ इ. १८०३) मध्यें अभयसिंगास या परगण्याची सनद दिली. सांप्रत खेतडी दरबारकडे आहे.

राठ प्रांत–बाणसोर, मुडांवर, रताय, अलवरच्या वख्तावरसिंगास देण्यांत आले.

नारनोळ कानोड–पटियाळा संस्थानकडे देण्यांत आले.
काटीबावल– नाभा संस्थनाकडे देण्यांत आले.

मेवात–किशनगड, खेरथळ, तिजारा, तपूकडा, अलवरसंस्थानकडे दिले.

कोटकासम–भरतपूरकडे देऊन नंतर जयपूरकडे देण्यांत आलें.

रेवाडी–इंग्रजीराज्यास जोडण्यांत आलें. तसेंच नू, सोना, फिरोजपुराशीर्का इंग्रजींतील गुडगांव जिल्ह्यांत सामील करण्यांत आलें.

चरखीदाद्री—झिंद संस्थानास देण्यांत आलें.

झझर—नबाबी स्थापित करण्यांत आली परंतु १८५७ च्या बंडानंतर इंग्रजींतील रोहोटक जिल्ह्यांत सामील करण्यांत आलें.

हांसी हिसार—वगैरे इंग्रजांत सामील.

याशिवाय पटौडी, दुजाणा, बहादुरगड. येथें नबाबी स्थापित करण्यांत आली. लोहारूच्या नबाबाची स्वतंत्र स्थापना करण्यांत आली. नीमराण्याच्या राजाकडे फक्त २५ गांव राहिले. नाहाड हें दूजाण्याच्या नबाबाकडे देण्यांत आलें. बुधवाणा झिंद संस्थानकडे देण्यांत आलें. महीम, तुश्याम दुव्वलधन वगैरे राहोटक जिल्ह्यांत सामील करण्यांत आलीं. बहादुरगडची नबाबी इ. स १८५७ च्या बंडानंतर नष्ट करण्यांत आली. सांप्रत दुजाणा, लोहारू, पटौडी या ठिकाणीं नबाब विद्यमान आहेत.

लोहारु—हें एक तीन ह. वस्तीचें स्वतंत्र संस्थान— खेडेगांव (हिसार जि.)आहे. इ. १८०३ मधील लासवारीच्या युद्धांत अहंमद बस्कखान, अभयासिंग आणि बख्तावरसिंग यांनीं इंग्रजास मदत केली म्हणून यांना अनुक्रमें लोहारु, खेतडी, अलवार ही गांवें दिलीं, अहंमदबक्स हा कांहीं काल शिंद्याकडे नोकर होता असें कांहीं इतिहासज्ञ म्हणतात, पण ह्यास निश्चित पुरावा नाहीं. हा शिर्का-फिरोपूर येथें राहात असे. इ. १८०५ मध्यें ज. लेक यानें येथें त्यासीं तह करून प्रस्तुत स्थलीं प्रस्थापित केलें. त्यापूर्वी लोहारु शिंद्याच्या अमलामध्यें होतें. येथील कांहीं लोकांजवळ मराठ्यांनीं दिलेल्या जमिनींच्या सनदा आहेत. मिळाल्या नाहींत. गांवाच्या आसपास वाळूचे डोंगर व गांवांत हिंदूची त्रस्त व दीन स्थिती पाहून नवीन प्रवाश्याला विस्मय वाटतो.

दिलीपलिकडील मरेठा गौड ब्राह्मण— ह्यांची वस्ती दाद्री (पृ. १७) व कैथल (कर्नाल जि.) येथें असून ‘ मरेठोंका असल

वास ' ह्या खेड्यांत व बेरला, पिचोपा, ढाणीफोगाटाकी, बावल, इ. ठिकाणीं तुरळक आहे. हे म्हणतात आम्ही महाराष्ट्रांतून पानपतचे वेळीं आलों. राव, प्रधान इ. संज्ञा ह्यांचे मध्यें असून सप्रतां रोटीबेटीव्यवहार येथील इतर गौडाशीं होतो. आचारविचारहि त्यांचे-प्रमाणेंच आहेत. महराष्ट्रांतील 'कर' प्रत्ययाप्रमाणें ह्यांच्या आडनांवांत 'शासन' संज्ञा लाविलेली असते. हीं शासनें सध्यां चूलठ, बावालिया, हरितवाल, कानोडिया, बब्बरवाल, वाडिया, बीजणहट्ट, नागबाण, सिंधाणची इ. आढळतात. मला दाद्रीयेथील पं. लक्ष्मीनारायण यांचे-कडे एक वंशावळ मिळाली– श्रीराजाबाळाजी विश्वनाथ, बाजीराव, रघुनाथराव, नानाराव, रतन कुमार, सेवाजी, रामकुमार, धवलसिंग, खड्गसिंग, मानसिंग, रामसिंग, अमरसिंग, फतेसिंग, जसवंतसिंग, बिशनसिंग, पृथ्वीसिंग, जीतसिंग, सूरतसिंग, आनंदराम, बसाऊराम, साहबराम, उदमीराम, सेडूराम दाताराम, गुमानीराम, रामजीदास, २६ लक्ष्मीनारायण हे विद्यमान आहेत. उत्तरेकडील ब्राह्मण सिंग, मल्ल हीं बहुमानार्थी विशेषणें लावतात. सुलतान हेंहि नांव धारण करणारे कांहीं आहेत. पेशव्यांशीं संबंध लावतात व तें कृत्रिम व अर्वाचीन दिसतें. राव ही पदवी रेवाडीच्या अहिराला दिल्याचें गुडगांव गॉझिटिअर मध्यें आहे. राजपूत हे महाराष्ट्रीय राव व प्रधान हेंहि पद उपयोजितात, पण तेवढ्यावरून त्यांचें वास्तव्य महाराष्ट्रांतील असें समजावयाचें नाहीं.
